

# सिलीसबर्गची पत्रे...

विश्राम बेडेकर

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय [illegible]
सं. क्र. [illegible]

RFFBK-0024845

संदर्भ ग्रंथ प्रधान
६५२
२८८६५
६।१०।२।८६
— ग्रं ठाणें

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

6 MAR 1986
16 APR 1986
7 MAY 1986
1 JUN 1986
16 JUL 1986
20 JUL 1986
17 AUG 1986
20 AUG 1986
7 SEP 1986
15 OCT 1986
30 NOV 1986

म. ग्रं. सं. ठाणें
विषय मु.प्र
सं. क्र. ६०७

## सीलिसबर्गची पत्रे

विश्राम बेडेकर याच्या ‘ एक झाड आणि दोन पक्षी ’ या गाजलेल्या आत्मचरित्रानंतर आता हा पत्रसंग्रह. सीलिसबर्ग येथील महर्षी महेश योगी याच्या आश्रमातून सौ. मालतीबाई बेडेकर याना लिहिलेली ही पत्रे आहेत.

वेदांचा प्रवृत्तिपर अर्थ लावणाऱ्या, जीवनाला सामोरे जायला प्रवृत्त करणाऱ्या या तत्त्वज्ञानाकडे युरोप-अमेरिकेची तरुण पिढी आणि बुद्धिमान विचारवंतही आकृष्ट झाले. आश्रमातील विविध प्रवृत्तींची माणसे, त्याचे व महर्षींचे गूढरम्य नाते तरुण पिढीच्या समस्या आणि आकांक्षा, आश्रमातील भारलेले वातावरण आणि त्याभोवतालचा सुखद उल्हसित करणारा निसर्ग या सर्वांकडे बेडेकरानी विचारवंताच्या गंभीर वृत्तीने, कवीच्या रसिकतेने आणि सहृदय माणसाच्या डोळ्यानी बघितले आहे. वाचकाच्या मनात अस्वस्थ करणारे अर्थतरंग जागृत करण्याचे सामर्थ्य या पत्रात आहे.

विश्राम बेडेकर यांचे इतर
प्रकाशित साहित्य

**कादंबरी**

रणांगण

**नाटके**

ब्रह्मकुमारी
नरो वा कुंजरो वा
वाजे पाऊल आपुले
टिळक आणि आगरकर

**आत्मचरित्र**

एक झाड आणि दोन पक्षी

# सिलिसबर्गची पत्रे....

विश्राम बेडेकर

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

सीलिसबर्गची पत्रे
पॉप्युलर प्रकाशन
( म–५१३ )

Silisburgchi Patre
(Marathi Collection of Letters)
Vishram Bedekar

© विश्राम बेडेकर

पहिली आवृत्ती १९८५/१९०७

किंमत : २० ००

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा लि
३५ सी प मालवीय मार्ग
ताडदेव,
मुंबई ४०००३४


मुद्रक
चिं स लाटकर
कल्पना मुद्रणालय
शिव-पार्वती
टिळक रोड
पुणे ४११०३०

१९७७–७८ साली एक छोटा चित्रपट काढण्याच्या निमित्ताने काही महिने स्वित्झर्लंडमध्ये महर्षी महेश योगी यांच्या आश्रमात राहण्याचा योग आला तिथून घरी सौ. मालती बेडेकर याना पाठवलेल्या पत्रांपैकी ही काही पत्रे

ही पत्रे १९८३ साली ‘ पुस्तक पंढरी ’ या दिवाळी अंकातून प्रथम प्रसिद्ध झाली.

१० ऑक्टोबर १९८५ **विश्राम बेडेकर**

# सीलिसबर्गची पत्रे....



## १

२० सप्टेंबर ७७, मुंबई

पंधरा मिनिटांनी दिल्लीला जाण्यासाठी निघणार. पुण्याहून निघताना तू सांगितल्याप्रमाणे इथल्या फ्लॅटच्या खिडक्या लावून त्यांचे बोल्ट बरोबर पडले आहेत हे बघितले आहे!

गॅसचा नळ, पाण्याच्या तोट्या, विजेचा मुख्य स्विच बंद केला. बाहेर पडताना घराला कुलूप घालायचे आणि ते नीट लागले आहे, याच्या खात्रीसाठी एकदा ओढून बघायचे हे डायरीत लिहून ठेवले आहे!

## २

२१ सप्टेंबर ७७, दिल्ली

काल रात्री साडेआठला इथे पोचलो. आज पुढे जात आहे. विमानाचा प्रवास सुखाचा झाला. शेजारच्या जागेवर पुण्याचे काळे नावाचे गृहस्थ होते. मी मराठी बोलणारा सोबती मिळालो याचा त्यांना फार आनंद झाला, असे त्यांनी मला सांगितले आणि लगेच ते हातातील ' टाईम्स ' वाचण्यात गढून गेले. ' टाईम्स 'मध्ये मोरारजी देसाईंच्या रोजच्या आहाराबद्दल सविस्तर माहिती होती. खारका, काजू,

खजूर, दही इत्यादि काळ्यानी कागद पेन्सिल काढली आणि प्रत्येक वस्तू, तिचे वजन आणि बाजारभावाप्रमाणे तिची किंमत याचा हिशेब मांडायला सुरुवात केली अर्धा लिटर दही, वीस ग्रॅम पिस्ते, शंभर ग्रॅम काजू असे करीत शेवटी मोरारजींच्या रोजच्या आहाराचा खर्च सरासरी शंभर रुपये भरला ! तो दाखवून काळे म्हणाले, " तरी हे जे पितात त्याला अजून पैसे पडत नाहीत हे आमचे नशीब ! "

रात्री महर्षी महेश योगींना भेटण्यासाठी अशोक हॉटेलमध्ये गेलो एकदा पत्रकारानी महर्षींना विचारले होते, " तुम्ही साधू म्हणवता, मग अशोकासारख्या हॉटेलमध्ये का राहता ? " महर्षींनी उत्तर दिले होते, " यापेक्षा उत्तम हॉटेल दिल्लीत नाही म्हणून ! "

महर्षींचे तत्त्वज्ञान संसारनिवृत्तीचे नाही निसर्गाचे नियम सांभाळून उत्तमातल्या उत्तम रीतीने जगावे, अशी वेदाची शिकवण असल्याचे महर्षी सांगतात ( अशोका या हॉटेलचे खरे नाव काय ? अशोक का अशोका ? आणि अशोक स्तंभ की अशोका स्तंभ ? ) हॉटेलच्या खोलीच्या दाराबाहेर पडलेल्या जोड्यांच्या ढिगावरून महर्षींच्या वसतिस्थानाचा पत्ता लगेच लागला पुढचे तिकीट हातात पडले झूरिकच्या विमानतळापासून पुढे सीलिसबर्गला जाण्याची सर्व व्यवस्था होईल, अशी ग्वाही मिळाली झूरिकपर्यंतच्या तिकिटाची किंमत रु १०५८२

# २

२३ सप्टेंबर ७७, सीलिसबर्ग, स्वित्झर्लंड

जय गुरुदेव ! ( म्हणजे आपले गुड मॉर्निंग, गुड नाईट किंवा गुड बाय ! ) काल संध्याकाळी सहा वाजता इथे पोचलो.

दिल्लीला रात्री अकरा वाजता विमानतळावर पोचलो प्रत्येक वेळी विमानाकडे निघालो की विमानाच्या अपघाताच्या आठवणी येतात थाय एअरलाइन्सला यात्रेसारखी गर्दी त्या गर्दीत मृत्यूचे भय विसरलो. माणसे एकेकट्याने घर करून राहतात गर्दीत राहात नाहीत म्हणून तर त्यांना मृत्यूचे भय इतके सारखे वाटत नसेल ?

तिकिटाच्या खिडकीपुढे शे दीडशे प्रवाशांची रांग फक्त दोनचार हिंदी, काही आफ्रिकेचे प्रवासी, बाकी सगळे युरोपिअन व अमेरिकन मुख्यतः हिप्पी पंथातले त्या सगळ्यांची आलिंगने, चुंबने ( आपसातली ! ) बघता बघता वेळ कसा गेला ते माझे पाय मोडकळीस आल्यावर मला कळले !

सकाळी फ्रॅंकफुर्टला विमान बदलले आणि दहा वाजता झूरिकला पोचलो



सीलिसबर्ग तिथून दोन तासाच्या रस्त्यावर आहे पण काही समजुतीच्या घोटाळ्यामुळे मला न्यायला झूरिकला गाडी आली तीच संध्याकाळी चार वाजता !

माझी खोली एखाद्या पंचतारांकित हॉटेलातल्या खोलीसारखी सजलेली आहे गालिचा, टेबलखुर्च्या, वॉर्डरोब, बिछाना, पांघरुणे, उबेची शेगडी आणि लागूनच मोठी बाथरूम पाहुणा आला म्हणजे प्रवासाचा शीण जाण्यासाठी दोन दिवस विश्रां ध्यावी असे महर्षींचे सांगणे असते त्यामुळे इथल्या कामाच्या स्वरूपाची अजून काहीच कल्पना आलेली नाही

ही इमारत पाच मजली आहे समोरच्या हमरस्त्याच्यावर एक लांबलचक पूल बांधून ती पलीकडल्या इमारतीस जोडलेली आहे खरं म्हणजे अशाच एकमेकांशी जोडलेल्या दोनतीन इमारती असाव्या ही सगळी एकेकाळी हॉटेल होती

माझ्या मजल्यावर दोन्ही बाजूला रांगेने खोल्या आहेत त्यात आणि एकंदर इमारतीच्या सगळ्या मजल्यावर मिळून पन्नास पाऊणशे तरुण युरोपिअन आणि अमेरिकन मुले राहतात सगळ्यासाठी तळमजल्यावर मोठे जेवणघर आहे फ्लॉरेन्टा लाकडाच्या उत्तम नक्षीकाम केलेल्या खुर्च्या, जेवणाची मोठी टेबले, छताला झुंबरे, एका बाजूची सगळी भिंत जवळजवळ काचेची तीतून दिसणारे आल्प्सचे प्रचंड डोंगर आणि त्याच्या पायथ्याशी असलेले लुझर्नचे सरोवर हा जेवणघराचा थाट स्वयंपाकघरात एका लहानशा खोलीएवढे शीतगृह, आणि त्यात कमरेएवढ्या उंची दुधाने आणि दह्याने–होय, दह्याने–भरलेले हंडे ! मधल्या वेळी, किंवा खरे म्हणजे येताजाता खाण्याची सोय करणारी खोली जेवणघराच्या दुसऱ्या बाजूला आहे तिथे टेबलावर हारीने ठेवलेले एक दीड गॅलन मापाचे प्लॅस्टिकचे उघडे डबे आहेत का पिस्ते, बदाम, मनुका, अक्रोड, खारका, खजूर यानी भरून ठेवलेले निरनिराळ्या ब्रेडस्नी आणि फळानी भरलेल्या पेटाऱ्याचीही रांग तेथे आहे. चारपाच तऱ्हेचे ज

आणि शेवटी एक मोठे भाडे इसबगोलाच्या लहानलहान गोळ्यानी भरलेलेही दिसले! ते नेहेमी लवकर संपते असे कळले।

या खोलीत फळाचे रस काढणारी यंत्रेही आहेत चहाकॉफीसाठी मूठ फिरविल्याबरोबर उकळते पाणी किंवा दूध मिळण्याची सोय आहे आणि दिवसरात्र सगळ्याना मुक्तद्वार आहे युरोपिअन स्वयपाक्यानी जेवणाचे शिजवलेले पदार्थ टेबलावर आणून ठेवले की प्रत्येकाने त्या टोपल्यातून, पातेल्यातून, प्लॅस्टिकच्या डब्यातून आपल्याला हवे ते पदार्थ हवे तितके घ्यायचे आणि जेवायचे पण सगळे शाकाहारी

हवी असली तर हिंदी लोकासाठी जेवणाची निराळी सोय महर्षी राहतात त्या वरच्या मजल्यावर आहे तिथे स्वयपाकासाठी हिंदुस्थानातून नेलेले दोन पंडित आहेत काल आलो, तेव्हा लगेच त्यानी चहा आणून खोलीत टेबलावर ठेवला चहाबरोबर एका बशीत एक केळे, दोन सफरचंदे, मुसुंबी आणि द्राक्षे होती आणि दुसरीत सुमारे तीनशे ग्रॅम काजू, पिस्ते आणि बदाम होते। रात्री जेवण म्हणजे फुलके, तीन भाज्या, डाळ, दही आणि खीर आणि सकाळी खिरीच्या ऐवजी जिलब्या होत्या।

या सगळ्यात प्रकृती टिकून राहते आहे याचेच मला कौतुक वाटत आहे।

# ४

४ ऑक्टोबर ७७

ही जागा खरीच रमणीय आहे

पाचदहा मोठाले डोंगर गोळा करावे ते घेऊन विमानातून खूप वर जावे आणि तिथून ते जमिनीवर इतस्ततः झोकून द्यावे त्याची बुडे स्थिर होईपर्यंत वाट बघावी आणि मग त्याच्या बेचक्यातून पाणी ओतावे इतके पाणी की त्यामुळे दक्षिणेतल्या कृष्णार्जुनसागरापासून उत्तरेतल्या भाकरानानगलसकट मधली सगळी धरणे आणि नद्या रित्या होतील। मग तयार होईल ते हे अर्ध्या स्वित्झर्लंडभर पसरलेले लुझर्नचे सरोवर। रात्री काठावरचे दिवे लागतात, तेव्हा माजराने दूध प्यावे तसे हे सरोवर लाटाच्या जिभल्या चाटीत प्रकाशाच्या धारा आपल्या पोटात रिचवीत असते सकाळच्या आडव्या उन्हात त्याचे पाणी लखलखू लागते तेव्हा सगळे अंग साबणाच्या फेसाने माखून हे आघोळीच्या तयारीत असलेले दिसते थोड्या वेळाने ऊन उभे होते आणि मग सगळ्या सरोवरात शुचिर्भूतपणाची तरतरी संचारल्याचा भास होतो आणि भोवतालचे डोंगर? कालिदास याना धरतीचे स्तन म्हणतो, तर या धिप्पाड डोंगराच्या वर आकाशात नाजुकपणाने स्वतःचा तोल साभाळीत

उभ्या असलेल्या वक्राकृती शिखराला महर्षी म्हणतात, " ही माता आहे शी इज अवर मदर " डोरोथी पार्कर इथे आली तेव्हा तिने म्हटले होते, " दे आर ब्यूटीफुल बट डंब ! "

( डोरोथी विनोदी लेखिका होती आणि व्रात्यही तिच्या वात्रटपणाला कटाळून तिच्या संपादकाने तिचे कामाचे टेबल इमारतीच्या कोपऱ्यातल्या एका अगदी लहान खोलीत नेऊन ठेवले डोरोथीने ती जागा बघून सपादकाला म्हटले, " तुम्ही आत येऊ नका कारण जागा इतकी लहान आहे की इथे आपल्याला व्यभिचार केल्याशिवाय बसताच यायचे नाही ! " मग सपादकाने ऑफिसातल्या सगळ्याना डोरोथीकडे जायचे नाही म्हणून ताकीद दिली तेव्हा तिने काय करावे ? आपल्या खोलीच्या दारावर तिने ' पुरुषाकरिता ' ( Men ) असे लिहून ठेवले ! ! मग घाईगर्दीने पाटलोणीची बटणे काढीत तिचे दार ढकलून आत येणाराला ती गोड हसत म्हणे, " प्लीज कम इन अँड मेक युवरसेल्फ कंफर्टेबल ! ' )

पण आप्सला नावे ठेवणाऱ्या डोरोथीपेक्षाही मला आपल्या साधूयोग्याचे जास्त नवल वाटते हे सगळे, संसार सोडून हिमालय आल्प्स पर्वत असल्या रम्य ठिकाणी जातात कशाकरिता ? तर तिथे जाऊन डोळे मिटून घेऊन ध्यान करण्यासाठी ! की याना समाधीच्या अवस्थेत ज्या विश्वाचे दर्शन होते, ते त्या समोरच्या स्वर्गतुल्य सृष्टीपेक्षा शतपटीने सुदर असते ? पण माझ्या उघड्या डोळ्याना हे समोर माडलेले सुदर सेटिंगच जास्त भुलविते खाद्यावर कॅमेरा, घेऊन बाहेर पडण्यासाठी आम्ही दार उघडतो, तेव्हा क्षणभर माझी फसगत होते एखाद्या भव्य सुसज्ज सिनेमा-स्टुडिओच्या दारात उभे असल्याचा भास होतो समोरची ही लहान बाग—तिच्या पलीकडच्या कुपणावरून बघितले की नजर अडीच तीन हजार फूट खाली कोसळते आणि लुझर्नच्या पाण्यावर विसावते समोरचे डोंगर, त्यावर इतस्ततः विखुरलेली घरे, गुरे, रस्ते आणि वृक्षाची दाट बने वळणावळणाने लचकणाऱ्या पायवाटा. दुसऱ्या बाजूला पाईन वृक्षाची दाट बने, धावणाऱ्या, खेळणाऱ्या मुलाच्या हसण्याखिदळण्यामुळे हिंदकळत असलेली पलीकडच्या बाजूला सरोवराच्या काठाकाठाने रेल्वे रस्ता गेला आहे मधूनमधून हिरव्या स्विस रेल्वेगाड्या त्यावरून धावतात त्याच्या धाडधाड आवाजाने सरोवर गडबडून जाते मग एकदमच तो आवाज गळा दाबल्यासारखा नाहीसा होतो गाडीही गडप होते कारण आता ती बोगद्यात गडप झालेली असते एखादे वेळी हा समोरचा देखावा असाच एकदम दिसेनासा होतो धुक्याचे लोट येतात ही बाग, समोरचा रस्ता, सगळ्या इमारती, त्यात गुरफटून जातात प्रकाशाने वास्तवाला आणलेला कर्कश कोरीव कातीवपणा गळून पडतो रंग, रेषा, आकृती याच्यावर नाजूकपणाचा, मोहकपणाचा मुलामा चढतो सगळ्या वास्तवाला बसल्या जागी धुक्यात अतर्धान पावण्याची दिव्य सिद्धी लाभते

धुक्याची एक गमत आहे त्यात सगळे हरपते अगदी दिशासुद्धा तरीही तुम्ही चालत राहिलात तर तुमची दिशा भूतकाळाकडे वळते ! अशाच एका धुक्यात मी मागे चालत गेलो आणि सुमारे चाळीस वर्षांपूर्वीच्या लडनच्या हिवाळ्यातल्या हाइडपार्क मधल्या धुक्यात जाऊन पोचलो ! दाट, अगदी आंधळे बनविणारे ते धुके पण त्यावेळच्या तरुणपणात डोळ्यापुढची स्वप्ने मात्र स्पष्ट दिसत होती आता गेल्या चाळीस वर्षांच्या चरित्राचा चित्रपट डोळ्यापुढे सरकतो

ग्रीक देवाचे पुराण सागते, त्याना जेव्हा जेव्हा कटाळा येई तेव्हा ते ऑलिंपस पर्वताच्या शिखरावर जमत, खाली पृथ्वीवरच्या माणसाच्या संसाराची नाटक बघायला ! शनिवार–रविवार आपण थिएटरात जमतो तसे ! माणसाचे अट्टाहास, हेवेदावे, भाडणे, कलागती, षड्‌विकाराच्या तडाख्यात सापडल्यामुळे होणारी तडफड आणि फसगत, स्वतःच्या खाजगी आयुष्याच्या डबक्याचे जग एकदर जगाच्या मानाने किती लहान आणि क्षुद्र आहे याबद्दलचे अज्ञान आणि त्यामुळे माडलेला आक्रोश ! हे सगळे बघत तो देवाचा कळप आपली करमणूक करून घेई पोट धरून हसत बसे कॉमिडी आणि ट्रॅजिडी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हणतात त्याचा अर्थ हाच तर नसेल ?

अशा एखाद्या वेळच्या धुक्यात, या ऑलिंपिक देवाच्या क्लबात मला अगदी ज्युनिअर अशी टेंपररी मेंबरशिप मिळून जाते ! अगदी शिखरावर नव्हे पण एखाद्या टेकाडावर बसून स्वतःच्या आयुष्याचे नाटक बघता येते सुदैव एव्हढेच की हे माझे नाटकही अलीकडे कॉमिडीची खसखस पिकवते ! पण आज इथे धुके नाही सगळीकडे स्वच्छ आहे इथल्या जगात आणि मनातही समोरचे सरोवर हातपाय पसरून सकाळच्या उन्हात ऐसपैस पहुडले आहे त्याच्या अंगाखांद्यावर बोटी, लॉंचेस, नावा खेळतात त्यामुळे पाण्याला गुदगुल्या होत असाव्या म्हणूनच बोटीच्या मागच्या पाण्यावर उन्हात चमचम करणाऱ्या हसतमुख लहरी उठवीत ते आनदात असते ! सरोवरातल्या एका दूरच्या कोपऱ्यात एक लहानशी नाव स्वतःतच मग्न आहे. इथे बागेत बाकावर एक तरुण मुलगा डोळे मिटून ऊन खात पडला आहे उन्हाला प्रकाश आहे पण ऊब नाही या थड वाऱ्यामुळे ते गारठले असावे या वाऱ्याला स्पर्श आहे, गध आहे, मजुळ ध्वनी आहे नसलीच तर फक्त नजर पण तीसुद्धा असावीच कारण एरव्ही समोरून येणाऱ्या तरुण स्विस मुलींचे केस भुरूभुरू उडविण्याचे त्याला सुचले नसते

त्या मुलीने आपल्या सोबत्याचा हात धरला आहे. दुसऱ्या हातात बाजाराच्या पिशव्या ती दोघे बरोबर चाललाहेत, पण शब्दही बोलत नाहीत. मी बघत होतो दोघेही रस्त्याच्या बाजूच्या घराच्या पायऱ्या चढून गेली तो तरुण वाकून कुलूप उघडीत होता. मुलगी त्याच्याकडे बघतच होती त्याने कुलूप काढले व तो उभा

त्या मुलीने एकदम टाचा उचावून त्याचा मुका घेतला आणि मग दोघे
काना घेऊन आत गेली
दार बद व्हायच्या आतच आतून दुसरी मुलगी बाहेर आली. गोरीपान,
सुदर ती साडी नेसली होती तिचे पाय चटचट पायऱ्या उतरून रस्त्यावर आले तिची माझ्याकडे नजर गेली तिने हात वर करून हलवला आणि हसत पुढे गेली ती माझ्या ओळखीची नव्हती तो हात कदाचित भोवतालच्या सौंदर्याला सलाम करण्यासाठी उचलला असेल. पण तिचे स्मित बघितले आणि उन्हाला ऊब आल्यासारखे मला वाटले



मी परत जाण्यासाठी वळलो शेजारच्या चर्चमधली घटा वाजू लागली मला वाटले, ही घटा आज दुसऱ्या कुणी न वाजविता स्वतःच वाजत असणार ! तानसेनच्या मेघमल्हारने मेघ गर्जू लागतात मग इथे गुजणाऱ्या आनदाच्या ...
मुळे घटेच्या लोलकाला नाचण्याची आणि ताल धरण्याची उबळ का येऊ

... ऑक्टोबरला घटस्थापना होती सकाळी फिरून परत आलो माझ्या
...्या मखमलीने मढविलेल्या उंबरठ्यावर चिठ्ठी पडली होती, ' महर्षी पूजा कर
आप आ जावे ' अशा रीतीने महर्षींच्या अतःपुराचे पुन्हा दर्शन घडले
...र्षींचे दर्शन होणेही दुर्लभ असते संभाषण तर कपिलाषष्ठीच्या योगावर खरे
याच इमारतीच्या वरच्या मजल्यावर ते राहतात. समोरच्या इमारतीत
...ाठशे माणसे बसू शकतील असा सभेचा दिवाणखाना आहे महर्षी रोज दहादा
...ने आमच्या मजल्यावर येतात मधल्या पुलावरून त्या असेंब्ली हॉलमध्ये

जातात पण ते जायला निघाले की सगळीकडे नाकेबंदी होते सगळ्या इमारतींमध्ये टेलिफोनने जागजागी खबर पोचते–' महर्षी निघाले जवान, तगड्या जर्मनाचे इथे निःशस्त्र रक्षकदल आहे त्यातली लष्करी शिस्तीतली मुले लगेच लिफ्टच्या दाराशी मधल्या रस्त्यावर, पुलावर, थेट असेंब्ली हॉलच्या दारापर्यंत रहदारी बंद करण्यासाठी उभी राहातात हॉलमध्ये, त्यांच्या जाण्यायेण्याच्या वाटेवर, हातात फुले घेऊन ती त्याना देण्याची संधी साधण्यासाठी दुतर्फा गर्दी हात जोडून उभी असते अशा महर्षींनी जर तुम्हाला भेटायला बोलाविले तर साहजिकच सगळीकडे गवगवा होतो काय बोलणे झाले याची परोक्ष-अपरोक्ष सारखी चौकशी सुरू होते मुंबईहून निघालो तेव्हा तिथल्या टीएम केंद्राच्या सगळ्यांनी सांगितले होते, " महर्षींची आणि तुमची दोनदा भेट होईल एकदा पोचल्यावर तुमचे क्षेमकुशल विचारण्यासाठी व दुसरी निरोप देण्यासाठी " पण आज अनेक वर्षे आपले डॉ गाडगीळ मुंबईला घटस्थापनेच्या दिवशी नेमाने येऊन तुला आणि मला महालक्ष्मीच्या दर्शनाला घेऊन जात असतात ती महालक्ष्मी पावली आणि महर्षींचे पुन्हा एकदा त्यांच्या अंतःपुरात दर्शन घडले

आत सगळीकडे दोन-अडीच इंच जाडीचा आपल्या मुंबईच्या घराच्या खिडक्यादाराना आहे तसल्या रंगाचा गालिचा पसरलेला आहे ज्या दिवाणखान्यात पूजा होती, तिथे मागच्या बाजूला थोडा देव्हाऱ्याच्या कमानीचा चित्राभास आहे खिडक्याना, दाराना भगव्या मखमलीचे पडदे आहेत भिंतीला लगटून, पंडिताना बसण्यासाठी गालिच्याच्याच रंगाची पाईनच्या लाकडाची चौरंगवजा आसने आहेत त्याना मागे कमानीदार टेकणे आहेत एका भिंतीवर कमळावर बसलेल्या गणपतीचे अर्धा पुरुष उंचीचे सुंदर चित्र रंगविले आहे

महर्षी बसले होते त्यांच्या मागेच ब्रम्हीभूत ब्रह्मानंद सरस्वती स्वामींची खूप मोठी रंगीत तसबीर आहे, महर्षींच्या पुढ्यात एक लांबचलांब, फूटभर उंचीचा पाईनवुडचा सुंदर चौरंग आहे त्यावर उंची तलम रेशमी चादर आहे तीवर पूजेची तयारी महर्षी ध्यानस्थ बसले आहेत संस्कृत पंडित आपापल्या आसनावर पोथ्या उघडून बसले आहेत महर्षींनी मघेच हलक्या आवाजात त्यांचे कल्याणशिष्य नंदकिशोर याना काही सांगितले मग कल्याणस्वामींनी एका पंडिताकडे हलकेच सरकत जाऊन काही सूचना दिली सगळ्या पंडितानी माना डोलावल्या आणि देवी भागवताच्या पाठाला सुरुवात झाली

पंडित चार आहेत त्यापैकी एक स्त्री दिल्ली युनिव्हर्सिटीमधील संस्कृतची पंडिता पंडितानी संस्कृत वाचायला सुरुवात केली तेव्हा संस्कृतला अलीकडे डेड लॅग्वेज ( मृत भाषा ) का म्हणतात याचा लगेच उलगडा झाला !

खोलीत उदबत्त्यांचा, फुलांचा घमघमाट होता पण संस्कृत शब्दोच्चाराच्या ज्ञातिवत संगीताचा झरा त्या रूक्ष, वैराण वाचनाच्या वाळवटात सुरुवातीलाच जो आटला तो आटलेलाच राहिला !

पण महर्षींचे तिकडे लक्ष नाही त्यांची ध्यानाची बैठक एकदा जी जमली होती, ती दोन तास तशीच राहिली दोन तास तर काहीच नव्हे महर्षी आमसभेला बसतात तेव्हा, अनेक वेळा सातआठ तास एक बैठक घालून बसतात शरीराची चुळबुळ नाही हातापायाला मुंग्या येत नाहीत कधीही देहधर्मासाठी उठावे लागण्याचीसुद्धा अडचण नाही फक्त तासअर्ध्यातासाने हृषिकेशहून आणलेल्या गंगेच्या पाण्याचे एक दोन घोट घ्यायचे तेवढाच व्यत्यय आठ तासात जांभई नाही, कंटाळा नाही सुरुवातीला असतो तेवढाच कणखर आवाज अखेरीस तेव्हढीच बुद्धीची ताकद जागी महर्षींच्या या सामर्थ्याचे साहजिकच सगळ्यांना कौतुक वाटते मागच्या वेळी महर्षींची इथे भेट झाली त्या दिवशी महर्षी सकाळी ११ वाजल्यापासून मांडी घालून बसले होते ते संध्याकाळचे आठ वाजेपर्यंत ! ते आपल्या निवासात परतले तेव्हा, साहजिकच मला वाटले की आजच्या दिवसाचे काम संपले पण रात्री साडेदहा वाजता मी निजायच्या तयारीत होतो तेव्हा निरोप आला " महर्षी आपसे मिलना चाहते है " गेलो, तो ते सकाळच्यासारखेच बोलण्यात–बुद्धीत ताजे बोलणे गोड काही फिल्मसच्या गोष्टी निघाल्या त्यांच्या इथेच निघालेल्या एका फिल्मबद्दल मी माझे मत मांडले, तेव्हा महर्षींनी इच्छा प्रगट केली, " हम देखना चाहते है " एकजण बाहेर गेला लगेच समोरच्या भिंतीतून एक कोनाडा बाहेर आला. ( आधी तो कोठे होता न कळे ! ) त्यात टी व्ही चा सेट होता पाच मिनिटात त्यावर महर्षींना हवी असलेली फिल्मसुद्धा आली !

इतक्यात जर्मनीहून दोन सायन्सचे प्रोफेसर आले ' यांच्याशी तुम्ही थोडे बोला ' असे मला सांगून महर्षी आत गेले ते प्रोफेसर्स विद्वान आणि विशेष म्हणजे सुजाण, प्रगल्भ, अभिरुचीचे दिसले त्यांच्यापैकी एकाने माझी थोडी ओळख झाल्यावर म्हटले, " आम्ही विज्ञानाचे अभ्यासू या तुमच्या हिंदू साधूच्या मागे आहोत याच तुम्हाला थोड आश्चर्यच वाटत असेल नाही ? " मी म्हटले, " तस थोडसं आहे खर. युरोपीय तत्त्वज्ञानाची पुस्तक वाचताना एका गोष्टीच मला नेहमी आश्चर्य वाटत आल आहे ग्रीकांच्यापासून सुरुवात करून अगदी चिनीजपान्यांच्या बुद्धिझमपर्यंतचे उल्लेख आणि विचार त्यात हमखास आढळतात पण हिंदूंच्या तत्त्वविचारांची त्यांना जाणीव असलेली क्वचितच दिसते " त्यांनी उत्तर दिले, " खरं म्हणजे जर्मनीला हिंदू तत्त्वविचाराचा परिचय होऊन अनेक दशक लोटली आहेत पण आजवर आमच्या दृष्टीन हिंदू तत्त्वज्ञान निवृत्तीची शिकवण देणारं

असं होत त्यामुळे युरोपने त्याच्याकडे पाठ फिरवली महर्षींनी वेदाचा प्रवृत्तिपर अर्थ लावला त्यामुळे युरोप-अमेरिकेतील तरुण पिढी महर्षींच्या शिकवणुकीकडे इतक्या मोठ्या प्रमाणावर ओढली गेली आहे "

साडेअकराला महर्षी परत आले. तेव्हा नदकिशोरजी टेलिफोनवर म्हणाले, "युरोपमधून आणखी काही मडळी आली आहेत त्याना महर्षी विश्राती घेत आहेत उद्या भेट होईल, असं सागू का ?" पण महर्षी लगेच उठले "आजच उरकून टाकलेल बरं " म्हणून निघाले देखील त्याच्याबरोबर मी सभेच्या हॉलमध्ये गेलो, तेव्हा हॉल प्रेक्षकानी गच्च भरला होता ! रात्रीचे बारा वाजले होते !


आज नवरात्राचे पाच दिवस होऊन गेले रोज देवी भागवताचा पाठ ऐकतो आहे ही विद्वान मडळी स्वतःला आणि श्रोत्याना सस्कृतच्या सौंदर्याला असे पारखे करून ठेवण्याचा का हट्ट धरून बसली आहेत याचा अचबा करतो आहे आधीच 'मेलेली' ही भाषा सध्या भारतात अधिकच मारली जात आहे हिचे आयुष्य आता कितीशी वर्षे शिल्लक असणार ? असा स्वतःशी वारंवार विचार करीत असतो

# ६

रोज सकाळी मी समोरच्या तळ्याच्या ( सरोवर म्हटले म्हणजे ते परके असल्यासारखे वाटते ! ) काठी फिरायला जातो बागेत एका बाकावर एक अमेरिकन तरुण बसला होता ओळख काढली त्यानेच म्हणाला, "तुम्ही हिंदुस्थानातून आलात होय ना ? मग माझं एक काम करता ? मला काही सस्कृत श्लोकातल्या शब्दाचा तुम्ही बरोबर उच्चार सागू शकाल नाही ?" मी थोड्या शरमिंदेपणाने म्हटले, "मी संस्कृतचा विद्यार्थी नाही पण पूर्वजाकडून आलेल्या नुसत्या वारशाच्या जोरावर काही जमले तर पाहातो " त्याने गीतेतले श्लोक घडाघडा म्हणायला सुरुवात केली सुदैवाने त्यातले पुष्कळसे माझ्या कानावरून बरेच वेळा गेले होते त्यामुळे मी त्याला थोडी मदत करू शकलो तो नुसता श्लोकच पाठ म्हणायचा, एवढेच नव्हे तर बायबलचे उतारे देताना जशी जॉन २ ७ अशी प्रकरणे आणि उताऱ्याचा क्रमाक देण्याची पद्धत आहे त्याप्रमाणे प्रत्येक श्लोकाचा भगवद्गीता ९–४ ( म्हणजे अध्याय नववा, श्लोक चौथा ) असा संदर्भही द्यायचा ! मला वाटले तो टीएम चळवळीतला आहे. पण तसे नव्हते तो कॅनडामध्ये एका शाळेत मास्तर होता देश बघण्यासाठी भ्रमती चालू होती आता

परत आयचे, नोकरी सोडायची आणि डोक्यात काही यांत्रिक शोधाची कल्पना आली होती, तिचा पाठपुरावा करायचा असा त्याचा पुढचा बेत होता. बोलता बोलता अगदी सहज तो म्हणून गेला, ' अहो ही संस्कृत भाषा इतकी सर्वांगसुंदर आहे की एकेकाळी खचितच ही जागतिक भाषा असली पाहिजे आणि डू यु नो, हल्ली अमेरिकेत जागजागी हायस्कुलातून संस्कृतचे वर्ग निघताहेत. आणि मुलं हौसेनं त्यात शिकत आहेत "

मग मला आठवले, ७३ साली अमेरिकेत ॲन् आर्बर इथे मिशिगन युनिव्हर्सिटीत गेलो होतो तिथे एका संध्याकाळी हिरवळीच्या मैदानावर झाडाखाली बसलो होतो मागच्या बाजूने तिघेजण गप्पा मारीत येत होते अगदी अस्खलित संस्कृत भाषेत ! माझ्या मागेच उभे राहिले त्यांच्या संस्कृत गप्पा चालूच होत्या मी चकित होऊन पाहिले एक हिंदी आणि दोन पांढरेफेक अमेरिकन !



महर्षींचे वर्ल्ड गव्हर्नमेंट ऑफ द एज ऑफ एन्लायटनमेंट आता आपल्या स्वतःच्या–म्हणजे या भोवतालच्या तरुण मुलामुलींच्या – पायावर उभे राहते आहे गेल्या आठवड्यात या ' सरकार 'च्या मंत्र्यांच्या नेमणुका झाल्या नंतर निरनिराळ्या देशातून, कमीत कमी २०–२५ देशातून तरुण मुलेमुली आली होती त्यांनी सहा महिन्याचा टी एम चा अभ्यासक्रम पुरा केला होता त्यांना आपापल्या देशात एक्झिक्युटिव्ह गव्हर्नर्स म्हणून टी एम चे काम करण्यासाठी नेमण्यात आले हा नेमणुकीचा समारंभ ' सरकारी ' रुबाबात साजरा झाला प्रत्येकाला गव्हर्नरचा पोषाख रेशमी पायघोळ झगे, गोंडे असलेल्या जरीच्या किनारीच्या रेशमी टोप्या झग्यावरून बांधण्यासाठी जरीचे दुपट्टे आणि हातात नेमणुकीच्या सनदी म्हणजे सोनेरी अक्षरात छापलेली मखमली गोंडे लोंबत असलेली तीनचार फूट लांबीची कागदाची गुंडाळी ! मग सगळ्यांच्या जाहीर शपथा खुद्द महर्षींचे मनसुद्धा त्या दिवशी खूप आनंदाने भरून आलेले दिसले त्यांनी म्हटले, ' माझ्या गुरुदेवांचं एक एक स्वप्न पुरं होत आहे तुम्ही त्यांच्या शिकवणुकींचे, ज्ञानाचे प्रतिनिधी आहात मानवी जीवन हा अपरिमित आनंद आहे ! इतकंच नव्हे,प्रत्येकाच्या वाट्याला तो निखालस येणारच आहे मात्र त्याने सदैव आपल्या अंतरात्म्याची

ओळख जिवत ठेवली पाहिजे या सर्व विश्वाचे जे आधारभूत तत्त्व आहे – अनबाउंडेड अवेअरनेस – त्याची सतत साधना केली पाहिजे एवढच हाच संदेश तुम्ही आपल्या देशातल्या बाधवाना सागायचा आहे मी खात्रीन सागतो की कुठल्याही समाजात, देशात, शभरातला एक माणूस जरी ही साधना करू लागला तरी त्या साधनेच्या प्रभावान गुन्हे, अपघात, आजार कमी होतील, सुबत्ता, सुख वाढेल, आजवरचे जग अजिबात बदलेल"

महर्षींचा एक लोभनीय विशेष आहे आपल्या कर्तृत्वाचे सगळे श्रेय ते प्रत्येक वेळी आपल्या गुरूना देतात. हा समारभ संपल्यावर ते म्हणाले, "आता कृतज्ञतेन आपण गुरुदेवाची पूजा करू या " मला वाटले, स्वामी ब्रह्मानद सरस्वतींवर आता चार फुले उधळली जातील एवढेच पण मधे ठेवलेल्या स्वामींच्या तसबिरीपुढे महर्षी हातात ज्योत घेऊन उभे राहिले आणि त्यानी पूजेचे मत्र म्हणायला सुरुवात केली आणि काय आश्चर्य ? ती दोनतीनशे मुलेमुली हात जोडून उभी राहिली आणि सगळ्यानी एकस्वराने पूजेचे सस्कृत मंत्र म्हणायला सुरुवात केली ! बिनचूक आणि अस्खलित महर्षी अक्षता, फुले, धूप उचलून तसबिरीपुढे ठेवू लागले तेव्हा त्याच्या स्वरात मिसळून शिवाय वर उठून येणारा तो प्रत्येक वेळचा 'समर्पयामि'चा सात्त्विक गोड घोष आठवला की अजून मन विस्मित होते समर्पणातल्या भावनेच्या आनदाचा निनाद त्या शब्दातून अशा उल्हासाने उमटलेला मी यापूर्वी कधी ऐकलेला आठवत नाही ऐकता ऐकता माझ्या डोळयात अश्रू उभे राहिले एक मन म्हणत होते, अरे हा नुसता तुझ्या मनात अजूनही दडून बसलेला स्वसंस्कृतीचा खोटा अभिमान आणि त्यामुळे वाटणारा आत्मगौरव याचा परिणाम आहे दुसरे म्हणे, 'अरे हे नाटक आहे का फार्स आहे नीट ठरव, म्हणजे रडावं का हसाव हे कळेल ' तिसरे मात्र म्हणत होते, 'बेडेकर, आजवर नुसता कुत्सेचा करटेपणा गोळा केलास, आता तरी डोळे उघडून बघ हे जग खरोखर सर्वांगीण विकासाच्या वाटेवरच आहे आणि शेवटी ते जिंकणार आहे मात्र जोवर ते आपल्या श्रद्धेसाठी सर्वस्व झोकून देणाऱ्या या तरुण मुलामुलींच्या पावलावर पावले टाकून चालत राहील तोवरच ?'

पन्नास वर्षांपूर्वी असेच म्हटले होते गाधींची भाषणे ऐकली तेव्हा वीस वर्षांपूर्वी विनोबाच्या पदयात्रेत दक्षिण महाराष्ट्रात आणि आसामात फिरलो होतो तेव्हाही असाच उल्हसित झालो होतो भगीरथाने प्रयत्नाची शर्थ केली आणि पृथ्वीवर गगा आणली तेव्हा मी जर असतो तर असेच आनदाने म्हटले असते की, आता आपण सगळे पावन होणार !

पण साठ कोटीचा आपला देश रोज नवी पापे जन्माला घालतो आहे त्या सगळ्याचे क्षालन करायला या एकट्या गगेचे पाणी कुठवर पुरे पडू शकेल ?

आॅक्टोबर ७७

काल महर्षींची भेट झाली माझ्या इथल्या कामाचे स्वरूप थोडेसे ठरले इथल्या फिल्म विभागात सगळ्या तऱ्हेची साधनसामग्री भरपूर आहे हवे तितके आणि तसे दिवे आहेत पाच सहा फिल्म कॅमेरे आहेत फिल्म जोडता यावी यासाठी अत्याधुनिक एडिटिंग ठेवले आहेत न्यूयॉर्कला संस्थेची स्वतःची लॅबोरेटरी आहे आणि तिथे उत्तमातले उत्तम ॲनिमेशन मशीनही आहे नाही फक्त स्टुडिओ पण खरे म्हणजे त्याची गरज नाही अनेक सुंदर देखाव्यानी भरलेला हा देशच एक मोठा स्टुडिओ आहे फिल्मची ददात नाही भारतात शभर दोनशे फूट कोडॅक्रोम फिल्म मिळवायची तर कोण यातायात पडते ! इथल्या कॅमेऱ्यातून महिन्याकाठी हजारो फुटाच्या हिशेबाने फिल्म वापरली जाते ! या सगळ्या फिल्म्स महर्षींच्या व्याख्यानाच्या महर्षींचा शब्दन्‌शब्द झेलायला त्याच्या भक्ताबरोबरच त्याचे कॅमेरेही तयार असतात

ही व्याख्याने अनेक वर्षे चालू आहेत आणि तितकीच वर्षे कॅमेऱ्याने टिपलेली आहेत तीही अनेक देशात अनेक खंडात दिलेली एज ऑफ एनलायटनमेंट सुरू झाले आहे, याची कल्पना महर्षींच्या डोक्यात आली आणि तिची द्वाही सगळ्या जगभर फिरवायची असे ठरले मग फक्त पधरा दिवसात, आशियात दिल्ली, युरोपमध्ये लडन, उत्तर अमेरिकेत मॉन्ट्रिआल आणि शिकागो, दक्षिण अमेरिकेत ब्यूॲनिस आयर आणि आफ्रिकेत सिएरा लिऑन इथे जाऊन महर्षींनी या कल्पनेचा पुकारा केला प्रत्येक ठिकाणी श्रोत्याची तोबा गर्दी. या सगळ्या फिल्मस् मी पाहिल्या लडनचा आल्बर्ट हॉल पाच सहा हजार माणसे बसतील एवढा मोठा आहे तिथे महर्षींच्या व्याख्यानाच्या वेळी श्रोत्याना रस्त्यावरही उभे राहावे लागलेले फिल्ममध्ये दिसले व्याखानाचा शब्दन्‌शब्द ऐकवणारी ती फिल्म मी बघितली तीन-साडेतीन तास चालली पण सगळे श्रोते जागच्या जागी खिळलेले

या सगळ्या फिल्म्समध्ये पडद्यावर सारखा महर्षींचा चेहरा दिसतो सारखे त्याचे शब्द कानावर आदळत असतात मी महर्षींना म्हटले, “ सामान्य प्रेक्षकाना कदाचित याचा थोड्या वेळाने कंटाळा येऊ लागेल तेव्हा मधूनमधून तुम्ही देता ती उदाहरणे व सागता त्या कल्पना जर चित्राच्या साहाय्याने आणखी स्पष्ट करता आल्या तर त्या मनावर अधिक ठसतील प्रेक्षकाच्या डोळ्याना थोडा विरंगुळा मिळेल या कल्पनाशी सबद्ध असे संगीत घातले तर शब्दाचा, आवाजाचा कटाळा येण्याचा संभव टळेल ” महर्षींना हे पटले असावे आता एक फिल्म निवडून ती या पद्धतीने करून पाहावयाची आहे दुसरेही एक काम घेतले आहे. गेल्या महिन्यात मी

इथे येण्यापूर्वी एक मोठे चर्चासत्र झाले. विषय होता लॉ, जस्टिस अँड रिहॅबिलिटेशन या चर्चासत्राला भारत, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, सिएरा लिऑन इथून वकील, जज्ज आणि काही शास्त्रज्ञ आले होते

चर्चा दोन दिवस चालली. प्रत्येक शब्द व्हिडिओ कॅमेऱ्याने टिपला आहे त्या व्हिडिओच्या टेप्स पंधरा तास चालतील एवढ्या आहेत या चर्चासत्राची एका तासात आवरेल अशी डॉक्युमेंटरी करता यावी, अशी महर्षींची इच्छा आहे प्रथम त्याचे स्क्रिप्ट तयार करावे असे ठरले व्हिडिओ टेप्सबरोबर लगेच माझ्या खोलीत टी व्ही. चा सेट आला व्हिडिओ टेप्सचे ढीग येऊन पडले. ग्रामोफोनवर तबकडी लावतो तशा या टेप्स टी व्ही सेटवरच्या यन्त्रावर ठेवायच्या मग बटन दाबले की चित्र आणि ध्वनी सुरू जी व्याख्याने नेहमीच्या फिल्मवर आहेत ती बघण्यासाठी खोलीतच १६ मिलिमीटरचा प्रोजेक्टर आणि पडदा आहे बिछान्यावर पडून लहर लागेल तेव्हा फिल्म्स बघत असतो अजून तरी आनंदात आहे

## ८

शभर-सव्वाशे गोऱ्या मुली सगळ्या साड्या, लुगडी नेसलेल्या उंची किंमती साड्या रोज नवी लुगडी जरीची रेशमी, गर्भरेशमी, काही शालू पैठण्यासुद्धा. हॉलमध्ये उत्सवाची तयारी आहे महर्षी आसनावर बसले आहेत समोर दीडदोनशे मुले सगळे झाकीच्या सुटाबुटात सीलिसबर्गच्या खेड्यातूनही काही प्रौढा आल्या आहेत त्याही श्रीमती साड्यात मिरवत आहेत

मनात सारखा विचार येतो या परदेशात, भिन्न संस्कृतीच्या हवेत या मुलींना ही इतकी उंची लुगडी मिळतात तरी कुठून ! मग ऐकले, इथे पुष्कळसे हिंदी पाहुणे येतात. काही सहकुटुंब ते आपल्या घरातली, शेजाऱ्याच्या ठेवणीतली लुगडी घेऊन येतात एकदोन लुगडी विकता आली तर सुंदर स्विस घड्याळ घेण्याइतके परकीय चलन मिळून जाते नाहीतर इथे खर्च करायला लागणारे स्विस फ्रॅंक आणायचे कुठून ? मागे फ्रान्सला गेलो तेव्हा पुष्कळ मंडळी बरोबर होती चांगली प्रतिष्ठित जिथे आम्ही निरनिराळ्या कुटुंबातून राहिलो, तिथे विकण्यासाठी बऱ्याच लहान मोठ्या जिनसाही पुष्कळांनी बरोबर नेल्या होत्या ज्यांचे पाहुणचाराचे अन्न आम्ही खाल्ले त्यानाच आम्ही ते ‘ किडुक मिडुक ’ विकले आणि त्याचे फ्रेंच फ्रॅंक केले. शेवटी तेथे भरलेल्या सभेत काही फ्रेंच वक्त्यानी याबद्दल आमची कानउघाडणीही केली

याच मंडळीपैकी काहींनी परत येताना शेकडो–हजारो रुपयाच्या परदेशी जिनसाही आणल्या मग भारत सरकारच्या सगळ्याना नोटिसा आल्या या वस्तूच्या खरेदीसाठी तुम्ही इतके परदेशी चलन कुठून मिळविलेत त्याचा हिशेब द्या ! पण आपल्याकडे मोठमोठ्या कारखानदाराप्रमाणेच मोठ्या समाजसेवक संस्थाचीही सरकारात वग असते त्या नोटिसा जागच्या जागी विरून गेल्या

मी इथे आलो तेव्हा रिझर्व्ह बँकेने रस्त्यातल्या खर्चासाठी मला कायद्याप्रमाणे पाच डॉलर्स दिले होते फ्रँकफूर्टला कॉफी, वर्तमानपत्र आणि झूरिकहून सीलिसबर्गला टेलिफोन करण्यात ते खर्च झाले मग सात आठ तास पाणीही प्यायला मिळण्याची मारामार पडली ! कारण हॉटेलात पाणी मागितले तेव्हा मिनरल वॉटरची बाटली पुढे आली ! किंमत एक स्विस फ्रँक ! आणि माझ्याजवळ स्विस पैसे नव्हते !

रिझर्व्ह बँकेचा परकीय चलनाचा कायदा मोडणे हा सामाजिक गुन्हा आहे की नैतिक ? कायदे करावयाचे ते समाजाची दानत टिकावी, सुधारावी म्हणून की ती सहज बिघडेल अशी स्थिती निर्माण करण्यासाठी ?

सध्या तरी येथे येऊन लुगडी विकण्याची पाहुण्याना मनाई आहे असे ऐकतो

## ९


महर्षींच्या दोन्ही बाजूला पुरुष दीडपुरुष उंचीचे फुलाचे ताटवे आहेत आजूबाजूला थोडे लहान असलेले ताटवे महर्षींच्या जवळच एक बराच मोठा पृथ्वीचा गोल समोरच्या रांगेत काही हिंदी बडी धेंडे, पोषाख चांगले पण चेहरे भांबावलेले महर्षींच्या मागे ज्योती मठाचे शंकराचार्य ब्रह्मानंद सरस्वती यांची मोठी रंगीत तसबीर. तसबीरीच्या खालीच अनेक देशांची फूटभर उंचीची निशाणे रोवलेली त्यामुळे शंकराचार्यांची जगद्गुरू ही पदवी थोडीशी सार्थ वाटते आहे समोर प्रेक्षकापुढेही अशीच निशाणे समोरच्या डेस्कवर खोचून ठेवलेली आहेत

कार्यक्रमाला सुरुवात करण्यासाठी स्विस भाटचारण जुन्या काळच्या पोशाखात उभे आहेत टेबलावर एक खूप मोठी केक आहे तिच्यावर दहा मेणबत्त्या रोवलेल्या आहेत या जागतिक सरकारच्या प्रत्येक मंत्र्याने पुढे येऊन जगात सत्त्वाचा आणि शांतीचा प्रसार करण्याबद्दलची बांधिलकी जाहीर केली आणि एक एक अशा सगळ्या मेणबत्त्या पेटविल्या प्रेक्षकानीही आपल्या समोरची निशाणे उंच उचलून त्याना साथ दिली नंतर थोडी भजने आणि मग संगीत मोझार्टच्या एका छोट्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६७७

दर आठपधरा दिवसानी असे उत्सव साजरे होतात दररोज रात्री नऊ वाजता इथे या जागतिक सरकारची सभा भरते. तीही अशाच थाटात. एखाद्या देशाचा राष्ट्रीय दिवस असेल तर तोही साजरा होतो. ( काल ग्वायनाचा झाला ) प्रत्येक मिनिस्टर गेल्या आठवड्याच्या जगभरच्या बातम्यामधून जगात सत्त्वाचा प्रभाव वाढतो आहे असे सुचविणाऱ्या बातम्याची निवड करून सागतो 'टी एम 'ची साधना करणाऱ्या छोट्या-बड्याची माहिती सागण्यात येते व याचा सत्कार होतो भारतातल्या सुप्रीम कोर्टाचे एक न्यायाधीश आणि माजी फायनान्स मिनिस्टर सुब्रह्मण्यम् याचा परवा असाच गैरहजेरीत सत्कार झाला मी इथे आलो त्याच्या आदल्याच दिवशी सध्याचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी एक दिवस इथे राहून गेले

आजच्या सभेला ब्याऐंशी वर्षांचे एक प्रख्यात युरोपीय शास्त्रज्ञ होते त्यानी थोडक्यात भाषण केले " पहिल्या महायुद्धात ( १९१४–१९१८ साली ) लढलो. केवळ आठ महिन्यात दहा लाख तरुणाची हत्या झाली फ्रान्समध्ये फ्लँडर्सच्या लढाईत तर एक दिवशी सकाळी केवळ पधरा मिनिटाच्या लढाईत सव्वालाख तरुण मृत्युमुखी पडले तेव्हाच शपथ घेतली की, जगलो तर शातीच्या कार्यासाठीच जगेन त्या जगण्याच्या प्रवासात आइन्स्टाइन, श्वाइत्झर टॉमस मान याच्यासारख्या महाभागाचा सहवास लाभला कशी बुद्धी झाली ते कळले नाही पण एकदम महर्षींच्या दर्शनाला याव असं वाटल, म्हणून इथे आलो आहे "



बाहेर इमारतीवर निरनिराळ्या राष्ट्राचे मोठे ध्वज आहेत मी मोजले, ते चौपन्न भरले समोरच्या बागेत छोटासा स्तंभ आहे. त्यावर सोनेरी वाटणारी या 'सरकार'ची मुद्रा आहे महाद्वारावर 'कॅपिटल ऑफ द वर्ल्ड गव्हर्नमेंट ऑफ द

एज ऑफ एन्लाइटनमेंट ' अशी द्वाही. रस्त्यावरून जाणारा एखादा मुशाफर थाबतो, ते वाचून थोडे हसतो आणि पुढे जातो पण ही मुले म्हणतात, सुवेजचा कालवा खोदणाऱ्या लेसेप्सलाही लोक प्रथम असेच हसले पॅरिसचा आयफेल मनोरा बाधू पाहणाऱ्याचीही लोकानी अशीच टवाळी केली होती आपण सगळ्या जगाचे आध्यात्मिक राज्यकर्ते आहो याबद्दल या मुलाच्या मनात बिलकूल शका नाही

# १०

ऑक्टो ७७

आज लुझर्नला गेलो होतो स्वित्झर्लंडमध्ये जी चार पाचच मोठी गावे आहेत त्यातले लुझर्न हे पाचवे सीलिंवर्गहून २५–३० मैलावर आहे

सोबतीला एक हिंदी स्नेही होते तिथे बराच वेळ शहरात फिरलो मग खरेदीसाठी एका मोठ्या डिपार्टमेंट स्टोअरमध्ये गेलो. या दुकानातून ससाराला लागणाऱ्या सर्व लहानमोठ्या जिनसा मिळतात दुकानभर एक हातगाडी घेऊन फिरायचे हव्या त्या वस्तू त्या हातगाडीत टाकीत गोळा करायच्या शेवटी काउंटरपाशी गाडी आणायची तिच्यातली एकेक वस्तू विकणाऱ्या मुलीपुढे ठेवायची यादीबरहुकूम पैशाचा हिशेब करायचा मग पैसे देऊन बाहेर पडायचे, अशी पद्धत

मी थोडी जुजबी खरेदी केली माझे सोबती हौशी इथे बरेच दिवस राहिलेले पण थोडेसे धादरट. त्यानी अर्धी गाडी खरेदीने भरली लहानमोठ्या सगळ्या जिनसा त्यात होत्या

मग ते म्हणाले, “ चला आता काउंटरवर हिशेब करू आणि पैसे चुकवून बाहेर पडू ” त्याप्रमाणे आम्ही पैसे देऊन बाहेर पडलो इतक्यात युनिफॉर्ममधला दुकानाचा एक सिक्युरिटी गार्ड समोर आला त्याने म्हटले, “ जरा तुमचे खरेदीचे बिल बघू ' त्याने पिशव्यातल्या जिनसा यादीबरोबर ताडून बघितल्या हिशेब चोख होता मग त्याने सावकाश म्हटले, “ आता तुमचे खिसे उलटे करून दाखवा. ” तरीही माझ्या स्नेह्याच्या चेहऱ्यावर भीतीचे किंवा कसलेही चिन्ह नाही पण खिशातून एक चाकू ( स्विस चाकू जगप्रसिद्ध आहेत ) रेझर ब्लेडचे पाकीट आणि असल्याच दोनतीन वस्तू निघाल्या खऱ्या माझे स्नेही साहजिकच गागरले खरेदीच्या गडबडीत पुष्कळदा माणूस लहान वस्तू पडतील म्हणून खिशात टाकतो पण या गार्डने त्याना ऑफिसात नेले तिथल्या मुख्याने सागितले, “ या वस्तूची किंमत आणि वर पन्नास फ्रँक दड भरा नाहीतर पोलिसाकडे चला ” मग मला आठवले माझे स्नेही सहज म्हणाले होते, “ आपण हिशेब करू आणि पैसे चुकवून

जाऊ ! " हा 'चुकवून' शब्द त्याच्या तोंडातून आला, तो फ्रॉइडच्या तत्त्वाप्रमा
मनातल्या ( किंवा खिशातल्या ) सुप्त जाणिवेमुळे तर नसेल !

पण मी त्याना चागला ओळखत होतो त्याच्या सालसपणाबद्दल, प्रामाणिकपणाबद्दल मला मुळीच शका नव्हती मी त्याची भलामण करण्याच्या भरात वेड्यासारखे बोलून गेलो " अहो हा माणूस असे कसे करील ? हा दिवसातू दोनदा टी एम करतो " हे ऐकल्याबरोबर त्या मुख्याने खूप छुश्शात माझ्या स्नेह्याकडे पाहिले मला वाटले हा आता चोरी करण्याबरोबरच टी एम करतो या बद्दलही त्याना दड करणार ! बहुताश कॅथॉलिक खिस्ती असलेल्या स्वित्झलडमध्ये टी एम बद्दल बरेच वैषम्य आहे हिंदू तत्त्वज्ञानाच्या या युरोपावरील स्वारीबद्दल खिश्चन पाद्री आणि मिशनरी फार चिंतातूर झालेले आहेत असे ऐकले

# ११

ऑक्टो.

आज नवमी नवरात्राचा शेवटचा दिवस आज देवी भागवत सपायलाच हवे पण ४००० श्लोक उरले आहेत म्हणजे कत्तलची रात्र महर्षी दहा वाजताच डो मिटून बसले आहेत काल खोलीत पडितासाठी चार-पाच आसने होती आज दुसऱ्या बाजूला आणखी तीन चार आसने आली आहेत पहिल्यासारखीच तोलामोलाची त्याच्यावर आज पडिताच्या बायका बसलेल्या आहेत गालावर हात ठेवून पण त्यामुळे एका दिवसात श्लोक कसे संपणार ?

साडेतीन पडित दोघे सस्कृत विद्वात म्हणून पगार घेत असलेले आणि तिसरी अभ्यासासाठी आलेली पडिता रुक्मिणी ती वाचायला लागली तेव्हा एका विद्वाना शिक्षकाचा आव आणून तिच्या वाचनात वारवार चुका काढायला सुरुवात केली पुढे मग त्याची स्वतःची वाचनाची पाळी आली, तेव्हा रुक्मिणीने त्याच्या इतक चुका काढल्या की सगळ्याची आवाज न करता हसण्याची मुश्किल होऊन गेली तेव्हा मग पोथीत छपाईच्या चुका फार आहेत अशी संपादणी सुरू केली आणि तीवर सगळ्याचे एकमत झाले ! चवथे उत्तरेकडचे एक अर्धे पडित आवाज छा उच्चार सगळ्यात स्पष्ट मात्र त्याना 'चमचोपनिषद' ( चापलुशी करणाऱ्याला हिंदीमध्ये 'चमचा' म्हणतात ) घनपाठी जटापाठी वैदिकासारखे उलटसुलट पाट आहे असे सगळ्याचे मत इथून कधी जावे लागेल याची बिचाऱ्याच्या पोटात ने धास्ती असल्यासारखे दिसते ते सदैव नदकिशोरच्या हरकामी सेवेत राहात एकद २००० फ्रॅकचा रेडिओ आला तेव्हा हे तिथे होते म्हणाले, " माताजीना ( म्हणज

त्याच्या पत्नीना सगळ्या पडिताच्या बायकाना मताजी म्हणायचे ) बातम्या ऐकायला मिळत नाहीत नदकिशोर म्हणाले " मग हा घेऊन जा " पण याचा इतर माताजीवर विपरीत परिणाम झाला मग प्रसादाला रोज नवीन पक्वान्न येऊ लागले आमचा स्वयपाकी रोज आम्हाला डिवचायचा, " आज श्रीखंड आलं आहे जिलबी आहे पण ती फक्त महर्षी आणि नंदकिशोरजी यानाच द्यायची आहे " महर्षी तर डोळे मिटून बसणार त्याना पक्वान्न कुणी करून आणले हे कसे कळायचे? मग माताजींच्या यजमानानी आज काय आणले आहे हे पूजेच्या सुरुवातीलाच सागायला सुरुवात केली पण पक्वान्न करणे सोपे आहे एका दिवसात देवी भागवताचे चार हजार श्लोक संपविणे तितके सोपे नाही आणि महर्षींनी सारखा धोशा सुरू ठेवला नि जेवायला सोडले नाही तर?

दीडच्या सुमाराला सगळ्याच्या जिभा भुकेमुळे लडखडायला लागल्या मग जेवणासाठी सगळ्याना तासभर सुट्टी मिळाली पण त्या तासातही महर्षींनी आपल्या एका पुतण्याला समोर बोलावून सागितले, " हे परत येईपर्यंत तू वाच " महर्षी सकाळी दहा वाजता आसन घालून बसले होते ते रात्री साडेआठला पोथी संपेपर्यंत वाचनाच्या पाळीप्रमाणे शेवटचा अध्याय रुक्मिणीच्या वाट्याला आला तिचे वाचन अस्खलित आहे त्या भरात तिने पोथीचा शेवटही वाचून टाकला " जी स्त्री या पोथीचे पठण करील ती अनेक पापाची धनी होईल "

मग आठ दिवस देवी भागवत ऐकत एका स्त्रीचे किंवा स्त्रीत्वाचे स्तवन करणारे आणि ऐकणारे आम्ही सगळे मनातून खजिल झालो आणि समाज, लोकाचार आणि परिस्थिती इत्यादी मोठमोठे शब्द वापरून पडितेची समजूत घालू लागलो ती सारखी हसत होती पण तिचे कितपत समाधान झाले ते कळले नाही!

# १२

ऑक्टो ७७

सकाळीच निरोप मिळाले आज पूजेला लवकर या सगळे जमले. पूजा किती तास चालणार अदाज येईना संपल्यावर पडिताना दक्षिणा, वस्त्रदान म्हणून काय मिळेल याची खालच्या आवाजात चर्चा सुरू झाली गेल्या वर्षी काय काय मिळाले याची उजळणी झाली सगळ्याचा अदाज ही पूजा पाचसहा तास तरी चालणार


मग महर्षी आले बसल्याबरोबर एका पडिताने रिपोर्ट दिला आज पाच पक्वान्ने आणली आहेत

महर्षींनी डोळे मिटले पूजेला सुरुवात झाली मागील बाजूला पन्नास गुलाबाचा

मोठा गुच्छ लावडा दोन्ही बाजूना पिवळ्या आणि पाढऱ्या गुलाबाचे तेवढेच मोठे दोन गुच्छ नदकिशोर आवाज न करता एक एक फूल तोडून, कुस्करून त्याच्या पाकळ्या ताटलीत भरत होते महर्षी त्या पाकळ्या मधून मधून मूर्तीला वहात होते पण साडेतीन पडिताच्या त्या मेळाव्याला दहा मिनिटे चालेल एवढी पूजा सागणे कठीण जाऊ लागले मग स्तोत्राना सुरूवात झाली शेवटी एका पडिताने स्वरचित कविता म्हटली आणि दुसऱ्यानी ती पहिल्या पडिताची स्वतःची कविता आहे हेही संस्कृतात गाऊन सागून टाकले एका माताजींनी यजमानाच्या खुणेनुसार मधेच एक आरती म्हणून टाकली त्याचवेळी सगळ्यानी मनात म्हटले असणार म्हणजे पूजेचा दमच उखडला आता आज दसऱ्याची मेजवानी बारा वाजताच झोडायला मिळणार दुपारी झोप आणि मग–

पण ११॥ वाजता महर्षी एकदम उठले म्हणाले, “ सगळ्याना सभेच्या हॉलमध्ये बोलवा तिथेच आज पुढची पूजा करू आणि मी इन्व्हिन्सिबिलिटी ऑफ ऑल नेशन्स या नव्या चळवळीची कल्पना काढली आहे, तिची मुहूर्तमेढ रोवू ” आणि चकित झालेले आम्ही सावरण्यापूर्वीच महर्षी हॉलच्या बाहेर गेले देखील मग कसले जेवण आणि कसले पक्वान्न ! सगळीकडे धावपळ सुरू झाली चारही हॉटेलातून निरोप गेले टेलिफोन वाजू लागले खोल्याखोल्यातून स्पीकर्स बोलायला लागले पूजेला न आलेली गोरी मुले आरामात जेवणघराकडे निघाली होती ती परत धावली

हॉलमध्ये एकच गडबड डायसवर कुस्करलेल्या फुलाचा सडा घालण्यात आला आसनाच्या मागे पुढे फुलाचे मोठमोठे गुच्छ उभे राहिले अल्पाइन शिंगे वाजवणारे स्विस चारणभाट मोटारीतून येऊन आपला समारंभाचा पोषाख चढवू लागले, शिंगे फुकून बघून साफ करू लागले हे शिंग दहाबारा फूट लाब असते त्याच्या एका टोकाला लहान पातेल्यासारखे तोड असते ते जमिनीवर ठेवायचे आणि



दुसऱ्या टोकाला फुकायचे आवाज खूप घुमणारा आणि गभीर निघतो मग एकाने निरोप आणला, ‘ महर्षींनी शंख आणि घटा आणायला सागितल्या आहेत. ’ त्याप्रमाणे हाती आली ती वाद्ये गोळा झाली

महर्षी हॉलमध्ये आले आणि सगळ्या आवाजाचा एकच कल्लोळ उडाला.

वाद्याचा चीत्कार, समोरचे डेस्क वडवणे—एकच धमाल झाली महर्षी आनदाने सारखे हसत होते आणखी जोराने म्हणून उत्तेजन देत होते तब्बल वीस मिनिटे हा प्रकार चालला मग महर्षींचे पाचदहा मिनिटाचे भाषण आणि पुन्हा तोच तसाच आवाजाचा उत्सव मग ब्रह्मानद स्वामींची पूजा सुरू झाली पुन्हा दीडदोनशे गोऱ्या गळ्यातून पूजा—स्तोत्रे—आरती माझ्या एका बाजूला एक स्वीड उभा होता दुसऱ्या बाजूला फ्रेंच पोरगा. दोघेही हात जोडून डोळे मिटून 'कर्पूर गौरम् करूणावतारम्' इत्यादी अस्खलितपणे म्हणत होते मी बावळटासारखा त्याच्याकडे आणि सगळ्याकडे बघत होतो पूजा आटोपल्यावर संस्कृत 'विद्वान' डायसवर आले वेदाच्या ऋचा झाल्या पुन्हा पडितानी स्वरचित कविता म्हटल्या एका माताजींनी मघाचीच आरती पुन्हा म्हटली महर्षींच्या नजरेत भरण्यासाठी जो तो डायसकडे धाव घेऊ लागला सुचेल ते म्हणू लागला महर्षी आनदाने त्या सगळ्याचा अर्थ इग्रजीत आपल्या श्रोत्याना समजावून सागत होते मग महर्षींचा पुतण्या उडी मारून पुढे आला आदल्या दिवशी रात्री तो दोन तास माझ्या खोलीत बसला होता हिंदी सिनेमासाठी गाणी लिहावी अशी त्याची महत्त्वाकाक्षा होती त्याने एक स्वरचित गाणे मला म्हणून दाखविले होते हीरो आणि हिरॉईन बागेत एकमेकाचा पाठलाग करताना ते कसे म्हणता येईल याचा अभिनयही करून दाखविला होता! ह्या पठ्याने तेच गाणे महर्षीसमोर म्हणून टाकले!

त्यानतर दीड तास महर्षींचे भाषण झाले ते आणखीही चालले असते पण मध्येच वॉशिंग्टनहून फोन आला वॉशिंग्टनचे पत्रकार महर्षींची मुलाखत मागत होते मग तिथेच एक लहान पेटीवजा टेलिफोन महर्षींच्यासमोर ठेवण्यात आला लाइन जोडली गेली वॉशिंग्टनचे निरनिराळे पत्रकार प्रश्न विचारू लागले महर्षींनी समोरच्या टेलिफोन पेटीकडे बघत सीलिवर्गमध्ये बसून उत्तरे द्यायला सुरुवात केली

अमेरिकेत टी.एम च्या विरुद्ध न्यू जर्सीच्या कोर्टात बरेच दिवस एक फिर्याद चालू होती टी एम चा प्रसार सारखा वाढतो आहे आणि त्याचा लोंढा थोपविण्यासाठी ख्रिश्चन देशातून अटीतटीचे प्रयत्न चालले आहेत न्यू जर्सीची फिर्याद हा त्यातलाच एक प्रयत्न टी एम हा हिंदू धर्माचा एक भाग आहे. तो अमेरिकेतल्या सरकारी आणि निमसरकारी शाळामधून शिकवला जाऊ नये कारण त्यामुळे सेपरेशन ऑफ द चर्च ॲन्ड द स्टेट या तत्त्वाचा भग होतो असे फिर्यादीचे म्हणणे होते

या फिर्यादीचा निकाल आज लागला होता आणि तो महर्षींच्या विरुद्ध गेला होता टी एम च्या अमेरिकेतील प्रचाराला हा एक मोठा धक्काच होता म्हणून पत्रकाराना महर्षींना या बाबतीत काय म्हणावयाचे आहे ते हवे होते अर्धापाऊण तास झाला मुलाखत चालूच होती आम्ही समोरचे प्रेक्षक नुसते बसून ऐकत होतो ४॥ वाजले


मग मी उठलो खाली जेवणघरात गेलो सगळे अन्न तसेच पडून होते निरनिराळ्या जेवणघरातून शेदोनशे माणसाचे अन्न मी चहा घेतला थोडी द्राक्षे आणि सफरचद ऊन खोलीत आलो दोन तासानी कंटाळा आला म्हणून पुन्हा हॉलमध्ये गेलो

अजून सभा चालूच होती वॉशिग्टनची मुलाखत संपली होती पण आता महर्षी न्यूयॉर्कच्या प्रेसशी बोलत होते म्हणजे या टेलिफोन संवादाला दोन तीन तास होऊन गेले होते

पण इथे हे नेहमीचेच आहे महर्षींनी अमेरिकेत एक कॉलेज चालविले आहे परवा त्या कॉलेजचा कसला तरी उत्सव होता शेकडो विद्यार्थी मुले तिथल्या अमेरिकेतल्या कॉलेज हॉलमध्ये जमली. त्यानी महर्षींना फोन केला आम्हाला तुमचा सदेश हवा आहे महर्षी त्यावेळी इथे सीलिसबर्गच्या सभेत बसले होते मग महर्षींनी त्या मुलासाठी भाषण केले सुमारे दीड तास ! भाषणाला अमेरिकेतल्या मुलाची वारंवार दाद मिळे आणि त्याच्या टाळ्या, हशे, उत्सवाची ओरड इथे आमच्या हॉलमध्ये अगदी स्पष्टपणे ऐकू येई

साडेआठ वाजता सभा संपली मग महर्षी पुन्हा साडेनऊला खाली आले आणि आपल्या सहकाऱ्याना घेऊन बसले ते रात्री दीड वाजेपर्यंत सकाळी साडेनऊ वाजता फिरायला गेलो वाटेत पाइन्सच्या वनात महर्षींचा पुतण्या भेटला. ‘इथे किती मौज आहे, इथे पुढे काय करणार, नवीन गाण्याच्या ओळी तयार होत आहेत असे काहीसे खूप आनदात बोलून पुढे गेला

अकरा वाजता फिरून परत आलो, तो समोरच्या पठारावर एक हेलिकॉप्टर उतरत होते. लिफ्टमधेच महर्षींचा पुतण्या भेटला खूप गडबडीत होता. मी विचारले, “ कसली गडबड ? ” त्याने उत्तर दिले, “ हिंदुस्थानला निघालो ! ”



मी म्हटले, " अरे, केव्हा ? " त्याने उत्तर दिले, " ते काय महर्षींचे हेलिकॉप्टर आले आहे " मी विचारले, " पण मघाशी तर तू—" तो म्हणाला, " मला तरी कुठे कल्पना होती ! अर्ध्या तासापूर्वी महर्षींचा निरोप आला, ' सामान बांध, भारतात चल " खोलीत आलो कपडे काढले. मथुरा पंडित चहा घेऊन आला बाहेर हेलिकॉप्टर महर्षींना घेऊन वर उडाले मथुराने ते बघून म्हटले, " चलीजे चले ! " त्याने पुढे म्हटले, " हा बहुतेक कालच्या हिंदी गाण्याचा परिणाम ! बाकी एरव्ही सुद्धा इथे हीच तऱ्हा आहे संध्याकाळचा स्वयपाक करून वाट बघतो तेव्हा कळते, सकाळी जेवलेला आणि संध्याकाळी अमुक कर म्हणून सांगून गेलेला माणूस कॅनडाला गेला म्हणून "

तेव्हा शक्यता अशीही आहे की एक दिवस तुझ्या दाराची घंटा वाजेल, तू त्रासून येऊन दार उघडशील आणि मला बघून एकदम म्हणशील, " अरे, तू ? " —केव्हाही !

# १२

नोव्हें ७७

परवा लुझर्नला जाऊन आलो परिषदेसाठी शास्त्रज्ञ जमले आहेत त्यांच्यापैकी एकाचे काल रात्री एकाएकी अंग दुखू लागले पाठीत उसणही भरली. इथल्या पाहुण्याची बडदास्त बादशाही त्याना मसाज करण्यासाठी लुझर्नच्या नर्सिंग होममध्ये न्यायचे ठरले वेळ होता म्हणून मीही गेलो

नर्सिंग होममधील नर्स चांगली तगडी दिसली तिने स्विस भाषेत आमच्या ड्रायव्हरला म्हटले, " या तुमच्या पेशंटला सांगा की, मसाजसाठी आम्ही त्याचे सगळे कपडे उतरवू आधी सांगितलेलं बरं म्हणजे मागाहून ' हे काय ' असा ओरडा नको " पण त्या शास्त्रज्ञानी आधी किंवा मागून ओरडा केलेला ऐकला नाही ! त्याची मालिश होईपर्यंत फिरावे म्हणून मी बाहेर पडलो एका रस्त्याला केस कापण्याचे दुकान दिसले. आतमध्ये एक पस्तिशीची, मोहक बांध्याची बाई कंगवा-कात्री घेऊन एका गिऱ्हाईकाचे केस कापत होती ! मी आश्चर्याने डोके खाजविले तेव्हा माझेही केस खूप वाढले असल्याचे एकदम लक्षात आले !

आत गेलो तो तिने घड्याळाकडे बघून सांगितले, " दुपारी दीड वाजता " पण मला त्या शास्त्रज्ञामुळे थांबता येणे शक्य नव्हते पण सीलिसबर्गला परत आल्यावर दिवसभर केसाचा फार त्रास होतो आहे हे लक्षात यायला लागले ! हजामत वाढल्यामुळे डोकेही दुखत आहे, असा भास व्हायला लागला ! म्हणून

शेवटी नाईलाज म्हणून काल पुन्हा लुझर्नला गेलो आणि त्या बाईच्या कातरीत मान अडकविली.

आज फार हलके वाटते आहे ! आजवर अनेक वेळा माझी हजामत झाली आहे पण काल बरे वाटले तसे पूर्वी कधी वाटले नाही ! ते तेलमालिशवाले शास्त्रज्ञही परवापासून परिषदेपुढे तरतरीत भाषणे करताहेत !

# १४

नोव्हे ७७

दोन तीन दिवस ही परिषद चालू आहे देशोदेशींच्या विद्वानांची गर्दी जमली आहे मागच्या अशाच एका परिषदेसाठी एकदोन नोबेल पदकधारी शास्त्रज्ञ आले होते यावेळी उत्तर युरोपमधून एक प्रोफेसर आले ते बरोबर नोबेल कमिटीच्या एका सभासदाना घेऊन महर्षींना ते कळले, तेव्हा ते उद्गारले, ' म्हणजे यदाचे . या शास्त्रातले नोबेल प्राइझ या प्रोफेसरना मिळणार ! " पुढे त्यावर्षी ते बक्षीस त्याच शास्त्रज्ञाना मिळाले खरे !

परिषदेपुढे मुख्य विषय टी एम ( त्याचे हिंदी नाव भावातीत ध्यान ) आणि पदार्थविज्ञान शास्त्रातले क्वांटम मेकॅनिक्स हे क्वांटम मेकॅनिक्स भोवतालच्या वास्तवाची उत्पत्ती कशी झाली असावी या प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या मार्गावर आहे आणि महर्षींच्या मते वेदांतामध्ये या प्रश्नाची आधीच झालेली उकल क्वांटम मेकॅनिक्सच्या खटपटीशी सुसंगत आणि पुष्कळ पुढे गेलेली आहे

या कठीण विषयातले काही कळो न कळो दोन्ही दिवस हॉल प्रेक्षकांनी सारखा भरलेला असे अत्यंत गूढ वाटणाऱ्या कल्पना, क्वांटमचे मॅथेमॅटिक्स, ( ते विज्ञानाचे पदवीधर आहेत असे ऐकले ) हे सगळे महर्षींना अगम्य होते असे चर्चेत कधी वाटले नाही त्यांचा एकच उद्देश केव्हातरी या शास्त्रज्ञांनी टी एम चे तत्त्वज्ञान पदार्थविज्ञानशास्त्राशी पूर्णपणे सुसंगत आहे, जिथे हिंदूंचा वेदांत आधीच शिरला आहे तिथे हे शास्त्र हळू हळू येऊन पोचत आहे असे उघड म्हणावे असा दिसतो सगळे शास्त्रज्ञ शास्त्राच्या चौकटीत बसून हिरीरीने चर्चा करतात, महर्षी म्हणतील त्याला मानही डोलावतात, पण प्रत्यक्ष शब्दाने मान्यता देताना दिसत नाहीत खाजगीत एकाने म्हटले, " अहो, असं काही म्हटलं तर आज आम्हाला दुसऱ्या देशातून भाषणाची निमंत्रण, प्रवासभत्ते मिळतात ते बुडतील ना ? ज्या युनिव्हर्सिटीतून काम करतो आहो त्या विचारतील ' शास्त्रज्ञ ', म्हणवता आणि ही खुळ माजविता ? ' म्हणजे नोकरीही जायची "

# १५



तुला एक साधा सोपा प्रश्न विचारतो ह  सांग बरं, या विश्वाची निर्मिती कशी झाली ? हात् तुझी ! फुकट तू पुण्यात इतकी वर्षं काढलीस ! अग सोप आहे हे आपल ते ब्रह्म असतं ना ? आता कमाल झाली  अग ब्रह्म म्हणजे काय, एवढ ठाऊक नाही तुला ? ब्रह्म म्हणजे सीमातीत केवल जागृती  ही जागृती सीमातीत असते, अपरिमित असते, अनिर्बंध असते, निर्गुण, निराकार आणि सर्वसाक्षी, सर्वव्यापी असते  ती सर्व निसर्गनियमाचा मूळ स्त्रोत असते  सर्व शक्याशक्यता भरघोस पिकविणारी शक्ती तिच्या अंगी असते  आणि आपण अशा सर्व शक्तिमान आहोत याची तिला जाणीव नसते, इतकी ती स्वतःत मग्न असते

ज्या क्षणी या कैवल्य शक्तीला आपण कैवल्य स्थिती आहोत याची जाणीव उत्पन्न होते त्याच क्षणी विश्वाच्या उत्पत्तीला सुरुवात होते  इंग्रजीत याला म्हणायच द ॲबसोल्यूट क्रिएट्स द रिलेटिव्ह  पण असं होत असतानासुद्धा मूळ कैवल्य स्थिती अबाधितच राहते  हे कसं काय म्हणून काय विचारतेस ? एखादा खूप मोठा जलाशय असतो नाही का ? त्याच्या पृष्ठभागावर तरग, लाटा उठतात तरी खालचा जलाशय स्वत'तच गुतलेला, शात, निःस्तब्ध असतो की नाही ? तसच हे

हेच तर आहे तुझ  आता मी हे सगळ सागितल्यावर मग ' मला ठाऊक आहे सगळ   म्हणून घमेंड सागतेस होय ? कुठ वाचलस ग तू हे ? पोथ्यापुराणातून ऐकलस, होय ना ! कशाला उगीच शकराचार्यांचं नाव घेतेस ? बरं  तुला आद्य शकराचार्यांनासुद्धा ठाऊक नसलेली गोष्ट सागतो  शकराचार्यांनी सागितल तरी गौतम बुद्धान ते ऐकून घेतल का ? इतर अनेक शहाण्यानी तुम्ही म्हणता हे खर कशावरून असा अनेक शतके वाद माजविलाच आहे का नाही ?

याच साध कारण, मला जे माहीत झालं आहे ते त्याच्या ज्ञानात नव्हत स्वप्नातही नव्हत

क्वाटम मेकॅनिक्सचं नाव ऐकलं आहेस कधी ? नाही ? मग अमेरिकेत टेलिफोन करून आपल्या इंजिनिअर मुलाला विचार त्याला माहीत असल तर ' पदार्थविज्ञान शास्त्रान उष्णता, विद्युत, लोहचुंबक शक्ती, ध्वनी इत्यादींचा वेगवेगळा शोध घेण्याचा उद्योग सुरू केला आणि आता ते क्वाटम मेकॅनिक्सच्या मार्फत खुद्द सृष्टीच्या निर्मितीच्या रहस्याचा उलगडा करण्याच्या उबरठ्यावर येऊन पोचले आहे  या मेकॅनिक्सचा एक महत्त्वाचा शोध असा आहे' जेव्हा एखादा प्रेक्षक ( ऑब्झर्वर ) एखाद्या वस्तूकडे नुसते बघतो तेव्हा त्या नुसत्या बघण्याने

बघितलेल्या वस्तूमध्ये फरक व्हायला सुरुवात होते ! नाही समजल ? अग लक्ष कुठ आहे तुझ ? असं कसं होईल म्हणून काय विचारतेस ? हे बघ, चाळीस वर्षांपूर्वी मी तुझ्याकडे प्रथम बघितल तेव्हा तुझ्यात फरक व्हायला लागला की नाही ? नुसत्या बघण्यान ! मग मी तुझ्याकडे बघत राहिलो आणि तू बदलत गेलीस आणि तू माझ्याकडे बघायला लागलीस आणि मी मूळचा माणूस म्हणून उरलोच नाही ! तसंच हे ! त्या जाणीवरहित कैवल्याला, ' अरे मी कैवल्य आहे वाटत ' असा विचार स्फुरला म्हणजे कैवल्य ऑब्झर्वर झाले त्यान स्वतःलाच ऑब्झर्व केल स्वतःकडे बघितल त्याबरोबर कैवल्यामध्ये फरक पडायला लागला ती सृष्टिनिर्मितीची सुरुवात आणि हे चालू असताना ऑब्झर्वर कैवल्य जसेच्या तसे नुसते बघत राहिले समजल आता ? अग अग चाललीस कुठे ? डोकं दुखायला लागल म्हणून उठायला काय झाल ? डोक दुखत असल तर फेरस फॉस वे फे फॉ ३० च्या गोळ्या घर का ! त्याच तू माझ्याबरोबर बाधून दिल्या होत्यास ना इथ येताना ? बस ! तुझ्या भल्याचंच सागतो आहे या सगळ्याचा आपल्या रोजच्या जगण्याशी संबध आहे

आपण ध्यान करतो–निदान रोज थोडा वेळ तरी ध्यानसाधना करावी अस ऐकत आलो आहो की नाही ? का करायचा हा ध्यानाचा खटाटोप ?

आपण जगत असतो म्हणजे काय करीत असतो ? कृती करीत असतो बोलतो म्हणजेसुद्धा कृतीच करतो पण ही कृतीची कल्पना सुरू कुठून होते ? विचारातून प्रत्येक गोष्ट आधी विचारात उपजते मग कृतीत अवतरते अगदी प्रत्येक गोष्ट उदाहरणार्थ मोटारचा कारब्युरेटर घे तो प्रथम कुठे तयार झाला ? मनात विचारानं त्याचा मनात नकाशा तयार केला मग आपण लोखड, पोलाद, इतर धातू या नकाशाप्रमाणे प्रत्यक्षात ठोकल्या वाकवल्या, सरळ केल्या हा विचार आलेला आपल्याला जाणवतो तो मुळात येतो कुठून ? तेच तर बघायचं असत त्या विचाराचा उलटा मागोवा घेत जर आपण गेलो तर कुठे पोहोचू ? या विचाराच स्वरूप आधी काय होत ? त्याच्या आधीच ? त्याच्याही आधीच, असं करीत गेलो तर कुठे पोहोचू ? तर अशा ठिकाणी नाही का पोहोचणार की जिथे विचार अजून उमटायचा आहे ? कुठल ते ठिकाण ? अस्सं बरोबर बोललीस थाबलं ना डोक ? ते ठिकाण म्हणजे मनातली असीम शातता आत्मसात करून असलेली केवल जागृती, अनवाऊडेड अवेअरनेस त्या कैवल्याशी ध्यानाच्या मार्गाने संबध जोडायचा. सज्जनसंगतीन आपल वर्तन थोडतरी सुधारत का नाही ? ऐतिहासिक वास्तूना भेट दिली म्हणजे जुन्या आठवर्णींनी तेवढ्यापुरत का होईना मन स्फुरून उठतं की नाही ? तसा या कैवल्याचा रोज साक्षात्कार घडला की त्याच्या ठिकाणी असलेल्या गुणधर्माचा वारसा आपल शरीर आणि मन


इंकान सागू लागत आणि मग आपल्या शरीरात, नर्व्हस सिस्टिममध्ये, वागण्यात, बौद्धिक सामर्थ्यात आश्चर्यजनक फरक पडतो अग या भाकडकथा नाहीत बघ पुन्हा ! आता मात्र तुझी गय–पण मी रोज ध्यान करीत असल्यामुळे शातता अशी वाणवतो आणि पुढचं तुला सागतो तुला ऐकायचं नसल तर कर्म तुझ ! ( म्हणजे बायका म्हणतात तसल हे शिवीगाळीतल कर्म नाही हे कर्म तुझ मागच्या जन्मीच ! )

हे बघ दुसर सगळ कशाला ? नुसत बौद्धिक सामर्थ्य खूप वाढत, एवढच्च घे ध्यान करताना नर्व्हस सिस्टिम शुद्ध होत जाते- तिच्यावरचे ताण–गौतमाच्या विपश्यना ध्यानात ज्याला सस्कार म्हणतात—ते नाहीसे होत जातात मग तेल दिलेल्या यत्राप्रमाणे शरीर आणि मन कमी घर्षणान, जास्त समर्थतेन काम करत, हे ओघानच आल पण एवढ पुरेसं नाही ध्यानाच्या पुढची पायरी सिद्धीची साधना सिद्धी पूर्वाचार्यांनी निषिद्ध मानल्या आहेत. आपणही त्या फार इष्ट म्हणून स्वीकारायच्या नाहीत, तर सिद्धीच्या सरावाचा उपयोग आत्मशुद्धी पुरताच करायचा या सिद्धीमुळे माणसं जमिनीवरून वर उचलली जातील हवेत उडतील भ्रमण करतील, पाहता पाहता अतर्धान पावतील हे मुळीच अशक्य नाही महर्षींच्या मते पतजलीची या बाबतीतील सूत्र अगदी स्पष्ट आणि निखालस खात्री देणारी आहेत

उडण्याच्या सिद्धीची खटपट करायची ती विमानाच्या तिकिटाचा खर्च वाचावा म्हणून नव्हे ! अनेक महिन्याच्या ध्यानाच्या आणि समाधीच्या सरावामुळे समाधीच्या एका तीव्र क्षणी सगळ्या शरीराच्या आणि मनाच्या शक्ती विलक्षण एकरूप होतात आपल्या मस्तकाच्या निरनिराळ्या भागात स्मरण, विचार, पृथःकरण, निर्णय इत्यादी निरनिराळ्या सामर्थ्याची स्थान आहेत या सामर्थ्यांचा वापर होत असताना विद्युत् लाटाची सारखी उलथाल चालते या लहरींचे आलेख आता एका सूक्ष्म संवेदनाक्षम यन्त्राच्या साहाय्यान काढता येतात इथ महर्षींच्या युनिव्हर्सिटीच एक सुसज्ज असं प्रयोगालय आहे तिथे या बाबतीत सारख संशोधन चालू असत विद्युत लहरींच्या या आलेखावरून असं दिसत की आलेखातल्या प्रत्येक रेषेच्या लहरींची कपन – फ्रिक्वेन्सीज ही मस्तकाच्या निरनिराळ्या भागाची निरनिराळी असतात म्हणजे विचार, स्मरण, पृथक्करण, निर्णय इत्यादी मेंदूच्या निरनिराळ्या शक्ती एक दिलान, एका दिशेन काम करीत आहेत अस नेहमीच्या व्यवहारात दिसत नाही उड्डाणाच्या समाधीच्या वेळी त्याच माणसाच्या या विविध बौद्धिक शक्तीच्या लहरीचे जे आलेख उमटतात ते आश्चर्यकारक रीतीन एकमेकाना परिपूरक असलेल्या स्वरूपाचे येतात अगदी प्रत्येक लेपेला म्हणजे पूर्वी मेंदूच्या यन्त्राची क्षमता त्याच्या निरनिराळ्या भागाच्या

आपसातल्या असहकारामुळे जी रुपयात आणा—दोन आणे असेल ती या समाधीच्या वेळी सोळा आणे वाढते आणि हाच परिणाम समाधी संपल्यावरही बराच काळ राहतो

मेंदू तोच पण समाधीमुळे तो कल्पनातीत कार्यक्षम होतो कारण काय ? याचा अर्थ काय ? आणि उलगडा कसा करायचा ? क्वाटम मेकॅनिक्सन आणखी एक



मजेदार शोध लावला आहे सुपर कडक्टिव्हिटीचा तुम्ही एखादा धातू थड करीत गेलात, तिला अगदी ॲबसोल्यूट झीरोच्या जवळपास पोचवली की, तिच्यात, आश्चर्यकारक नवीन गुणधर्म निर्माण होतात अस आढळून आल आहे लोखड असल तर, त्या कल्पनातीत थड अवस्थेत केवढ्याही मोठ्या लोहचुबकाचा त्यावर काहीही परिणाम होत नाही आणखीही पुष्कळ फरक पडतात असं का होत ? शोध घेतल्यावर पुढील गोष्टी आढळून आल्या लोखड नेहमीच्या उष्णतामानात असत तेव्हा त्याचे न्यूट्रॉन्स लोखडात सैरावैरा विखुरलेले असतात त्याच्या इतस्ततः चालणाऱ्या हालचालींना आणि गतीला घर्षणाचा अडथळा होतो. लोखड थड केल म्हणजे हेच न्यूट्रॉन्स एक दिलान ( कारण आता घर्षणाचा अडथळा नाहीसा झाला आहे ) इष्ट त्या दिशेन सहज आणि झटकन एकत्र होतात आणि बाहेरच्या ( उदाहरणार्थ चुबकाच्या आकर्षणशक्तीच्या ) परिणामाला तोड देण्यासाठी लोखडाच्या अगच सगळ बळ पुरेपूर एकवटत

ध्यानात आणि शेवटी उड्डाण समाधीत शरीर असच थड होत जात. नाडी मद होते श्वसनाचा वेग कमी होतो रक्ताच उष्णतामान कमी होत आणि मेंदू जसा काही सुपर कडक्टिव्हिटीचा फेनॉमिनन आत्मसात करतो म्हणून त्याच सामर्थ्य एकदम अतोनात वाढत

आता साग ग्र टीएम हे शास्त्रसिद्ध आहे अस सर्टिफिकेट द्यायला या शास्त्रज्ञानी खळखळ का करावी ?

इति श्रीभावातीत–ध्यानपुराणे प्रथमोऽध्यायः ।

# १६

नोव्हे ७७

या शास्त्रज्ञात दोघेतिघे हिंदी आहेत एक बेल्जममधले, दुसरे स्कॉटलडचे आणि तिसरे डॉ सुदर्शन बगलोरचे सध्या अमेरिकेत असतात डॉ सुदर्शन आतरराष्ट्रीय कीर्तीच्या शास्त्रज्ञात बरीच मान्यता मिळवून आहेत सभेतसुद्धा त्याचे बोलणे थोडक्यात असते पण त्याच्या बुद्धीची आणि प्रतिभेची तावडतोब छाप पडते. इग्रजी शब्दाची निवड चोखदळ वाक्ये लहान पण भरगच्च आशयाची आणि मुद्देसूद असे त्याच्या भाषणाचे स्वरूप असते वेळ आली तर उपनिषदातले चपखल उतारेही म्हणून मोकळे होतात त्याचे सगळे नाव डॉक्टर जॉर्ज सुदर्शन !

परवा जर्मनीहून दोन हिंदी तरुण आले होते त्याना पुढच्या अभ्यासासाठी भरघोस शिष्यवृत्त्या मिळालेल्या आहेत मी विचारले, या शिष्यवृत्त्यासाठी क्वालिफिकेशन ( गुणवत्ता ) काय लागते ? " एकाने मिष्किलपणे हसून उत्तर दिले, " ख्रिश्चन असण्याचे किंवा होण्याचे ! "

हे सगळे शास्त्रज्ञ सभेत महर्षींसमोर एक बोलतात आणि खाजगीत दुसरेच किंवा काहीजण अजिबात बोलत नाहीत मी म्हटले, " इतक्या चर्चेनतर आता तुम्ही टी एम हे शास्त्रशुद्ध आहे असे म्हणाल की नाही ? " तो नुसता हसला दुसरा म्हणाला, ' अहो टी एम च सोडा अमेरिकेत सायकिॲट्री आणि पॅरासायकॉलॉजी या गोष्टी इतक्या मान्यता पावल्या आहेत की नाही ? पण अमेरिकन सायन्स कॉंग्रेसमध्ये त्या लोकाचा समावेश झाला तेव्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष राजीनामा द्यायला निघाले "

तिसरा थोडक्यात म्हणाला " बरोबर आहे, प्रयोगशाळेत हार्ड रिझल्ट्स् दाखवा आणि मग आमच्या माडीला माडी लावून बसा "

हार्ड रिझल्ट्स् ! बटन दाबले की दिवा लागतो, हा हार्ड रिझल्ट जमिनीवर बसून गणित करून सोडलेले रॉकेट चद्रावर जाऊन पोहोचते हा हार्ड रिझल्ट मग इथल्या

प्रयोगालयात मिळालेले महर्षींचे म्हणणे बरोबर असल्याचे जे अनेक पुरावे सभेपुढे मांडले गेले त्याचे काय ? तिथेच काम करणारे एक पीएच.डी होते ते डोळे मिचकावून म्हणाले, " काही पुरावे विरुद्धही गेलेले आहेत आम्ही ते पुढे आणले नाहीत एवढच एक मोठे वृद्ध शास्त्रज्ञही होते त्यानी हसून म्हटले, " हे आम्ही भौतिक शास्त्राच्या प्रयोगातून सुद्धा करतो पुरावा थोडा प्रतिकूल असेल तर तो दडवून ठेवतो अनुकूल असेल, तो घेऊन प्रबध लिहून टाकतो मग कधी कधी त्या प्रबंधाला नोबेल प्राइज मिळत ! मागून दुसरे येतात. आमच्या चुका दुरुस्त करतात त्याबद्दल त्यानाही एखाद नोबेल मिळून जात ! "

पण महर्षी सगळ्याना दिपवील असा हार्ड रिझल्ट जगापुढे ठेवण्याच्या खटपटीत आहेत उड्डाणसिद्धीचा ! समाधीच्या एका तीव्र क्षणी सगळ्या शरीराला आणि मनाला एकदम झेप घ्यायची उबळ येते आणि तुम्हाला नकळत शरीर जमीन सोडते, हवेत तरगते, असा महर्षींचा शोध आहे याला आधार पातजलीचा इतर ध्यानात जसे मत्र किंवा मूर्ती याचे आलबन धरायचे तसे या समाधीत हवेत तरंगणाऱ्या कापसाच्या ततूचे आलबन धरावे असे पातजलीन म्हटले आहे

गेले वर्षभर महर्षींनी उड्डाणसिद्धीच्या कार्यक्रमाचा प्रचार करून युरोप-अमेरिकेत खळबळ उडवून दिली आहे मागे टाइम मॅगेझिनमध्ये हसत हवेत तरगणाऱ्या मुलाचे चित्र पाहिल्याचे तुला आठवत असेल अशीच चित्रे इग्लडच्या पत्रातून प्रसिद्ध झाली आहेत इथे उड्डाणसमाधी दाखविणारी पोस्टर्स बाहेर जागोजागी लागली आहेत इथले माहिती आणि शरीरी–अशरीरी वाणीचे खाते आपल्या कामात अत्यत तरबेज आहे त्याच्या दिमतीला युरोपात उत्तमपैकी असणारा छापखाना, छायाचित्रासाठी सुसज्ज स्टुडिओ, फिल्म कॅमेरे, व्हिडिओ, टेप्स, छायाचित्रकार आणि शिल्पकार असलेली मुले आणि स्वत' महर्षींचे कल्पक डोके इतकी सामग्री मग सगळीकडे धमाल उडवून दिली आहे यात नवल कसले ? असे ऐकतो की पहिली जाहिरात करावयाची ठरली तेव्हा हातावर द्रोणागिरी घेऊन जाणाऱ्या मारुतीचे चित्र काढावे आणि हा टी एम चा परिणाम असे म्हणावे असा एकाने बूट काढला पण तो मागे पडला कारण मारुतीला इग्रजी येत नव्हते हे नव्हे तर मारुतीची ओळख युरोप, अमेरिकेत नसणार म्हणून

आता उड्डाणसिद्धीच्या साधनेचा अभ्यासक्रम तयार झाला आहे त्यात दाखल होण्यासाठी तरुण मुलामुलींची गर्दी उसळते आहे आधी आठ-दहा महिने टी एम च्या ध्यानाचा अभ्यास करावयाचा मगच या पोस्ट ग्रॅज्युएट कोर्सला जायचे मुलाच्या सळसळीमुळे गजबजलेले इथले आवार सकाळी नऊच्या आणि सध्याकाळी पाचच्या सुमाराला अगदी निपचित होऊन जाते कारण सगळीजण तळघरातल्या मोठ्या हॉलमध्ये टी एम च्या ध्यानासाठी जातात एरवी सुटाबुटात तल्लखपणे

भिरभिरणारे तरुण अंगावरचे रात्रीचे मळके, कधी थोडे फाटलेले, तंग माडचोळणे घालून, खांद्यावर कांबळी टाकून जिन्यावरून शांतपणे खाली जातात संध्याकाळी एखादे वेळी एकदम शेसव्वाशे मुलांच्या आरोळ्या, किंचाळ्या, ओरडा. बुःभुकार, धडपडण्याचे आवाज यांचा एकच प्रचंड कोलाहल होतो विचारले तेव्हा समजले, उड्डाणसिद्धीची अवस्था जवळ आली म्हणजे शरीरातले सर्व आवेश अनावर होतात त्याचा हा परिणाम ! एकदा तर या ओरडण्याने पोलिस धावून आले होते ! मग कारण कळल्यावर डोकी खाजवीत निघून गेले !

स्कॉटलंडच्या हिंदी शास्त्रज्ञाला हा उड्डाणसिद्धीचा प्रयोग बघायचा होता पाहून झाल्यावर ते एवढेच म्हणाले, " उड्डाणाची इच्छा प्रबळ होते हे खरे आहे ! "

## १७

नोव्हें ७७

गेल्या आठवड्यात माझे स्क्रिप्टचे काम पुरे झाले महर्षी २ तारखेला आले ४–५–६ तारखांना एक शास्त्रज्ञांची परिषद होती ती सहा तारखेला रात्री बऱ्याच उशिरा संपली सातला सकाळी चहा प्यायला खाली गेलो, तेव्हा कळले महर्षी पहाटेच गेले ! कुणी म्हणे हिंदुस्थानला, कुणी सांगे साउथ अमेरिकेला ते कुठे जातात, केव्हा येणार याची कुणालाच खबर नसते कुणी म्हणतात, दहाबारा दिवसांनी येणार कुणाची बातमी महिनाअखेर ! एकाने म्हटले, " कुणी सांगावे ? मागे एकदा असेच गेले ते सहा महिने आलेच नाहीत ! "

आणि आता माझा कार्यक्रम ते आल्यानंतर ठरणार ! तूर्त लिहिलेल्या स्क्रिप्टमधे उपयोगी पडतील अशी काही चित्रे फिल्म-लायब्ररीत आहेत का ते बघतो आहे मदतीला दोघे आहेत एक अमेरिकन आणि दुसरा ब्रिटिश दोघेही हुशार, कामसू आहेत

## १८

नोव्हें ७७

आज आंबे खाल्ले !

इथल्या मुदपाकखान्याचा पण असावा की जगातले कुठलेही फळ इथे खायला मिळायला हवे

दोन महिने होत आले आतापर्यंत खाल्लेल्या फळाची यादी अशी माल्टाहून मोसंबी, स्पेनमधून लिंबे, स्वीडन आणि फ्रान्सची द्राक्षे, सिंगापूरहून अननस, इस्रायलमधून अजीर, संत्री आणि आंबे सगळीकडून सफरचंदे या शिवाय केळी, पीचीस, पेअर्स, अॅव्हकडोज मध्येच कुठून तरी उत्तम डाळिंबाच्या टोपल्याच्या टोपल्या आल्या आणखी एक लाल फळ आहे टोमॅटोच्या रंगाचे पण आकाराने त्याच्या दुप्पट अत्यंत गोड आणि चवदार उन्हाळ्यात इथे महिनाभर हापूसचे आंबे रोज खायला मिळतात याशिवाय सगळ्या सुक्या मेव्याचे ढीग !

कुणी केव्हाही यावे, हवे ते हवे तेवढे घ्यावे आणि खावे जेवण शाकाहारी असते तिखट, फोडणीचा वापर नाही तरीही चांगले चवदार लागते, सगळ्या स्वित्झर्लंडमध्ये शाकाहाराच्याच लोकप्रियतेची लाट आहे असे ऐकतो

इतकी मुले येऊन खातात. जेवतात सगळी गोरी आपल्या दृष्टीने एका निराळ्या मानववंशाची पण त्यांच्यातही आपसात परी आहेत राष्ट्रीय अभिनिवेशाचे भेद आहेत. युरोपियनाना, अमेरिकनाना तिटकारा फ्रेंचाना ब्रिटिशाचा, त्यामुळे जेवणाच्या टेबलावरसुद्धा लहानलहान निराळ्या पक्ती पडत असतात या मुलाकडे मी बघतो बरीचशी समृद्ध घरातली आहेत पण त्यांच्याही घरी खाण्याची इथल्याइतकी रेलचेल त्यानी खात्रीने बघितली नसेल मी लडनला, फ्रान्समध्ये निरनिराळ्या घरातून राहिलो आहे पण अशा ऐश्वर्याचे खाणे पाहिलेले आठवत नाही साहजिकच सगळे नेहेमी खूष असतात पुरुषाच्या हृदयाकडे जाणारा रस्ता त्याच्या पोटातून वर जातो हे आपल्याकडच्या जुन्या बायकाना माहीत असलेले रहस्य इथल्या व्यवस्थापकानी बरोबर ओळखले आहे !

साहजिकच तरुण मुलेच नव्हेत, म्हातारेकोतारेसुद्धा त्या जेवणघरात गेले की लालचावून जातात डॉक्टर माझ्याच वयाचे आहेत ते पुण्याच्या एका कॉलेजचे प्रमुख होते आता निवृत्त आहेत सरकारी नोकरीमुळे बोलण्या–वागण्यात आब राखून. स्वभावाने थंड आणि खरेच विद्वान आहेत, असे सगळे सांगतात पण ते जेवायच्या टेबलाशी आले की आज काय विशेष फर्माईश आहे याची आधी चौकशी करीत !

ते माझ्या खोलीत प्रथम आले त्याच्या आधी एकदोन दिवस मला एक विचित्र अनुभव आला होता सध्याकाळच्या अंधारात खोलीत पाऊल टाकले तेव्हा एकदम भास झाला, तू मला हाक मारते आहेस ! मग दिवा लावला तेव्हा झटकन कुणीतरी नाहीसे झाल्यासारखे वाटले ! रात्री स्वप्नही विचित्र पडले त्यात बरेच दिवसात तुझे पत्र आले नव्हते त्यामुळे विमनस्क झालो होतो

पहिल्या चार वाक्यातच डॉक्टरानी माहिती दिली “बायको वारली तिच्या

क्रियाकर्मासाठी भारतात गेलो होतो ! महर्षींनी आग्रह केला म्हणून परत अमेरिकेला जाताना इथे थाबलो आहे ! " ते ऐकून मी आणखी हबकलो ! परवा आपल्या सुप्रीम कोर्टाचे एक जज्ज इथे येऊन गेले त्याची बायको नुकतीच वारली आत्महत्येचे विचार डोक्यात फार घोटाळायला लागल्यामुळे ते महर्षींकडे मानसिक समाधान मिळावे यासाठी आले होते असे ऐकले पण तेव्हा तुझे पत्र आले होते !

डॉक्टर इथे तीन महिने राहिले ते आले तेव्हा इथल्या सस्कृत पडितामध्ये फार खळबळ उडाली ते किती दिवस राहणार आहेत महर्षी त्याना किती पैसे देतात, या आशकेने कुणाला काही सुचेनासे झाले शेवटी एकाने न राहवून त्याना प्रत्यक्षच विचारले ते लवकरच जाणार आहेत हे कळल्यावर सगळ्याचा जीव भाड्यात पडला ! आणि ते प्रत्यक्ष गेले तेव्हा निरोप देण्यासाठी सगळे फार आनदाने गोळा झाले ! डॉक्टर या वातावरणात फार रुजले नाहीत महर्षी आणि ते एकाच मजल्यावर राहात होते पण त्याच्या फारशा भेटीही झाल्या नसाव्यात डॉक्टर म्हणायचे, " त्यानी इथे बोलावले आहे ते बोलावतील तेव्हा जाईन " आणि महर्षींच्या मागे तर अनेक उद्योगाचा इतका जजाळ !

एकदा हे डॉक्टर आणि इतर पडित हॉलमधून बाहेर आले, तेव्हा माझी त्याची भेट झाली आतमध्ये महर्षी आपल्या जागतिक सरकारसाठी मंत्री, मुख्यमत्री, गव्हर्नर याच्या नेमणुका करीत होते मी सहज चौकशी केली, " आत काय चालल आहे ? " एकाने उत्तर दिले, " महर्षींच्या लीला ! " मी विचारले म्हणजे ? " तेव्हा उत्तर मिळाले, " सगळ्याना खूष ठेवण्याचा कार्यक्रम आहे ! "

टीएम विषयी इथे शास्त्रीय सशोधन चालते ते कितपत उपयोगी आहे, याबद्दल माझे डॉक्टराशी बोलणे झाले ते म्हणाले, " त्या बाबतीत अजून काही कळत नाही पण तुम्हाला एक गमत सागतो पाणिनी, प्रातिशाख्य वगैरेनी शब्दोच्चाराच्या पद्धतीची, परिणामाची आणि सिद्धाताची अत्यत रेखीव आणि अचूक वर्णने केली आहेत एकोणिसाव्या शतकात जेव्हा युरोपमध्ये इडॉलजीचा अभ्यास सुरू झाला तेव्हा त्या वेळच्या मोठ्या समजल्या गेलेल्या युरोपिअन विद्वानानी पाणिनीच्या उपपत्तींची अगदी कसून पाहणी केली आणि या सगळ्या थापा आहेत या संस्कृत वैय्याकरणानी लोकाच्या डोळ्यात नुसती धूळ फेकली अशी हेटाळणी केली हाच समज पन्नास–पाऊणशे वर्षे राहिला अलीकडे इलेक्टॉनिक्सचा प्रचार सुरू झाला नवीन नवीन अत्यत सूक्ष्मश्रवणी यंत्रे निघाली– त्याच्या मदतीने अलीकडच्या युरोपीय संस्कृत पडितानी पाणिनी इत्यादिकाच्या तत्त्वाची पुन्हा सविस्तर छाननी केली तेव्हा त्याना असे आढळून आले की, पाणिनीचे म्हणणे अगदी ततोतत बरोबर आहे ! दोन हजार वर्षांपूर्वी कसलेही

शास्त्रीय साधन, उपकरण उपलब्ध नसता अशा प्रकारच्या उच्चारपद्धतींची अगदी बिनचूक वर्णने लिहून ठेवणाऱ्या या महान हिंदू वैय्याकरण्यासमोर आपण सगळ्यांनी अत्यंत आदराने मस्तक लवविले पाहिजे असे आता सगळ्या युरोपीय पंडितांचे मत आहे !

मला वाटते डॉक्टर गेले ते थोडेसे इथून वैतागूनच इथल्या ज्ञानाचा खऱ्या संस्कृत विद्येशी काही संबंध नाही, त्यापेक्षा अमेरिकेतल्या आपल्या नातवडांना संस्कृत शिकवीत दिवस काढावे यातच आनंद आहे असे त्यांचे मत झाले असावे अमेरिकेत आपली मुले पाठविणाऱ्या भारतातल्या तुझ्यामाझ्यासारख्या आईबापांना जी विवंचना लागते तीच त्यांनाही होती अमेरिकेत त्यांची मुलगी राहते नोकरी करून जे पैसे शिल्लक टाकले होते ते मुलीला कसे मिळणार ही त्यांना विवंचना दुसऱ्या एका व्यवहार कुशल हिंदी स्नेह्यांनी सुचविले, ‘ मुलीला सांगा त्या पैशांचे दागिने करून अंगावर घालून इकडे घेऊन ये नाहीतर ते पैसे अजिबात फुकट जातील ! ”

चांगल्या चांगल्या माणसाच्या दानतीला कीड लावण्याचे रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे हे सामर्थ्य पुन्हा एकदा बघून मी चकित झालो !

डॉक्टरांना इथे संस्कृतच्या ज्ञानाची कदर दिसली नाही पण इथली गोरी मुलेमुली संस्कृतच्या आवडीत निमग्न आहेत दुपारी दोन तास असेंब्लीचा हॉल रहदारीला बंद असतो कारण डॉ रुक्मिणी पन्नास–पाऊणशे मुलींना घेऊन संस्कृतचे पाठ तेथे देत असते मुले साध्या बोलण्यात भगवद्गीतेतले उतारे देतात, वेळीअवेळी संस्कृत वाचनातल्या अडचणींचा उलगडा करायला सांगतात ! या हॉटेलातल्या प्रत्येक खोलीत, बहुधा या सगळ्या हॉटेलामधून म्हणजे सुमारे दोन-तीनशे खोल्यांतून लहानलहान स्पीकर्स लावले आहेत त्यांचे बटन दाबले म्हणजे सामवेद सुरू होतो विशेषत. रात्री झोपताना तो ऐकत पडायचे परवा खोलीत इथला इलेक्ट्रिशियन आला होता. तो म्हणाला, “ स्पीकर चेक करून जातो नाहीतर सामवेद ऐकू येत नसल्यामुळे फुकट तुमची अडचण होईल ! ! ” नंतर ठोकाठोक करून त्यातून वेद उमटल्यावर आनंदाने मान डोलावीत तो गेला !


माझा अमेरिकन मदतनीस एरिक ऐक्षेन त्याला महर्षींनी एक वर्षाचा टीएम चा कोर्स घ्यायला लावला होता त्यात त्याच्या सगळ्या शिल्लकीची पुंजी संपली सध्या नेहेमी अडचणीत असतो पण तो एखाद्या वेळी उत्साहाने आपल्या ध्यानावस्थेचे वर्णन करतो परवा म्हणाला, “ तुम्हाला कल्पना नाही, शरीरात हजार ठिकाणाहून हजार धारांनी सोमाचा प्रवाह वाहू लागतो अगदी ऋग्वेदाच्या नवव्या मंडलात वर्णन केलं आहे तसं हुबेहुब होतं ! ” आणि मी त्याच्याकडे अजागळासारखा बघत राहतो !

माझे वडील पट्टीचे वैदिक होते आज ते जिथे असतील तिथून माझ्याकडे बघत बरी ग्वोड मोडते आहे ' असे म्हणत हसत असतील !

# १९

११ नोव्हें ७७

आज सकाळी फिरायला गेलो तेव्हा ध्यानात आले, इथे सौंदर्य नुसते दिसत नाही ते ऐकूही येते !



मादाम बोव्हारी ' ही प्रसिद्ध कादंबरी लिहिणाऱ्या फ्लॉबेरला मोपासाने विचारले होते, " उत्तम लिहिता येण्यासाठी काय करावे ? " फ्लॉबेरने उत्तर दिले, " कुठल्याही गोष्टीकडे, अगदी एखादा उकिरडा असला, तरी त्याच्याकडे बघत बसावे त्या गोष्टीचा दुसऱ्या कुणाच्याही लक्षात न आलेला एखादा पैलू आपल्याला दिसेपर्यंत तिथून उठू नये- मग लिहिलत की तुम्ही जिंकालच ! "

फ्लॉबेरचे जग नुसत्या जडाने भरलेले असावे कारण हे जग ध्वनींनीसुद्धा सारखे गुंजते आहे हे त्याच्या लक्षात राहिले नसावे त्याच्या काळात मोटरींची घरघर आणि कर्णे, विमानाचे गडगडाट आणि शिट्टया रोजच्या व्यवहारात नव्हत्या तेव्हा श्रवणापेक्षा स्पर्शाची महती त्याच्या मनात अधिक ठसली असेल तर त्यात नवल नाही, पण आज फ्लॉबेर इथे असता, माझ्याबरोबर या पाईन्सच्या रानात फिरला असता, तर या इथल्या ध्वनींच्या दुनियेत त्याचे भान हरपून गेले असते इथे शांततेलासुद्धा शब्द आहेत, सूर्योदयालासुद्धा चाहूल आहे !

फिरायला जातो स्वित्झलडमधलासुद्धा हा अत्यंत रमणीय प्रदेश समजला जातो आल्प्स पर्वताच्या दोन तीन हजार फूट उंचीवर हे लहानसे खेडे वसलेले आहे पन्नास फूट चालले तरी चढ नाही तर उतार! हाकेच्या अंतरावर चहुबाजूंनी उंचच उंच डोंगर त्याच्या उतारावर घरे सुंदर, टुमदार आणि खिडक्यातल्या कुंड्यामधल्या फुलांनी भारावलेली त्याच्या लहान लहान खिडक्यांच्या किलकिल्या डोळ्यातून ते डोंगर गमतीने तुमच्याकडे पाहत आहेत असा सारखा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

भास होतो

पण मला अलीकडे वाटायला लागले आहे, वर्णनासाठी उपमेचा आश्रय घेणे म्हणजे अनुभव वाचकापर्यंत जसाच्या तसा पोचविण्याच्या जबाबदारीपासून दूर पळणे एखादा आळशी मास्तर वर्गात मुलाना उदाहरणे सागून स्वस्थ बसतो तसे ! उपमा सृष्टिरचनेच्या साम्यविरोधाच्या कोड्यावर, सृष्टीने आपल्यापासून लपवून ठेवलेल्या रहस्यावर किंवा विधात्याच्या वर्कशॉपमधल्या अनेक युक्त्याक्लृप्त्यावर प्रकाश टाकते खरी, पण ते समाधान मूलतः बौद्धिक असते अनुभवाची तीव्रता मनाला जाणवू देण्याची, अगदी भिडविण्याची शक्ती उपमेमध्ये क्वचितच असते

प्रत्येक घराभोवती चढावर किंवा उतारावर शेती दिसते शेतीला नीट रेखीव कुपणे आहेत मातीत निरनिराळ्या खताचा मद आहे पलीकडे पाईन्सच्या झाडाची अरण्ये—होय अरण्येच म्हणायची ती !—मधूनमधून दिसतात सगळीकडे हिरवेगार रस्त्यावरून एखाद-दुसरा मोटारीचा, जवळच्या एका लाकडे कापणाऱ्या गिरणीचा आवाज ऐकू येतो रगीबेरगी कपडे घेतलेली लहान बाळसेदार मुले शाळेत जाताना दिसतात त्याचे बोलणे हसणे काही काळ हवेत गुंजत रहाते पण या सगळ्याना बुडवून टाकणारा, भोवतालच्या सगळ्या सौंदर्याचे जयघोषाने स्वागत करीत असलेला आवाज म्हणजे गाईच्या गळ्यातल्या घटाचा !

किती त्या घटाचा गभीर ध्वनी आणि ती चरण्याच्या चालीवर धरलेली लय ! ‘ गाई घरा आल्या, घण घण घटा नाद ’ हे शब्द मी भारतात ऐकले होते पण भारतातल्या गाईच्या गळ्यातल्या घटा ‘ घणघण ’ वाजताना ऐकलेल्या आठवत नाहीत ‘ विनोबा ’वरच्या फिल्मच्या कामासाठी वर्ध्याला आपण बाबू कामताच्या घरी उतरलो होतो तिथे मागच्या भल्या मोठ्या कुरणात शेपन्नास गाई दुपारी चरायच्या पण त्याच्या घटा पूजेतल्या घटेपेक्षा जरा जास्त मोठ्याने वाजत होत्या एवढेच स्विस गाईच्या गळ्यातली घटा अर्ध्या व्हॉलीबॉलपेक्षा मोठी असावी आणि धातू काशाची सौलिसबर्गमधून थोडे बाहेर पडले की, या घटाचा नाद सारखा ऐकू येऊ लागतो आणि मग दोरी बाधून गुरू ओढावे तसा या घटाचा आवाज आपल्या लहरीवर नाचवीत तुम्हाला खेचीत नेतो मोकळ्या कुरणाच्या काठाशी तुम्ही पोचलात म्हणजे समोरचा देखावा तुम्हाला खिळवून ठेवतो तिथून पुढे पाऊल उचलणे जिवावर येते भलेमोठे कुरण सगळे गवताने हिरवेगार आणि यात पाच-दहा गाई घंटा वाजवीत चरत असलेल्या चरताना त्याच्या माना आणि मुडकी वरखाली होतात आणि घनपाठी ब्राह्मणाच्या ( वेद ) ‘ म्हणण्याची आठवण करून देतात !

परवा असाच उभा होतो या घणघणून गरजणाऱ्या आवाजाच्या धबधब्याखाली आघोळ करीत का बरे वाजत असतील या घंटा ? गुराच्या गळ्यात घटा

बांधण्याची कल्पना कुणी काढली ? कशासाठी ? श्वापदापासून थोडे रक्षण मिळावे म्हणून ? या गाई तर इथे कसला तरी आनंद हिरिरीने साजरा करीत आहेत ! पृथ्वीची हिरवी माया त्यांच्या समोर ओसंडून पसरली आहे म्हणून ? साहजिकच पृथ्वीच्या या प्रसादावर जगणारी ही गुरे कृतज्ञतेने रोज तिची पूजा–आरती अशा घंटा वाजवून करीत असतात !

मी त्या गाईंकडे जरा निरखून पाहिले सगळ्यांचा रंग भुरा जवळजवळ म्हशीसारखा इथल्या हवेपासून रक्षण व्हावे म्हणून सगळ्यांनी जसे काही थोडे केसाळ ओव्हरकोट घातले आहेत ! फ्रेंच गाई चणीने लहान त्यांचे रंग निरनिराळे आणि आकर्षक पण या गाई चांगल्या थोराड आहेत वजनाने–मग एकदम लक्षात आले, त्यांच्या रोजच्या दुधाचे वजन किती भरत असेल यांचा मी विचार करीत होतो आणि इथली माणसे यांच्या मासाच्या वजनाच्या हिशोबात असणार ! म्हणजे मधाशी पडलेल्या गाईंच्या गळ्यात घंटा बांधण्याची कल्पना कुणी काढली असेल या प्रश्नाचा उलगडा झाला ! जेव्हा इथे पहिला कत्तलखाना काढलेला गाईंनी बघितला असेल, तेव्हा त्यांच्यापैकीच एका विद्वान आणि तत्त्ववेत्त्या गाईने या सगळ्यांच्या गळ्यात घंटा बांधून दिलेल्या असणार ! या घंटाच्या आवाजाला अर्थ आहे ' मरण प्रकृतिःशरीरिणाम् ! ' हे ध्यानात ठेवा. बकरीचे आयुष्य ईद येईपर्यंत तसे तुमचे आयुष्य दूध आटेपर्यंत ! त्या कत्तलखान्याची आठवण सदैव जागती ठेवा आणि मग खुशाल चरून आजचा मिळालेला एक दिवस साजरा करा. हे सांगण्यासाठी ! ख्रिश्चन लोकांत नाही तरी मृत्यूची ग्वाही अशीच घंटा वाजवून देतातच !



पण त्या घंटाचा हा ' धर्म संदेश ' या गाई केव्हाच विसरलेल्या दिसल्या मध्येच एखादी आपले मुंडके वर उचली आणि मागे वळून जोरात खांदा खाजवू लागे तेव्हा तिच्या गळ्यातल्या घंटेचा आवाज आणि लय अशी जोरात वाढे की त्यातून ' गजकर्ण खाजविता मजा आला, चोळुनि चोळुनि लागे समाधी ' हे माधवराव जोश्यांच्या ' विनोद ' नाटकातले प्रसिद्ध गाणे स्पष्टपणे ऐकू येते आहे असा भास व्हावा !

तिथून मी थोड्या नाखुशीने पाऊल उचलले पुढचे वळण घेतले समोरच आल्प्स पर्वताचा एक प्रचंड सुळका त्यावर सकाळचे आडवे ऊन पडले होते.

प्रकाश—सावलीच्या करामतीमुळे त्या मुलुक्याची शीर न् शीर तट्ट फुगल्यासारखी झाली होती एखादा भीमकाय मल्ल पट काढून उभा असल्यासारखी दिसत होती घटाचा आवाज मागे गेला होता तरी बाजूची दरी त्याच्या पडसादाने अजून घुमत होतीच !


हळूहळू तोही आवाज मागे पडत चालला गाईच्या आणि माझ्यामध्ये पाईन वृक्षाचे एक मोठे बन आले. आतापर्यंत घटाचे टोले आणि काशातून उमटणारी त्याची आस यामुळे सगळ्या आवाजात एकसंध, प्रवाही संगीत जाणवत होते आता ती आस मधल्या झाडाच्या पालवीने पिऊन टाकायला सुरुवात केली होती टोल्याचे ठोकळेबाज स्वरूप जाणवू लागले होते त्याचा निनाद निमत चालला होता आससुद्धा सप्तकातल्या एखाददुसऱ्या सुरापुरती उरली हळू हळू आवाजाचे स्वरूप बदलले, हलकेफुलके झाले आणि ऐकता ऐकता मला नदीवरून येणाऱ्या सुवासिनींच्या कमरेवरच्या घागरीतल्या पाण्याच्या ' छलात् छल्, छलात् छल ' या श्रृंगारध्वनीची आठवण होऊ लागली ! शेवटी तर एवढ्या थोरल्या घटा अगदी किणकिण करीत असलेल्या वाटू लागल्या किती दबलेला तो किणकिण ध्वनी ? हातात तांब्या घेऊन माडीवर शेजघराकडे जाण्यासाठी जिना चढत असलेल्या नववधूच्या हातातल्या कंकणाच्या ध्वनीसारखा !

मी पाईन्सच्या बनात शिरलो आवाज थांबला असे वाटले पण मधूनच दहा ब्लँकेटाच्या आडून वाजवल्यासारख्या घटेचा ' टचटच ' असा आवाज ऐकू येई मी निरखून ऐकले आता तो घटेचा आवाज नव्हता झाडावरून गळून पडणाऱ्या एखाददुसऱ्या पानाचा तो आवाज होता ! जमिनीवर आदळताना होणारा नव्हे ते पानच झाडापासून तुटून पडताना त्याने घेतलेल्या निरोपाचा !

पाईन्सच्या रानात आतवर गेलो होतो सगळे रान निःश्वास टाकते आहे की ही दबत दबत शेवटी विरून जाणारी घटाची आस अजूनही ऐकू येते आहे ? ही ' खस—खस ' वंशाची, हे प्रथम लक्षात येईना त्या घनदाट राईत जागा सापडेल तिथून उन्हाचे किरण चोरपावलानी आत शिरले होते हिरवळीवर नाचू लागले होते त्याच्या बाळपावलाची तर ती चाहूल नसेल ?

तसाच बऱ्याचशा अंधारातून आणि थोड्या उजेडातून पुढे निघालो आता सगळे रान तुटक निःश्वासाच्या आवाजाने नव्हे एका सलग, सगळ्या ध्वनींनी भरलेल्या शांततेत निमग्न होते त्या शांततेत हा ध्वनी कसला बरे असेल ? बनाच्या मध्यभागी एक लहानशी मोकळी जागा होती भोवताली झाडे मधलाच तेव्हढा चौकोन लख्ख प्रकाशाने उजळलेला अंगठीतल्या हिऱ्यासारखा त्या प्रकाशाला मधुर ध्वनी असल्याचे जाणवत होते, मला वाटले, पांढऱ्या रंगाच्या पोटी सप्तरंगाचा स्पेक्ट्रम असतो, तसे सूर्याच्या प्रकाशात अनेक ध्वनींचे भांडार आहे

रोज पहाटे हे भांडार उघडते, तेव्हा लगेच पाखराची किलबिल मोकळी होते, जगाचे व्यवहार वाजू लागतात आकाश विमानांनी दुमदुमते !



फ्लॉबेरचे मन या आवाजाच्या दुनियेने गजबजून गेले असते तर मग त्याच्या लिहिण्याला आणखी एक डोळे दिपवणारे परिमाण लाभले असते का ? आणि मग मोपासासुद्धा जो वारंवार स्त्रीपुरुषाच्या नुसत्या तगड्यात अडकलेला दिसतो त्यातून सुटून तो निराळा तर झाला नसता ?

## ताजा कलम

आताच पापडाची भाजी खाल्ली ! कच्च्या पापडाचे लहानलहान तुकडे तुकडे करायचे आणि इतर भाज्यांसारखीच फोडणी वगैरे द्यायची तुकडे लाल होईपर्यंत थांबायचे, पाणी टाकायचे-आणि मुख्य म्हणजे सगळ्या तुकड्याचा लगदा होण्याच्या आधी भाजी उतरून घ्यायची पिठल्यासारखा आयत्या वेळी झटपट करता येण्यासारखा हा पदार्थ आहे मारवाडात फार प्रचारात आहे

भाजीत टोमॅटोच्या थोड्या फोडी टाकाव्यात

# २०

१८ नोव्हें ७७

दोन महिने होत आले भोवताली चोवीस तास दोनअडीचशे तरुण-तरुणी वावरताहेत पण इतक्या दिवसात कधी कुणी मोठ्याने उच्चारलेला शब्द ऐकला नाही भांडणतंट्याचे तर नाव नाही रानातून फिरायला जाताना कुणी भेटतात पण कुणाच्या तोंडात चोरून शिलगावलेली विडी दिसली नाही, कुठे मद्याच्या वासाचा भाससुद्धा झाला नाही इथून दोन तासाच्या रस्त्यावर जर्मनी आहे तिथे रस्त्यारस्त्याला सेक्स शॉप्स आहेत तिथे सकाळी-दुपारी-रात्री केव्हाही एकेका पुरुषाला दोन दोन मुली लटकून चालत असलेल्या दिसणे हे नेहमीचे दृश्य आहे इथे दोन महिन्यात एकदाही मुलगा आणि मुलगी लगट करीत चाललेली बघितली नाहीत इथेच नव्हे, सगळ्या स्वित्झर्लंडच्या संस्कृतीत ते फारसे दिसत नाही कुणाच्याही अंगावरच्या निळ्या जीन्स डोळ्याना खुपत नाहीत जवळ जवळ सगळ्याचे कपडे संभावित शिस्तीचे सूटबूट आणि नेकटाय आणि सगळी मुले सांगितलेल्या कामात गर्क त्या कामावर अन् महर्षींच्या सांगण्यावर अत्यंत श्रद्धा अगदी असीम श्रद्धा

परवा एका सभेत महर्षींना एका फिल्मची आठवण झाली कळले की, ती न्यूयॉर्कहून डेव्हलप होऊन आली पण झूरिकच्या विमानतळावर कस्टम्स मध्ये पडली आहे महर्षी म्हणाले, “ताबडतोब बघायला हवी.” माझा दुसरा मदतनीस रॉय उठला महर्षी म्हणाले, “किती वेळ लागेल?” झूरिक दोन तासाच्या रस्त्यावर म्हणजे जाणेयेणे, आणि कस्टम्स धरून किमान साडेचार तास पण महर्षी म्हणाले, “साडेचार का म्हणून? साडेतीन तासात व्हायला पाहिजे”

‘बरं’ म्हणून रॉय गाडी घेऊन झूरिकला निघाला. तो परत येऊन दारात फिल्म घेऊन उतरला तेव्हा मी तिथे होतो तीन तास वीस मिनिटात तो परतला होता! मी म्हटले, “अरे, एवढा घाट उतरायचा, पुन्हा चढायचा आणि पुढे झूरिक तू गाडीची स्पीड ठेवलीस तरी किती?” त्याने उत्तर दिले, “मी स्पीडॉमीटर बघितलाच नाही, नुसते घड्याळ बघितले!” मी जेव्हा म्हटले, “अरे, अशाने एखादे वेळी—” तेव्हा घाईने पुढे जात त्याने उत्तर दिले, ‘महर्षींनी सांगितल होत ना? झाल तर मग पुढची जबाबदारी त्याच्यावर. माझ्यावर नव्हतीच’

इथली ही जवळजवळ सगळी मुले काही वर्षांपूर्वी हिप्पी म्हणून जगभर हिंडत होती अफू, गांजा, हशिश, सगळ्या कैफाची चटक राहण्या-वागण्यात कमालीचा बेबंदपणा आयुष्य जगण्याचा एकच मार्ग-सर्वनाशाचा! आणि यातील अनेक हुशार आहेत गुणी आहेत खूप शिकलेली आहेत काही तर असाधारण

बुद्धिमत्तेची आहेत महर्षींनी इथे एक युनिव्हर्सिटी काढली आहे. तिचे उपकुलगुरू लॅरी लोमाश हे अशापैकी एक अठ्ठावीस–तिशीचे. पदार्थ–विज्ञानशास्त्रात पीएच डी ची पदवी घेतलेले त्याची अनेक भाषणे मी ऐकली. अनेक प्रसिद्ध शास्त्रज्ञ इथे येऊन जातात त्याच्याशी टी एम च्या समर्थनाची भूमिका घेऊन डॉ. लोमाश याचे वाद चालतात. पण त्याना निरुत्तर झालेले अजून मी बघितले नाही भाषणाची भाषा दर्जेदार, विषयावर अगदी पक्की पकड तो सोपा करून सागण्याची असाधारण समज. अभिजात अभिरूचीचा विनोद अशा अनेक गुणामुळे त्याचे भाषण नेहेमी ऐकावेसे वाटते.

या युनिव्हर्सिटीतला एकजण म्हणाला, " टी एम मध्ये आलो म्हणून वाचलो एरव्ही कुठेतरी भरकटत गेलो असतो नाही तर आत्महत्त्या तरी केली असती ! "

हीच बहुतेक सगळ्याची कहाणी

# २१

१२ डिसें ७७


एरिक ऐझेन अमेरिकन आहे. परितशीचा. बायको आहे–होती–आता घटस्फोट झाला आहे एक मुलगी आहे ऐझेन त्याना पोसतो ऐझेन कॅमेरामन आहे उत्तम फिल्म एडिटर आहे. हरकामाचा हमालही आहे चोवीस तास काम इथे डॉ रिग्बी म्हणून आहेत चागल्या ख्यातीचे सायकिॲट्रिस्ट आहेत ते म्हणत होते, " ऐझेनला सतत कामाची गरज आहे तरच त्याच डोक ठिकाणावर राहील ! डॉ. रिग्बी चागले हुशार आहेत आपल्या विषयात घट्ट आहेत पण गमतीची गोष्ट एवढीच की खुद्द त्याच्या विषयीही इतराचे मत असेच आहे !

ऐझेनचा विचार आला की मन थोडे अस्वस्थ होते एकाकी, निर्धन. अडीअडचणीत सादीकोपऱ्यात राहायचे. पण इथे राहायचे. महर्षींच्या जवळ पण इथला थारा खरा नाही इथे अमेरिकनाचा सुत दुस्वास आहे एकेक करीत निघून गेलेल्या अमेरिकनापैकी आज ऐझेन इथे शेवटचा

परवा संध्याकाळी ऐझेनच्या कॅमेरा डिपार्टमेंटमध्ये गेलो होतो तीन खोल्या एडिटिंगसाठी तीनचार टेबले शेकडो फिल्मसच्या डब्यानी भरलेल्या रॅक्स टेबलावर कागदाचे, इथल्या प्रकाशनाचे ढीग, दिव्याच्या तारा, पेट्या, त्याचे स्टॅंड्स पाय ठेवायला जागा नाही एका पेटीवर लहानसे ताट होते त्यात उदबत्त्या, निराजन, थोडी फुले होती जवळच्या पेटीवर एक लहानशी तस्वीर स्वामी ब्रह्मानद सरस्वतींची

ऐझेन म्हणाला " आज गुरुदेवाची पूजा करायची आहे दहा वर्षे झाली बरोबर आजच्या दिवशी मी टी एम च्या साधनेला सुरुवात केली एकही दिवस चुकला नाही ! "

ऐझेन हारवर्ड युनिव्हर्सिटीचा पदवीधर आहे. आयुष्य अर्थहीन वाटू लागले म्हणून एकदा पार गांगरून गेला मग स्वतःला विसरण्यासाठी कैफाचा आधार सुरू झाला तो सांगतो " एकदा ड्रग घेतला की दोनतीन तास सगळी शक्ती, सगळे सुख मुसळधार पावसासारखे अंगभर कोसळते पण मग पुढे दोन तीन आठवडे मनाची आणि शरीराची पार दुर्दशा नंतर फ्रान्सला गेलो " तिथे दोन वर्षे होता अस्तित्व—वादाचा भक्त बनला त्यानेही सावरला नाही त्यानंतर हे टी एम



सगळे सांगतात, प्रथम इथे आला तेव्हा ऐझेन धिप्पाड राक्षसासारखा दिसे आता ऐझेनचे मुख्य बळ फक्त इच्छाशक्तीचे आहे आणि त्याहीपेक्षा महर्षींच्या शिकवणुकीवरील भरवशाचे

एकदा ऐझेन आणि मी जर्मनीला गेलो

हाफटन ट्रक होता ऐझेन चालवीत होता शंभर—दीडशे मैल जायचे होते मुक्काम पन्नास साठ मैल राहिल्यावर गाडी एकदम थांबली. बंद पडली. ॲक्सिलरेटरचा करंगळीएवढा जाड लोखंडी रॉड तुटला होता !

आम्ही उतरलो बाहेर कडाक्याची थंडी स्वित्झर्लंडमधल्या हमरस्त्याच्या बाजूला अंतराअंतराने लहान पेट्या ठोकलेले खांब असतात. आपल्याकडे आगीचे बंब बोलावण्यासाठी फायर हायड्रंटस असतात तशासारखे त्या पेटीच्या बाहेरची मूठ फिरवायची जरा वेळाने दुसऱ्या बाजूने कुणी तरी हॅलो ' म्हणत, मग आपण त्याला आमची गाडी अमक्या रस्त्यावर अमक्या मैलावर बंद पडली आहे असे सांगायचे म्हणजे साधारण अर्ध्याएक तासात मदत येऊन पोचते ऐझेनने सांगितले " तुम्ही हे हॅंडल फिरवून इथे वाट बघा कोणी ' हॅलो ' म्हटल की मला बोलवा मग मी जर्मनमध्ये त्याला काय ते सांगेन तोवर मी गाडीचं काही करता

येईल का बघतो ”

मी ती मूठ फिरवली पेटीसमोर वाट बघत उभा राहिलो बर्फगार वाऱ्याने जागच्या जागी काकडून गेलो पण बघितले तो ऐझेन बाजूच्या उतारावर काहीतरी शोधत होता मी विचारले, “ काय रे ? ” तो म्हणाला, “ एखादी काटकी मिळते का बघतो ” त्याची कल्पना त्या तुटलेल्या लोखंडी रॉडच्या जागी तेवढीच जाड काटकी बसवून तो अर्ध्या टनाचा ट्रक पुढे नेता येईल अशी होती ! मी म्हटले, “ वेड तर नाही लागल तुला ? अरे–” पण त्याने उत्तर दिले, “ मिस्टर वेडेकर, महर्षी नेहमी सांगतात, ‘ डोंट गिव्ह अप–करा म्हणजे होईल आणि होईलच अशी खात्री बाळगा म्हणजे झालेच ! ’

मी त्या दुसऱ्या टोकाकडून येणाऱ्या हॅलोची वाट पाहत उभा राहिलो थोड्याच वेळात गाडी सुरू झाल्याचा आवाज ऐकला. ऐझेन खिडकीतून वाकून म्हणत होता, “ चला चाऊ ! ”

मी त्याच्या शेजारी बसलो त्याने झाडाची एक लहान फांदी सोलून तासून ॲक्सेलरेटरला बसवली होती ! लोखंडी रॉडला जिथे नट आणि बोल्ट होते, तिथे ती फांदी जाड स्विस टेपने आवळून टाकली होती ! गाडी सुरू तर झाली. आता ही चालणार किती दूर ? मी शहाणपणाचा आव आणीत म्हटले, “ आता आपण एखाद्या गावात पोचलो की तिथे थांबून गाडी पक्की दुरुस्त करून घेऊ ” ऐझेनने उत्तर दिले, “ आता थांबायचं आपल्या मुक्कामावरच–जर्मनीमध्ये ! ”

वाटेत दोनतीन गावे लागली पण ऐझेनने गाडी थांबविली नाही म्हणाला, “ गाडी थेट जाईल बघा तर गेलीच पाहिजे ”

दीड दोन तासांनी आम्ही जर्मनीतल्या मुक्कामावर जाऊन तिथल्या कंपाऊंडात गाडी उभी केली ऐझेन उतरला त्याने कॅमेरा आणि इतर सामान काढायला सुरुवात केली पण ‘ काय ? मी म्हटल तसच झाल की नाही ? ’ असे काही म्हणण्याचा विचारही सुचलेला दिसला नाही मग ध्यानात आले हा त्याच्या अंगी पुरेपूर बाणलेल्या नम्रतेचा परिणाम होता ऐझेन कामात अत्यंत चोख, प्रामाणिक आणि निरलस आहे एकदा एका नकाशाचा शॉट घ्यायचा होता जगभर आठशे गावे अशी आहेत की तिथे दर शंभरात कमीत कमी एक माणूस तरी टी एम चा उपासक आहे ही गावे नकाशात दाखवायची होती. मी म्हटले, “ आपण इथलाच एखादा नकाशा घेऊ या ” पण जुन्या वापरात असलेल्या नकाशावर एखादी बारीक घडी पडलेली दिसेल म्हणून त्याने लुझर्नला जाऊन कोरा नकाशा आणला आठशे गावे दाखविण्यासाठी टाचण्यांची सुमारे हजार निशाणे मिळवली आणि नंतर दोन दिवस पुस्तकातून अक्षांश रेखांश बघून त्या त्या गावाच्या जागी ती निशाणे रोवायला सुरुवात केली. हा क्रम पाचशे निशाणे संपेपर्यंत चालला. शेवटी

मी त्याला थांबवून म्हटले, "हे बघ, तू कॅमेरामन आहेस या टाचण्यांना लावलेल्या लहान लहान निशाणाआड कुठली एखादी टाचणी मागेपुढे झाली तर चित्रात ध्यानात तरी येणार आहे का?" पण त्याचे म्हणणे कॅमेऱ्याने फसवायचे तो फिल्मचा धंदा करीत असतो तेव्हा इथे आपण खरे आहे ते तयार करू त्यातून कॅमेऱ्याचे अवसान असेल तेव्हढे आणि तसे दिसेल. नाही तरी सत्याच्या दर्शनाचा प्रॉब्लेम हा सनातन आहेच

# २२

डिसें ७७

काल बर्नला गेलो होतो

महर्षींच्या एका भाषणात अनेक देशातल्या, सरकाराचा नावे घेऊन उल्लेख आहे फिल्ममध्ये सारखे भाषण आणि महर्षींचा चेहरा नको म्हणून मी म्हटले,



"या उल्लेखाच्या वेळी आपण त्या त्या देशाच्या निशाणाची चित्रे वापरू आणि त्या निशाणावर त्या देशाच्या राजमुद्रा—म्हणजे भारताचा अशोकस्तंभ, रशियाचा विळाकोयता—उठवू त्यातल्या त्यात या मुद्रांची लाकडात कोरलेली किंवा लोखडात घडवलेली चित्रे मिळाली तर चित्रपटातली ती दृश्ये चांगली आकर्षक दिसतील"

अशी चित्रे मिळण्याची शक्यता म्हणजे त्या त्या देशाच्या वकिलातींच्या इमारतींवर बर्न ही स्वित्झर्लंडची राजधानी तिथे साहजिकच या वकिलाती आहेत म्हणून बर्नला जायचे ठरले.

यावेळी ऐझेनबरोबर माझा दुसरा मदतनीस रॉयही आला रॉय इंग्लिश आहे अत्यंत सभ्य, संयमी, रसिक आणि विनोदी आहे. ऐझेनचे आणि त्याचे चांगले जमते दोघेही टीएमचे कट्टर भक्त, महर्षींचे अभिमानी बर्न इथून दोनअडीच तासाच्या रस्त्यावर म्हणून सकाळी लवकर निघू असे मी म्हटले पण सकाळची ध्यानसाधना

झाल्याशिवाय निघायला रॉय तयार नव्हता नाही तरी महर्षींनी सांगून ठेवले आहेच— कुठलेही काम घाईगर्दीने करायचे नाही जे करायचे ते आपल्या बाजूने स्वस्थ चित्ताने, निवांतपणी करावे जे व्हायचे ते होतच असते. आणि आता जगात ' एज ऑफ एनलायटनमेंटचा उदय झाला आहे इथून पुढे इष्ट असेल तेच होत जाणार !

मग दहा वाजता आम्ही निघालो सगळा रस्ताभर दोघांचेही महर्षींबद्दल बोलणे चालले होते महर्षींच्या अनेक गुणांचे कौतुक शब्दाशब्दातून ठिपकत होते महर्षींच्या या अभिमान्याची एक गमत बघण्यासारखी आहे. इथे रोज लाखो डॉलर्सचा, करोडो रुपयाचा व्यवहार चालत असल्यासारखे दिसते, ऐकू येते. इथल्या हिंदी माणसाच्या बुभुक्षित मनाचे डोळे ते बघून पार फाटून जातात कधी कधी येणारे हिंदी पाहुणेसुद्धा यातून किती व कसे लाटता येईल, या खटपटीत असतात नुकतेच आपल्या सरकारचे एक मोठे अधिकारी आणि त्यांची बायको इथे येऊन गेली. नवऱ्यापेक्षाही बाईचा तोरा मोठा सारखी चिडचिड, धुसफूस आमच्याकडे कुणी पुरेसे लक्ष देत नाही ही तक्रार रोज मागे लागून आम्हाला हे दाखवा, तिकडे न्या असा निलाजरा हट्ट त्यांना गाड्या देऊन निरनिराळी गावे दाखवून आणली. तरी बाई शात होईना मग दोघानाही अडीचशे फ्रँक्सचे एकेक अशी घड्याळे घेऊन दिली तरी जायच्या वेळी त्यांनी आणखी दोनचारशे फ्रँक्सचा गडा घातलाच ! केव्हा तरी येणाऱ्या पाहुण्यापैकी काहींची ही तऱ्हा मग इथल्या नेहेमी राहणाऱ्या हिंदींची गोष्टच विचारायला नको. ईर्षा, मत्सर, लाचारी अनेक दुर्वृत्तींचा बुजबुजाट पण ऐझेन, रॉय किंवा त्यांच्यासारख्याच इतर गोऱ्या भक्तांची या सगळ्या गोष्टींकडे पाहण्याची दृष्टीच निराळी ऐझेनचे म्हणणे, ' माणसे आपल्य कर्मामुळे मनोविकासाच्या निरनिराळ्या अवस्थात असतात त्यामुळे असे घडत इतर माणसाच सोडा खुद्द महर्षींच्या काही वागण्याचा उलगडा होण्यासारखा नसला तरीही आपला त्यांच्याशी काही संबध नाही आपल्याला टी एम चे वरदान मिळाले आहे ते कसंही करून संभाळायचं. " म्हणजे आपण ' उसपार पोचलो ही सगळ्याची वृत्ती.

एक वाजता आम्ही बर्नला पोचलो. जेवणाचा विचार न करता शहराचा नकाशा मिळवला आणि वकिलातींच्या शोधाला निघालो शेवटी एक रस्ता सापडला दोन्ही बाजूला वकिलाती होत्या लहान लहान बगले भोवताली कपाऊड त्यांच्या उच भिंती बाहेरची-आतली दारे बद. बगल्याच्या वर वकिलातीचे नाव आणि तिची राजमुद्रा, धातूत खोदलेली किंवा ( मातीच्या ) खापरात कोरलेली आणि रंगविलेली पण भारतीय वकिलातीचा पत्ता लागेना कल्पना अशी होती की आपल्या वकिलातीत प्रथम जायचे तिच्यामार्फत दुसऱ्या वकिलातींचे सहकार्य मिळवायचे शेवटी निरनिराळ्या वकिलातींतून आपणच जाऊन विचारायचे असे ठरविले मग चीनची

वकिलात दिसली थोडे पुढे जाऊन गाडी थांबवली

रॉय म्हणाला, " इथे मी एकटाच जातो. तुम्ही हिंदी आहात तुमची आणि चीनची सध्या मैत्री नाही. " आणि तो गेला.

इतका वेळ गाडीत बसलो होतो तिथे चांगली ऊब होती बाहेर उतरलो, तो सगळे शरीर थंडीने एकदम थरकापायला लागले ऐझेन गाडीला टेकून रॉय गेला तिकडे पाहत उभा होता. दहापंधरा मिनिटे, अर्धा तास झाला तरी रॉयचा पत्ता नाही मी म्हटले, " इतका वेळ लागायला नको खरं म्हणजे " ऐझेनने दुजोरा दिला, " मलासुद्धा हे जरा विचित्र वाटत आहे ! " आम्ही दोघे रॉयच्या शोधाला निघालो. रस्ता निर्मनुष्य आभाळ खूप झाकोळलेले. दोन्ही बाजूंना ती कड्या-कुलुपाच्या मागे दडलेली घरे मध्येच एखाद्या कुत्र्याचे भुंकणे ऐकू येई त्या आवाजावरूनही जनावर मोठे असल्याचे चित्र डोळ्यासमोर तरळे. एखादा माणूस भेटे, तो पुढे गेला तरी पुन्हा पुन्हा वळून निरखून आमच्याकडे पाही ऐझेन म्हणाला " गेल्या महिन्यात जर्मनीत दहशतवादी तरुणानी धुमाकूळ घातला आणि ते युरोपभर पसार झाले तेव्हापासून सगळ्या देशातून कडक निगराणी चालू आहे आपण जर्मनीला गेलो तेव्हा सीमेवर आपले पासपोर्ट कॉम्प्युटरमार्फत छाननी झाल्यावर परत मिळाले, आठवत ? रॉय चिनी वकिलातीत गेला असला तर तुमच्या राजमुद्रेचा फोटो घ्यायचा आहे असं मुलखावेगळं निमित्त सागणाऱ्या माणसाचा त्याना संशय येणं कठीण नाही आणखी फार तर अर्धा तास वाट बघू नाहीतर ब्रिटिश वकिलातीत जाऊन रिपोर्ट करू "

शेवटी एक तासाने रॉय दिसला तेव्हा आमचा जीव भांड्यात पडला टर्किश वकिलातीने त्याला बाहेरच्या बाहेरच टोलवले होते चिनी वकिलातीत एकदा शिरल्यावर पहिल्या माणसाने दुसऱ्याला, दुसऱ्याने तिसऱ्याला विचारायचे आहे, असे सागत त्याला बसवून ठेवले शेवटी कंटाळून ' मी आता जातो ' असे म्हटल्यावर योग्य त्या माणसाची भेट होईपर्यंत आता जाता यायचे नाही असे त्याला सुनवण्यात आले ! शेवटी बऱ्याच वेळाने तो माणूस आला तेव्हा त्याने एका वाक्यात बोळवण केली " तुमच्या महर्षींची युनिव्हर्सिटी आहे. आमची एंबसी आहे युनिव्हर्सिटीचा आणि एंबसीचा सबंध काय ? "

शेपटावर निभावले म्हणून आम्ही निघालो मग रशियन वकिलात गाठायची असे ठरले अनेक वळणे आणि रस्ते पार करीत एका रस्त्याच्या टोकाशी पोचलो तिथे रस्ताच संपला होता समोरच रस्त्याच्या मधोमध दीड पुरुष उंचीचे लोखंडी फाटक. बाजूला उंच भिंतीचे कुंपण. आत दूरवर एक मोठा बंगला दारे-खिडक्या बंद भोवताली झाडी पलीकडे वस्तीचे नाव नाही फाटकावर रशियन एंबसीचे नाव पण आत शिरायला मार्ग नाही बुचकळ्यात पडून मागे

फिरलो आणि पुन्हा एक मैलाचे वळण घेऊन दुसऱ्या रस्त्याने शिरलो तोही रस्ता रशियन एंबसीच्या दुसऱ्या बाजूला येऊन संपला एवढा मोठा बंगला दुपारची वेळ पण सगळे सामसूम रस्त्यानेच एक तरुण मनुष्य आला त्याच्या डोक्यावर फूटभर उंचीची फरची टोपी होती तो आमच्याकडे सारखा बघत पुढे गेला त्याने कुंपणातले एक दार कुलूप काढून उघडले, तेव्हा आम्हाला तिथे दार आहे कळले ! पुन्हा ते दार बंद झाले

या एंबसीवर राजमुद्रा तरी आहे का हे बघूया म्हणून ऐझेन झाडाखाली एक बाक होते त्याच्यावर चढला मग आणखी थोडे वर जाण्यासाठी त्याने झाडाची फांदी धरली तेव्हा मात्र रॉयने त्याला थांबविले व म्हटले, " हे बघ, आपण या वकिलातीभोवती दोन निरनिराळ्या रस्त्यावरून येऊन घोटाळतो आहो, आणि तू वर चढून टेहेळणी करतो आहेस म्हणून कुणी गोळी घातली तर शेजारी फर्लांगात कुणी चिटपाखरू नाही कुणाला खरखोट काय ते कळणारही नाही ! "

शेवटी पुन्हा गाडीत तासभर चकरा मारल्या एकही राजमुद्रा मिळाली नाही भारताची वकिलात तर दिसलीच नाही मग म्हटले, " चला अमेरिकन एंबसी बघू या तिथे कदाचित आमच्या एंबसीचा पत्ता लागेल "

तिथे पोचलो तो दारावरच अमेरिकन गरुडाचे सुंदर खोदलेले चित्र बघताच त्याचा लोभ सुटला एंबसीची इमारत भर रस्त्यावर लांबलचक, लंबचौकोनी पेटीसारखी सगळीकडून बंद दाराशी घंटी वाजवली तेव्हा त्या भरभक्कम लोखंडी दाराच्या वरच्या बाजूचा खटका वाजला बुलेटप्रूफ काच असलेली एक लहानशी खिडकी थोडी उघडली मागे एक युनिफॉर्ममध्ये असलेला मरीन गार्ड उभा ऐझेनने म्हटले, " बाहेरच्या राजमुद्रेचा फोटो घ्यायचा आहे " गार्डने उत्तर दिले, " व्हाय नॉट ? गो अहेड ! " ऐझेनने हसून म्हटले, " तुला कुणा ऑफिसरला विचारायचे असेल तर विचार " त्याने आश्चर्याने म्हटले, " दुसऱ्याला विचारायला पाहिजे ? " नंतर आत बघितले आणि पुन्हा वळून म्हटले, " डाट वेस्ट युवर टाइम, मॅन ! गो अहेड अँड शूट ! "

दहा मिनिटात आम्ही आमचा शॉट घेतला तिथून धीर येऊन ब्रिटिश वकिलात गाठली ती बंद होती पण बाहेरच घोडा आणि वाघ यांनी राजमुकुट उचलून धरला आहे अशी, सुंदर रंगवलेली एकदम डोळ्यात भरेल अशी मुद्रा होती रॉय म्हणाला, " आता विचार करूया नको लाव कॅमेरा कुणी काही करायला आले तर मी ब्रिटिश नागरिक आहे काय करतात ते बघेन "

अखेरीस हिंदी वकिलातीचा पत्ता लागला शहराच्या दुसऱ्या टोकाला, अनेक कंपन्यांची दुकाने असलेल्या एका इमारतीत खालच्या मजल्यावर ही आपली वकिलात आहे मी आत गेलो मुलाचे पाय पाळण्यात दिसतात हे खरे असेल-नसेल

पण एखाद्या देशाची आणि त्याच्या कारभार–यंत्रणेची चुणूक त्या देशाच्या वकिलातीतल्या व्यवहारातून अगदी स्पष्टपणे जाणवते हे अगदी खरे आहे

मरहूम अलीयावर जग एकदा लंडनमध्ये हिंदी हायकमिशनर होते त्याना हायकमिशनची कार्यालये सुशोभित करण्याची इच्छा झाली त्यासाठी त्यानी काही प्राचीन भारतीय कलाकृतींची मागणी केली त्याना ज्या वस्तू धाडण्यात आल्या त्या बघून ते उद्‌गारले, " अरे यानी दिल्लीतल्या फूटपाथवरच्या मोडक्या बाजारातून जिनसा गोळा करून धाडल्या आहेत ! " आपला विजू आळशी, एकदा अमेरिकेतल्या आपल्या एंबसीत विनोबा भाव्यांच्या फिल्मची प्रत मिळविण्यासाठी गेला तिथल्या फिल्मागारात अनेक फिल्म्सचे डबे जमिनीवर उघडे पडलेले आणि त्यातून बाहेर आलेल्या फिल्म्सच्या वेटोळ्याचे एक हजार चक्रव्यूह तयार झालेले !

मला वाटत इथे एंबसीत शिरलो तेव्हा, माझ्या मनातल्या, तिथल्या माणसाच्या हेव्यामुळे असेल, आतली माणसे उगीचच छानछोकीची आणि बिनकामाची वाटली ! एक बाई दिसली बहुधा शीख असावी चागली गलेलठ्ठ पण अंगात तग पाटलोण आणि स्वेटर ! म्हणजे एकंदर आकाराची कल्पना कर दोन स्विस पोरी होत्या एक तरुण हिंदी पोरगा होता तो उघड उघड वेडसर वाटत होता. कुणाच्या तरी वशिल्याने इथे लागला असावा !

परवानगी घेऊन बाहेर आलो, आणि कॅमेरा लावला बघितले तो पाटी खूप मळलेली पितळेच्या पाटीत खोदलेल्या चित्रात जागजागी पाढरे पॉलिश रुतून बसलेले आधीच्या दोन सुंदर मुद्रानतर तर ही पाटी अगदीच भकास वाटत होती. आत जाऊन पाटी पुसायला हवी म्हटल्यावर पुसणारी बाई आज आली नाही असे कळले ! मी रुमालाने पाटी घासायला सुरुवात केली तेव्हढ्यात एक अधिकारी आला म्हणाला, " आमच्या जवळ दुसरे एम्ब्लेम् आहे तळघरात थोडे थाबा मी शोधून देतो " अर्ध्या तासानंतर त्याने येऊन सागितले, " सापडत नाही " हा वेळपर्यंत तिथे आणखी एकजण आला होता त्याने ते ऐकून म्हटले, " ते ना ? मी ठेवले आहे आणतो थाबा " त्याने ते आणले ते पहिल्यापेक्षाही निरुपयोगी निघाले ! मग ऐझेनने कॅमेऱ्यातून बघितले व म्हटले, " अरे किती सुदर दिसत आहे हे ! ग्रेट ! बेस्ट ऑफ द लॉट ! " दहा-पंधरा मिनिटात काम उरकले आणि आम्ही निघालो

रस्त्यात मी ऐझेनला म्हटले, " हिंदी वकिलातीत गेलो, तेव्हा माझ्या मनात एक विचार आला तो सागून टाकतो अमेरिकन एंबसीमधला झटपटपणा, ब्रिटिश वकिलातीतली ती खूप सुदर, नीट स्वच्छ ठेवलेली राजमुद्रा, यानतर हिंदी एंबसीजवळ जाताना तू आणि रॉय बरोबर नसता आणि दुसरे हिंदी मदतनीस असते तर बर झाल असत अस एकदम वाटून गेल मला ? "

ऐड्रेनने आश्चर्याने म्हटले, " अरे! मला तर तिथला अनुभव सगळ्यात मजेचा वाटला मागे मी भारतात होतो तेव्हाही प्रत्येक वेळी असाच छान अनुभव येई हे बघा, अमेरिकन वकिलातीत काम चटपट झाल पण अगदी यांत्रिकपणे माणसाना महत्त्व नाही या, काय करायच ते लवकर करा नि जा ब्रिटिश वकिलात आपली मोठी राजमुद्रा बाहेरच्या रस्त्यावर जाहिरातीसाठी वापरून त्याच्याआड दार बंद करून बसली होती. हिंदी वकिलातीत मात्र सगळे आपापल्या परीनं आमच्या कामात भाग घेण्याच्या खटपटीत होते कुणी तुमच्याबरोबर पाटी पुसायला लागले कुणी दुसरी शोधून देतो म्हणून धडपडला. आणि सापडत नाही म्हणून ओशाळा झाला तोपर्यंत तिथला तिसरा जागा झाला अन् म्हणाला, ' मी ठेवले आहे आणतो ' सगळे मी बघत होतो आणि मनात म्हणत होतो, किती मौज आहे! यांचं सरकार बटण दाबून माणसं पुढेमागे हलवीत नाही ही माणसंच स्वत. आपापल्या शक्तीप्रमाणे सत्तेची चाके जमेल त्या प्रमाणात फिरवण्याच्या वृत्तीची आहेत "

प्रत्यक्ष फिल्मवर तो पिवळ्या पितळी पत्र्यावरच्या काळ्या रेषांच्या खोदकामात काढलेला साधा पण डोळ्यात भरणारा अशोकस्तंभ फार सुंदर दिसतो खरंच !

# २३

डिसें ७७

थोड्याशा घाईत लिहीत आहे



बर्न सोडण्यापूर्वी गावात
दोन चार तास बराच फिरलो
जुन्या आणि नव्या नव्या
बर्नमध्ये आधुनिकता आहे खरी
पण फार उंच इमारती नाहीत
लुझर्नमध्येही फारशा दिसल्या
नव्हत्या रस्त्यात लागलेल्या
गावातून घरांची रचना
लहानसर टुमदार अशी दिसली
पुष्कळदा घरांचे वास्तुशिल्प
पुष्कळ जुने आणि मुद्दाम तसे
टिकवलेले दिसले

बर्नमधले जुने गाव चांगलेच सुंदर वाटले कालच तिथे कसली तरी मोठी जत्रा (कार्निवल) होती त्यामुळे रस्ते तुडुंब गर्दीने वहात होते—नव्हे जागच्या जागी अडकून उभे होते ! आपल्याकडे जत्रेत असतात तशी दुकानांची पाले भर रस्त्याच्या मधोमध आणि दुतर्फा उभी होती गणपतीला गुलाल उधळतात तसे या जत्रेमधून कागदाच्या रंगीबेरंगी गुंजेएवढ्या टिकल्या एकमेकावर उधळतात, प्लॅस्टिकच्या हलक्या हातोड्या एकमेकाच्या डोक्यावर मारतात ! सगळ्या रस्त्यातून टिकल्यांचा खच पडला होता संध्याकाळपर्यंत आमची सगळ्यांची तोंडे त्या टिकल्यांच्या चिकटलेल्या नक्षीकामाने भरून गेली ! हमरस्त्याच्या मधोमध एक टॉवर (घटेघड्याळ) दिसला त्यावरच्या घड्याळाचा व्यास दीड पुरुष उंचीचा ! दोन्ही बाजूला भक्कम दगडात बांधलेल्या इमारती आहेत, त्या सगळ्यांचे खालचे भाग इमारतीच्या ओळंब्याच्या मुद्दाम पुढे आणून भक्कमपणे बांधलेले आहेत दुरून बघितले तर दोन्ही बाजूना हत्तींची माळ असल्यासारखा भास व्हावा किंवा तुला जास्त पटेल असे सांगायचे तर दोन्ही बाजूना असंख्य गरोदर बायकांची पंगत बसली आहे असे वाटावे !

रोज थंडी पडते बर्फ पडते, ऊनही पडते पत्र लिहिण्यासाठी हातमोजे काढले की बोटे काकडून जातात म्हणून इथेच थांबतो

# २४


१९ जाने. ७८

आज पुन्हा पूजा होती

महर्षी आपल्या दिवाणखान्यातून बाहेर बघत होते (असे स्वयंपाकी मथुरा पंडित सांगत होता) त्यांना बर्फाने माखलेले, समोरच्या धुक्यातून वर आलेले, हवेत तरंगते आहे असे वाटायला लावणारे, आल्प्सचे शिखर दिसले ते एकदम म्हणाले, "हे शिखर नव्हे हा तर शिवशंकर आहे आज शंकराला रुद्राभिषेक करायचा."

पूजा संपेपर्यंत महर्षी डोळे मिटून बसतात नंतर एकदम हात जोडून वाकतात आणि मूर्ती असलेल्या चौरंगावर डोके ठेवतात. लगेच सगळ्यांनी डोके टेकायचे—ते स्वत महर्षी आपले डोके उचलीपर्यंत ! आज सगळ्यांनी तशीच डोकी टेकली मी हात जोडून भिंतीशी बसून पहात होतो समोरच्या एकाने (मला वाटते पाठीला कळ लागली म्हणून) थोड्याच वेळात डोके वर उचलले आणि तिरक्या नजरेने पाहिले तो महर्षींचे मस्तक अजून खालीच ! त्याने घाबरून पुन्हा इतक्या घाईने डोके पुढच्या चौरंगावर टेकवण्यासाठी वाकवले की (मला वाटले) बोटे आणि

कपाळ दोन्ही दुखली ! यानंतर बराच वेळ तो बोटे दाबीत होता कपाळ घासून बघत होता !



आता महर्षींनी हिंदुस्थानातून आणखी दोन संस्कृत पंडित आणले आहेत एक पंडित शुक्ल आणि दुसरा आहे एक वीस-बाविशीचा मुलगा मुंबईच्या महर्षींच्या सेमिनारमध्ये तुला पाहिलेले आठवत असेल. पांढऱ्या शुभ्र मिशा असलेले खाष्ट चेहेऱ्याचे एक रूबाबदार गृहस्थ महर्षींच्या उजव्या हाताला बसले होते ते शुक्ल शुक्लाचा आवाज खणखणीत असून गोड आहे म्हणण्याची धाटणी आकर्षक आहे एखाद्या कसलेल्या उपाध्यायासारखा त्यांना आत्मविश्वास आहे आणि महर्षींचा त्यांच्यावर लोभ आहे

पोरगा आहे, त्याचे नाव रविशंकर दहाबारा वर्षे चतुर्वेदी नावाच्या गुरूबरोबर संस्कृत ( आणि सामवेद ) पढलेला आहे या मुलाचा आवाज ऐकला म्हणजे संस्कृत वाणी राजरस्त्यावरून गजांत लक्ष्मीसारखी मिरवीत जाते आहे असे वाटते तरुणपण आहे छातीत दम आहे त्यामुळे परवा त्याने सामवेदाच्या ऋचा म्हटल्या, तेव्हा सामवेद गातात म्हणजे काय हे प्रथम लक्षात आले ! मुंबईच्या सेमिनारमध्ये चार ब्राह्मणांनी सामवेद म्हटलेला तुला आठवत असेल एकदा टिकेकरांनी मला मुद्दाम घरी बोलावून दक्षिणेकडच्या विद्वान ब्राह्मणांनी म्हटलेल्या सामवेदाची टेप ऐकवली होती माझ्या इथल्या खोलीत तर दिवसरात्र सामवेद गाणारा स्पीकर आहे या मुलाने दोनच ऋचा म्हटल्या पण लगेच त्याला घाम पुसावा लागला. त्या संस्कृत शब्दांना लावलेले विलंबित स्वर सुरू झाले, तेव्हा बर्फाच्या दाट पण वजनाने हलक्या धारांचा वर्षाव चालू आहेसे वाटू लागले भाषेला नुसतेच शब्द नसतात तिचे स्वत:चे असे ॲक्सेंटसही ( आघातही ) असतात ही गोष्ट एकदम ध्यानात आली आणि मग महर्षींचा एक आवडता सिद्धांत आहे त्याचाही मी गंभीरपणे विचार करू लागलो तो सिद्धांत असा शब्दांना नुसताच अर्थ नसतो नुसताच ध्वनी नसतो तर ऋग्वेदातले काही शब्द हे वास्तवातल्या वस्तूंनी घेतलेले ध्वनिरूप अवतार आहेत अग्नि शब्दाचा उच्चार ( आणि नंतर विचार ) करून बघावा त्या उच्चाराच्या प्रक्रियेकडे बारकाईने लक्ष द्यावे अर्धवट घशातून घर्षण करून काढावा लागणारा ' अ ', घशातूनच उपटून वर आणावा लागणारा ' ग ' ग्नि च्या उच्चारासाठी जिभेला टाळूकडे ( हा शब्द बरोबर आहे ना ? )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६०७
२७४५

एकदम दीपशिखेसारखी भारावी लागणारी उडी यामुळे त्या उच्चाराच्या कष्टातच दाहकता असल्याचे भासेल इथल्या युनिव्हर्सिटीत काम करणारे पदार्थविज्ञानाचे शास्त्रज्ञही वास्तवाला शब्दरूप घेताना ते कोणत्या अवस्थेतून जाते याच्या संशोधनात—पण हे सगळे पुन्हा एकदा त्याच्याकडून समजून घेऊन मगच खुलासेवार तुला लिहीन

असल्या ज्ञानाची चर्चा आम्हा हिंदी लोकात झालेली मी ऐकली नाही निदान आमचे संस्कृतज्ञ डॉक्टर गेल्यापासून एक तर इथे इतर व्यवधाने आणि आकर्षणे खूप असतात. परवा स्वयंपाकी पोराने एक नवा कोट घातला आणि दाखवायला आणला त्याला तो इथल्या जुन्या कपड्याच्या गुदामात मिळाला इथली मुले आपले टाकाऊ झालेले कपडे त्या गुदामात फेकून देतात—गडीमाणसानी आणि गरिबानी न्यावेत म्हणून आम्ही स्वयपाक्याला तिथून कोट आणल्याबद्दल थोडी नापसंती दाखवली तेव्हा तो लगेच म्हणाला, “ का नको ? मी गेलो हा कोट उचलला आणि बाजूला जाऊन घालून पाहू लागलो तेव्हा अमकेअमके आणि याची बायको तिथे आली त्याना मी दिसलो नाही मग त्यानी अर्ध्या तासात दहाबारा कपडे—पाटलोणीसुद्धा घालून काढून बघितले ! आणि त्यापैकी काही नेलेही· काल ते तीन निरनिराळ्या रंगाचे कोट, पाटलोण आणि जाकिट घालून फिरत होते ते कपडे गुदामातलेच होते ! ”

याच्या उलट इथली गोरी मुले इथे कशासाठी ही आपली आयुष्ये वाहून घेत आहेत ? काही तर अत्यंत गुणी आहेत माझा मदतनीस रॉय घ्या गेल्या युद्धाच्या आगेमागे त्याचा जन्म झाला तो लहानपणच्या आठवणी सागतो लंडनच्या “ जिकडे जाव तिकडे सगळ उद्ध्वस्त दिसायच जिथे विचारल तिथे युद्धात झालेल्या बॉब हल्ल्यामुळे घरातल्या घरात गारद झालेल्या माणसाच्या ( बायका, मुल, म्हातारे—कधी तर सगळ कुटुबच्या कुटुबसुद्धा—याच्या ) कहाण्या अंधुकपणे कुठे तरी वाटे, या समाजाची रचनाच चुकीची असली पाहिजे पुढे शाळेत—कॉलेजात शिकायला लागलो तेव्हा सारखा प्रश्न पुढे उभा राही का ? कशाला ? इतिहास कशासाठी शिकायचा ? गणित का म्हणून ? हेच शिक्षण आमच्या आधी माझ्या वडिलानी, आम्हा सगळ्या मुलाच्या वडिलानी नव्हत का घेतल ? आणि मग त्यानी जो समाज रचला त्याच भकास बैराण स्वरूप आज भोवताली रोज दिसत आहे. मग मी तेच पुन्हा करीत बसायच ? याच भयानक परिणामासाठी ? यापेक्षा, पुढे दुसऱ्याच्या बॉबखाली मरण्यापेक्षा आजच स्वत मेलेल काय वाईट ? कुठेच काही अर्थ दिसेना अशी अनेक वर्षं मग थोडा मार्क्सवादी होण्याच्या बेतात आलो तुम्हाला आठवत असेल, पॅरिसमध्ये ६८ साली विद्यार्थ्यांचे दंगे झाले व्हिएटनामच युद्ध चालू होते एका लहानशा देशाला अमेरिकेसारख

अजस्र राष्ट्र चिरडून टाकत आहे याची आम्हाला इंग्लंडमध्ये चीड आली निदान त्यावेळी ते कारण निमित्त म्हणून पुरलं आम्ही सगळे विद्यार्थी एका ठिकाणी आलो

"लंडनच्या इतिहासात एव्हढा मोठा विद्यार्थ्यांचा मोर्चा कधीच निघाला नव्हता लाख दोन लाख मुलं ज्या मुलानं मला मोर्च्यात नेलं होतं तो व्हिएटनामच्या अत्याचाराबद्दल तळमळून बोलत होता सगळ्या मोर्च्यांचं जसं होतं तसंच इथही झालं लाठीमार, अश्रुधूर, पकडापकडी ! मला खूप धक्का बसला केवळ होत आहे हा अन्याय आहे हे म्हणण्यासाठी एवढी शिक्षा ? पण खरा धक्का बसला तो पुढेच ज्या मित्रानं नेलं होतं, त्याला पोलिसानी केलेल्या अत्याचाराबद्दल अत्यंत आनंद होत होता ! त्यानंच मला सांगितलं की व्हिएटनामच्या दुर्दशेमुळे उत्तेजित झालेल्या मुलांचा तो मोर्चा गुप्तपणे कम्युनिस्ट पार्टीने उभा केला होता !

"या विश्वासघातामुळे मन विथरून गेलं आहे तो समाज निरोगी नाही त्याला धड करण्याची सोय नाही. उपाय दिसत नाही योगायोगानं ध्यानसाधनेकडे वळलो मनाशी म्हटलं, काय हरकत आहे ? कुणीकडूनही, कशानेही जर परिस्थिती सुधारण्यासारखी असली आणि त्याला माझा हातभार लागण्याचं समाधान मिळणार असलं तर काय हरकत आहे ?"

आज रॉय भेटला होता म्हणाला, "तुम्ही म्हणता इतके माझे विचार सुसूत्र नसतीलही मला पहिल्यापासून माझं काय होणार, काय व्हायला हवे आहे हा प्रश्न सारखा सतावीत असतो माझे वडील ॲग्नॉस्टिक आहेत कुठल्याही धर्माचं कपाळी ब्रीद नाही पुढे मी कॅथलिक झालो पण तो मार्ग उपयोगी नाही असं दिसलं नंतर काही वर्षे झेन (बुद्धिझम) चा अभ्यास केला. गेली काही वर्षे टी एम. करतो आहे. एकदा म्हणालो, आता मी हिंदू झालो हिंदूच आहे पण मग ध्यानात आलं हिंदू म्हणवून घेणं म्हणजे स्वतःला सर्व धर्मांचा म्हणवून घेणं."

रॉय उत्कृष्ट चित्रकार आहे तास तास आमचे बोलणे होते त्याच्या विस्तृत आणि विलक्षण वाचनाची वारंवार साक्ष मिळते. इथे आल्यावर त्याने एक मोठा प्रबंध क्रिएटिव्हिटीवर लिहिला आहे चारसाडेचारशे पानांचा मी तो चाळून बघितला काम अत्यंत भरीव आहे रॉय अनेक वर्षे कविता करतो आहे मधूनमधून लघुकथाही लिहितो पण प्रसिद्धीची सहज शक्यता असूनही एकही लिखाण प्रसिद्ध केलेले नाही विचारले तर म्हणतो, अजून प्रसिद्ध करण्याची इच्छा होत नाही प्रसिद्धीच्या झोतात करप्शन लवकर सुरू होईल अशी भीती वाटते

# २५

बर्फ पडले आहे. रस्त्यावर खच झाला आहे. एवढे धिप्पाड डोंगर पण आता पांढरे, मऊ दिसताहेत. झाडांच्या वाळलेल्या उभ्या फांद्या पांढऱ्या मेणबत्त्यांसारख्या दिसतात. त्यांच्यावर ऊन पडते आणि मग त्यांना जागजागी ज्योती फुटताहेत असा भास होतो. आडव्या फांद्यावरचे बर्फाचे झुबके धावणाऱ्या, उड्या मारणाऱ्या पाळीव पांढऱ्या उंदरांची आठवण करून देतात. घरे स्वतःत गुरफटून गेली आहेत. कालिदास उज्जयनीचा ना? म्हणून त्याला तिथे 'मेघदूत' सुचले. उज्जयनीला बर्फ नसते. फक्त ढग आणि पाऊस. त्यांच्या हवेत मन शृंगाराकुल होते. बर्फामुळे ते स्वतःतच गुंग होऊन बसते.



समोरच्या मोठमोठ्या मोटरगाड्या बर्फात गाडल्या गेल्या आहेत. कुठली कोणती, कुणाची हे कळत नाही. त्यांच्या आकाराचे प्रचंड ढीग झाले आहेत. त्यांच्या काचावर मात्र बर्फ ठरत नाही. मग काचेच्या खिडक्या आतल्या अंधारामुळे राक्षसाच्या डोळ्यासारख्या भयानक वाटतात. लहान, मोठे, आखूड, लांब सगळ्या गाड्यांचे ते पांढरे ढीग आणि त्यांच्या मधून दिसणाऱ्या काचेच्या खिडक्यांतल्या पोकळ्या यामुळे आकार आणि अवकाश यांनी बनविलेल्या शिल्पाकृतींचे प्रदर्शन भरल्यासारखे वाटते आहे!

आज सकाळीच आठ वाजता चार-पाच जण हातात फावडी घेऊन आले आणि बर्फ खणून आतली एक गाडी मोकळी करण्यात दंग होऊन गेले. गाडी दिसायला लागली तेव्हा एकदम बातमी पसरली, डॅम्लर गाडी बाहेर निघते आहे! ती महर्षींची खास गाडी! म्हणजे महर्षी कुठे तरी निघाले आहेत!

एरव्ही महर्षी जातात केव्हा, कुठे, येतात केव्हा, कसे, कुणालाही कळत नाही. लिफ्टवर, व्हरांड्यात, हॉलच्या दाराशी, रस्त्यातल्या मोक्याच्या जागी ठेवलेल्या खुर्च्यांजवळ, लष्करी आविर्भावाची तरुण मुले एकदम उभी राहिली, की म्हणायचे,

महर्षी आले वाटत   ती नाहीशी झाली की महर्षी गेले असणार ! पण आज बातमी फुटली आणि हे सगळे टी एम  च्या चळवळीचे आतरराष्ट्रीय केंद्र खडबडून जागे झाले  जिने दडदड वाजू लागले  लाकडी खोल्या धावपळीने हादरू लागल्या दारे फटाफट आपटून टाळ्या वाजवू लागली  खाली रस्त्यावर डॅम्लर बाहेर आली इथून सत्तर–ऐंशी मैल झूरिकला जाऊन विमान पकडायचे  रस्त्यात बर्फ  एक गाडी बद पडली तर ? मग डॅम्लरच्या मागे आणखी तीन गाड्या अगावरचे बर्फ झाडीत, धडपडत येऊन उभ्या राहिल्या  महर्षी जाणार खरे, पण केव्हा, किती वाजता कुणाला कळेना  पण जाण्याच्या वेळी दर्शन घेतलेच पाहिजे  निरोपाचा नमस्कार केलाच पाहिजे  सगळे रस्त्यावर धावले  मुले–मुली, चामड्याचे बूट, उबेचे कोट, आत अनेक कपड्यात गुंडाळलेली शरीरे  सगळे गाड्याच्या भोवती जमा झाले  थडी मी म्हणत होती  बर्फ थिजलेले हसणे घेऊन ओसंडत होते  पाहता पाहता पंचविशीतल्या तरुण मुलाची डोकी पाढरी शुभ्र होऊन गेली ! जणू काय आयुष्यभर महर्षींच्या भेटीची वाट पाहत पाहत सगळे मोठ्या खुशीने म्हातारे झाले आहेत !

माझी खिडकी या रस्त्यावर उघडते  समोर टेकडी आहे आणि पाईन्सची राई, सगळे पाढरे शुभ्र होऊन गेलेले. हाच रस्ता लुझर्नवरून झूरिकला जातो  मी खिडकीतून वाकून बघितले. चार गाड्या  शंभर-सव्वाशे मुलेमुली, सगळी नऊ–सव्वानऊ वाजल्यापासून जमलेली  जाणाऱ्या-येणाऱ्या दुसऱ्या गाड्याना मोठ्या मुष्किलीने त्या गर्दीतून वाट मिळे  सगळा रस्ता हसण्याने बोलण्याने दुमदुमून गेला होता  इतक्या कपड्यानीही थंडी राहत नव्हती, म्हणून काहीजण जागच्या जागी उड्या मारीत होते  दहा वाजले, अकरा वाजले  बाहेर गर्दी आणि आत जिन्यावरून, खिडक्यातून महर्षी इमारतीतून बाहेर पडतात त्या लहान रस्त्यावर दाटी  शेवटी साडेअकरा वाजता वरच्या मजल्यावरून पडित शुक्लाचे श्लोक सुरू झाले  महर्षी निघाले म्हणजे शुक्लाजीही संस्कृत ललकारी देत पुढे चालतात  मागे परिवारातली सगळ्यात जवळची माणसे  शुक्लाच्या श्लोकाचा आवाज लिफ्टमधून माझ्या मजल्यावर पोहोचत विरून गेला  पुन्हा रस्त्यावरच्या दारातून तो एकदम बाहेर फुटला  आणि दारापासून मोटारीपर्यंत रस्त्यावर टाकलेल्या मखमली पायघडीवरून चालत महर्षी गाडीशी पोचले

श्लोक चालूच होते  या समोरच्या झाडाना, डोंगराना, रस्त्याला आणि या सहा महिन्यानी येणाऱ्या बर्फाला इथल्या चर्चच्या घटाचे आवाज अनेक शतकाच्या ओळखीचे असणार ! ही सगळी या श्लोकाच्या गोड आवाजाची देववाणी ऐकून चमकली, थरारली असतील का ? की टी एम  च्या प्रचारामुळे मनातून चरफडणाऱ्या खिश्चनाप्रमाणे हा इथला सृष्टीचा लहानसा तुकडा चिडीने भूकपला ( भूकपावरून

नवीन क्रियापद–हरिभाऊ आपट्यांचे आनद पासून आनदला आठवते ना ? तसेच हे ! ) असेल ? मी बघत होतो मुले पुढे धावू लागली पार पुढे येऊन रस्त्याच्या दोन्ही बाजूना हात जोडून उभी राहिली सुमारे अर्धा पाव फर्लांगाच्या रांगा मग ध्यानात आले, गाडीभोवतीच्या गर्दीमुळे महर्षींचे दर्शन सुकर होत नव्हते ते गाडीत जाताना तरी दिसतील म्हणून ही मुले पुढे येऊन अशी सुटी सुटी उभी राहिली आहेत गाड्या सुरू झाल्या, पुढे गेल्या एक दोन तीन चार मागोमाग मुले धावली निरोपासाठी हात हालवीत रस्त्याच्या मधोमध एक मुलगी उभी होती विशी-पचविशीची ती नाजूकपणे उजवा हात गालासमोर हालवीत होती

गाड्या निघून गेल्या होत्या मुले परत वळली मी खिडकी लावून घेतली मला वाटते, पाचदहा मिनिटानी असेल, मी खिडकी पुन्हा उघडली बाहेर बघितले, रस्ता निर्मनुष्य झाला होता पण रस्त्याच्या मधे अजूनही ती मुलगी उभी होती हात हलवीत भान हरपल्यासारखी गाड्या घाटसुद्धा उतरून गेल्या असाव्या !

या सेंटरमध्ये सगळ्याच्या दिमतीला दोन तीन डॉक्टर आहेत कुणाचे काही दुखले खुपले की त्यानी बघायचे मामुली असले तर इथेच औषधे आणून द्यायची. कमीजास्त असले तर गाडीत घालून लुझर्नला मोठ्या डॉक्टरकडे न्यायचे त्याची एक वेळची तपासण्याची फी ५०–६० फ्रँक्स ( दोनशे–अडीचशे रुपये ! ) वेळच आली तर हॉस्पिटलमध्ये तिथेच ठेवायचे दोन चार दिवसाचा हॉस्पिटलचा मुक्काम म्हणजे ८००–१००० फ्रॅंक्स या संस्थेच्या डॉक्टरानी इथलीच मुले बघायची असे नाही स्वित्झर्लंडमध्ये निरनिराळ्या गावी स्वतत्रपणे हॉटेल्स घेऊन तिथे संस्थेचे टी एम चे अभ्यासक्रम चालतात तीन तीन महिन्याचे, सहा महिन्याचे, वर्षाचे सारखी मुले परदेशाहून येतात हजारो डॉलर्स खर्च करतात आणि अभ्यासक्रम पुरा करून परत जातात दर दोन-तीन महिन्यानी शेकड्यानी आवकजावक चालू असते या डॉक्टरानी गाडी घेऊन या सगळ्या जागाना भेटी द्यायच्या दररोज दुपारी–संध्याकाळी तासन्‌तास इथे असताना टेलिफोनवर बसायचे मग निरनिराळ्या केंद्रातून विद्यार्थ्यांचे टेलिफोन्स येतात पोट दुखते आहे, डोके दुखते आहे, उपास करतो आहे, खायचे काय ? मग डॉक्टरानी इकडून उपचार सागायचे एखादी विशेष महत्त्वाची तक्रार असली की दिवस असो, रात्र असो गाडी घेऊन निघायचे

एक डॉक्टर हिंदी आहेत, निसर्गोपचार करतात गाधी त्याचे नाव परवा गाधी गडबडीत होते म्हणाले, “ पेशंट आणला आहे, जातो जरा ” पेशंट पचविशीचा तरुण स्वीड तक्रार वेडसरपणा असल्याची मी इथे आल्यापासून अशा तक्रारींची ऐकलेली ही चवथी केस मुले अभ्यासक्रमासाठी येतात अभ्यासक्रमाची केंद्रे आपल्या विपश्यना शिबिरासारखी. कडक शिस्तीने बाधलेली आसने, प्राणायाम,

टी एम ची साधना महर्षींची व्हीडिओ टेपवरची व्याख्याने आणि वेदांचे ( इंग्रजीतून वेदांच्या भाषांतराची सुंदर पुस्तके इथल्या छापखान्याने प्रकाशित केली आहेत ) सारखे वाचन मग कधी कुणाला झटके येतात कुणाचे अंग थरथरत राहते कुणाची बुद्धी चाकोरीबाहेर पडू पाहते हा स्वीड मुलगा जरासा अनावर झाला होता केंद्रातले इतर विद्यार्थी थोडेसे हादरले होते, म्हणून व्यवस्थापकाने इथे आणला होता अंगावर धावायचा ओरडायचा समोरच्याला आवळून धरायचा पण म्हणायचा, " महर्षी कुठे आहेत ? खरं सांगा ! " औषध पुढे केले की उसळायचा ! " रोग कोणता आहे, कुठल्या पुस्तकातल औषध आहे मला आधी सांगा ! पुस्तक दाखवा मग मी घेईन ! " पण त्याला म्हटले महर्षींनी गोळी घ्यायला सांगितले आहे की लगेच नरम दोन-तीन दिवस डॉक्टरांची धावपळ चालू होती आवरला नाही तर मेंटल असायलममध्ये घालावा लागणार म्हणजे मुलगा जवळ जवळ हातचा जाणार सारखे दिवसरात्री केव्हाही निरोप यायचे, कक्षाबाहेर जातो आहे मग डॉक्टर धावायचे सेडेटिव्ज घेऊन

दुसरा डॉक्टर जर्मन आहे तरुणच आहे तिशी–पस्तिशीचा बरीच वर्षे महर्षींबरोबर काम करतो आहे त्याचे म्हणणे, याला वेड्यांच्या इस्पितळात पोचवावे गांधी म्हणत, " आपण त्याला ताब्यात आणू शकू त्रास होईल पण शेवटी दुरुस्त होईलच मागे नाही का एक दोन मुले अशीच बहकली होती आणि मग मी सुधारली ? पण त्यावेळी गांधींच्याबरोबर या जर्मनाऐवजी दुसरे डॉक्टर होते त्यांनी गांधींचे ऐकले

काल गांधी आले आणि खिन्नपणे म्हणाले, " मुलाला इस्पितळात पोचवून आलो ! " मी चमकून म्हटले, " अरे, पण मागच्या महिन्यात त्या डॅनिश पोराचीही अशीच पाळी आली होती, पण आयत्या वेळी त्याचे आईबाप विमानाने आले, त्याला घेऊन गेले आणि तो वाचला तसे याही वेळी–" गांधींनी मान हलवली व म्हटले " दोन दिवस भांडलो इस्पितळात नाही पाठवायचे म्हणून तो जर्मन म्हणायचा, मग याच कोण किती दिवस आणि कुठल्या जागेत करीत बसणार ? त्याचंही बरोबरच होतं, नाही का ? "

मी म्हटले, " त्याच्या घरी तरी कळवायचं " डॉक्टर म्हणाले, " कळवलं. काल रात्री त्याच्या आईला स्वीडनला फोन केला ती म्हणाली, मुलाच्या बापाची ( बापही डॉक्टर आहे ! ) माझी गेल्या तीन वर्षांत भेट नाही मुलामध्ये मला मुळीच स्वारस्य नाही ! त्याचं काय हवं ते करा ! शेवटी त्याला आज पोचवून आलो ! "

गांधी सांगत होते, " दोन वर्षांपूर्वी याच मुलाचे वडील पॅरिसमध्ये भेटले होते ते त्यावेळी मुलाबद्दल बोलायला अत्यंत नाखूष होते ! "

शेकड्यांनी, हजारांनी ही मुले टी एम.कडे नि असल्याच इतर साधनांकडे

धावताहेत, की त्याची घरे, त्याच्या भोवतालचे जग त्याना तिकडे लोटून देते आहे?
मघाशी जिच्याबद्दल लिहिले ती रस्त्याच्या मधोमध हात हालवीत उभी असलेली वेभान पोर पुन्हा पुन्हा डोळ्यासमोर येते

## २६

३ फेब्रु ७८

इथे दिवस जात आहेत भोवताली बर्फ असते बाहेर डोंगरतळी दिसतात. आजूबाजूला तारुण्या ी उसळत असलेली प्रचड घालमेल, उलाढाल चालू असते हाकेवर असलेला असेंब्ली हॉल दिवसाआड शेकडो उत्साही चेहऱ्यानी फुलून निघतो मोठमोठाल्या बसेस भरून मुले येतात रात्री एकदीड वाजेपर्यंत सभा–व्याख्याने–



उत्सव होतात महिन्याकाठी देशादेशातून येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्याच्या प्रवासाची बिले सहज लाख दीडलाख रुपयाच्या घरात जातात पैशाचा पूर वाहतो आज विमान घेतले उद्या इग्लडमधला एक जुना राजवाडा चळवळीसाठी केंद्र म्हणून घेतला नॉर्थ सीमधले एक बेटच या गव्हर्नमेंटची राजधानी म्हणून घेण्याच्या वाटाघाटी चालू आहेत तिथे मग महर्षींचे सरकार स्वतःची सार्वभौम सत्ता गाजविणार स्वत च्या बोटी–विमान–आगगाड्या ठेवणार! ऐकणाराचे कान आणि पाहणाऱ्याचे डोळे फाटून जातात अशा स्थितीत, २१ तारखेला सकाळी मी नंदकिशोरला निर्वाणीचे पत्र पाठविले मला पहिल्या विमानाने परत जायचे आहे, माझी व्यवस्था करा

देखावे सुदर आहेत, पण मनाची हुरळ मरगळली आहे डोंगर उंच आहेत, पण त्याना जिकू पाहण्याचे, अवसान खचले आहे त्याहीपेक्षा वाईट म्हणजे उन्नत विशाल, मूकगभीर निसर्ग समोर येऊन ठाकला, म्हणजे ते सृष्टीच्या प्रचड खेळात सामील होण्याचे आमत्रण आहे असे पूर्वी वाटे लहान मुलाना अधिकाधिक उंच उड्या

मारायला वडील माणसे शिकवतात त्यात त्याचा धीर चेपतो बळ वाढते दृष्टीचे लक्ष्य उच्च उच्च होत जाते हीन, क्षुद्र गोष्टींच्या चिखलातून बाहेर पडण्याची वृत्ती आपोआप अंगी बाणू लागते या प्रचंड निसर्गाच्या सान्निध्यात मन असेच वरवर जाण्याच्या ओढीने स्फुरायला हवे पण मला धाप लागते! इथल्या पैशाच्या पुरात सापडलेली आम्ही हिंदी माणसे त्या पुराचा एक थेंबही तोंडात न जाता नुसत्या हपापाने तडफडत सदैव बुडण्याच्या बेतात असतो! मन उबगून जाते काम असले तर यातल्या गोष्टींचा विसर पडतो तेही नसले तर एखाद्या वेळी—आणि अशा वेळा दिवसातून पाचदहा येतात—मन ओरडते, "यावेळी याक्षणी बाहेर पडायला हवं, परत जायला हवं!"

पण परत म्हणजे कुठे? आता या वयात जिथे कंटाळा येणार नाही, अशी जागा कोणती? असे आयुष्य कुठे वाट्याला येईल? आपण खरोखर हवेसे असू अशी किती माणसे कुठेशी असतील? जी असतील त्यानाही आता काळाने कात्रत आणलेल्या मायेच्या पाशाची सतत जाणीव असणार! तुटून पडण्याच्या बेतात असलेल्या लोंबकळणाऱ्या माणसानी शेवटी कुठल्या जमिनीवर कपाळमोक्ष हवा याविषयी स्वतःशी वाद घालीत बसावे यात कुठला शहाणपणा!

पण तरीही इथे कंटाळा, खूप कंटाळा आला साडेचार महिन्यापूर्वी इथे आलो इथे होत असलेल्या फिल्मसची तऱ्हा थोडी बदलता येईल असे वाटले दोन अडीच तासाच्या फिल्मचा एक स्क्रिप्ट लिहून काढला इथे फिल्म काढण्याची साधने भरपूर आहेत पण कारभार संस्थानी व्याप प्रचंड आणि विस्तृत महर्षींच्या शब्दाशिवाय पान हलायचे नाही आणि ते इथे असले तरी दर्शन दुर्लभ भेट दूरच आणि नसतील, तेव्हा आठवडे आणि महिने गायब परवा वर गेलो तर महर्षी सकाळीच गेले म्हणून कळले बरोबर चवथ्या दिवशी दुपारी खोलीच्या बाहेर पडलो तो सगळीकडे त्याचे पहारेकरी हजर! म्हणजे महर्षी परत आले! त्या तीन दिवसात ते कॅनडात आणि अमेरिकेत जाऊन आले नतर तीन दिवस इथे होते काल सकाळी गेले—हिंदुस्थानात, असे ऐकतो!

या सगळ्या धादलीत महर्षींच्याकडून लिहिलेल्या स्क्रिप्टवर मत मिळवायचे, त्याचे पुढे काय करायचे, हा निर्णय करवून घ्यायचा! पण महर्षी भेटणे कठीण डॉ गांधी महर्षींच्या निवासाच्या शेजारच्या खोलीत राहतात ते आज दोन महिने परत जायला मिळावे म्हणून खटपटीत आहेत महर्षी त्यांच्या दारावरून दिवसातून दहादा जातात पण गांधी म्हणतात, "महर्षींची गाठच पडत नाही! ते तुमच्या जवळून गेले तरी तुमच्याकडे बघणार नाहीत चुकून बघितले, तर नुसते हसल्याचा भास निर्माण करून पुढे जातील! २२ सप्टेंबरला मी इथे आलो तेव्हा चोवीस सप्टेंबरला समाचारासाठी म्हणून समारंभाने त्यानी खोलीत बोलावून घेतले,

आणि एका वाक्यात माझा समाचार घेतला " यात्रा कैसी रही ? " बस्स !

पुढे दसऱ्याच्या पूजेला रोज समोर बसत होतो तेव्हा एक दिवस रात्री दहा वाजता म्हणाले, " आज आपका सुनेंगे ! " आणि मी स्क्रिप्टचा काही भाग वाचून दाखविला महर्षींनी नुसता ऐकून घेतला एक नाही दोन नाही माझ्या स्वभावाप्रमाणे माझी महर्षींच्या अंतेवासीयामध्ये कुणाशी ओळख नाही. महर्षींचे स्क्रिप्टबद्दल काय मत झाले हे विचारण्याची सधी—आणि पुढे इच्छाही—नाहीशी झाली नाही तरी महर्षी कुणाला कधी वाईट म्हणत नाहीत कुणाला कशाबद्दल ' नाही ' म्हणत नाहीत ( ते काम दुसरे करतात ! ) त्यामुळे दोन-चार दिवसातच इथून निघावे असा विचार सुरू झाला

मग एक दिवस एक अनोळखी मुलगा आपण होऊन जवळ आला आणि सागू लागला, " काल महर्षी म्हणत होते मिस्टर बेडेकर फार गुणी आहेत " मग आठदहा दिवसात डझनभर माणसे तसलेच काही बोलून गेली ! आणि महर्षी हिंदुस्थानला निघून गेले ते महिना सव्वा महिना ! म्हणजे स्क्रिप्ट चागला आहे, पण पुढे काय करायचे ते ठाऊक नाही !

रॉय म्हणाला, " तुम्हाला हवं तर शूटिंग सुरू करा ! " मी म्हटले, " अरे, शूटिंग म्हणजे खर्च तो सॅक्शन करणारी माणसे कोण ? " रॉयने उत्तर दिले, " सॅक्शन कशाला हव ? आम्हाला विचाराव लागत नाही कॅमेरा घ्यायचा, फिल्म घ्यायची, शूटिंग करायच ! वाईट झाल तर महर्षी म्हणतात, ' टाकून द्या. पुन्हा दुसर करा ! ' इथे नवीन माणसं येतात त्याना काही माहिती असतेच अस नाही तरी महर्षी लाख लाख रुपयाची मशिनरी त्याच्या हवाली करतात म्हणतात, ' आज सध्याकाळी तू कॅमेरा चालव. भिऊ नकोस काही बिघडणार नाही तुझ्या अंगी सगळी शक्ती आहे करून बघ म्हणजे प्रत्यय येईल ! ' मी पहिल्या दिवशी फिल्मचा कॅमेरा चालवला, त्याच्या आधी साध्या कॅमेऱ्यानेसुद्धा फोटो घेतले नव्हते ! "



मी मनाशी निर्णय केला आणि दुसऱ्या दिवसापासून शूटिंग सुरू केले स्क्रिप्टचा काही भाग पुरा करावा असे ठरविले होते कुणी विचारले नाही कुणी आडकाठी आणली नाही ठरविले होते तेव्हढे काम सपविले आणि एडिटिंग करायला सुरुवात

छे, हे बरोबर नाही ? " ऐझेन गेला आणि दुसऱ्या दिवशी सकाळीच महर्षींनी बोलावले आणि विचारले, " काय आहे कथेची कल्पना ? "

मी एकदम चमकलो त्यानी सगळे ऐकून घेतले मग नेहमीप्रमाणे त्यावर कसलेही मतप्रदर्शन न होता मी परत आलो रात्री असेब्लीला गेलो नेहमीप्रमाणे मागे अधारात बसलो महर्षी अनेक विषयावर बोलत होते गप्पा मारीत होते म्हणेनास मध्येच ते थाबले आणि म्हणाले, " आता मिस्टर बेडेकर इथे येऊन आपल्या फिल्मची कल्पना सागतील ! "

माझी काय अवस्था झाली असेल याची कल्पना कर !

मग सभेतच गोष्टीवर थोडी चर्चा झाली ती संपली तेव्हा महर्षींनी नायक–नायिका इतर पात्रे याची कामे करायला कोणकोण मिळतील, याविषयी विचार विनिमय सुरू केला !

दुसऱ्या दिवसापासून जो भेटे तो पाहिजे ती मदत करायला तयार–अगदी उत्सुक, उतावळा ! माझे फिल्म जोडण्याचे काम चालूच होते ऐझेनचा कामाचा झपाटा विलक्षण आठ-दहा दिवसात त्या फिल्मचे सगळे काम संपले असते आणि मी मोकळा झालो असतो पण तिसऱ्याच दिवशी ऐझेन आला आणि खिन्नपणे म्हणाला, " उद्या सकाळी न्यूयॉर्कला जातो आहे महर्षींनी सागितल आहे ! " तो गेला आणि काम बद पडले !

सकाळी चहा घेताना एकाला बोलताना ऐकले, " ऐझेन गेला म्हणजे इथला शेवटचा अमेरिकन गेला ! "

ऐझेन गेला तो, आठ दिवसात येतो ' म्हणून पण पधरा दिवस झाले तरी तो केव्हा येणार कळेना कुणी म्हणे, " आता कसला येतो इथे ? " म्हणजे नवीन काम नाही आणि केलेले पुरे होत नाही ! मग नदकिशोरला पत्र लिहिले " तीन महिन्यासाठी आलो होतो आता परत जाव म्हणतो " नदकिशोर लगेच आले म्हणाले, असा जायचा विचार करू नका फिल्म डिपार्टमेंटमध्ये काय पाहिजे, किती माणसे लागतील, पुढे काय काय करता येईल, याचा आराखडा करून द्या म्हणजे काही विचार करता येईल " मग रॉयला सागून तसा आराखडा करून पाठविला त्यालाही तीन आठवडे होऊन गेले मध्यंतरी जो तो स्टोरी फिल्मसाठी आसुसलेला रॉय रोज येऊन दोन-चार तास बसायचा त्यामुळे थोडा वेळ जाई पण त्याचा हट्ट–कथा करू या ती तयार झाली की पुढचं सगळ मी बघतो " म्हणून ते काम सुरू केले निम्मेअधिक काम बरेचसे समाधानकारक होत आले मग एक दिवस रॉय आलाच नाही ! कळले, त्याला एकाएकी इटलीला जावे लागले ! मग मात्र ३१ तारखेला ' फायनल नोटीस ' दिली आता जाणार !

सध्याकाळपर्यंत दोन चार माणसे काय पाहिजे, काय करायला हवे, म्हणून

चर्चा करून गेली रात्री असेंब्लीला घेऊन जाण्यासाठी एक 'ऑफिसर' आला त्याने म्हटले, 'महर्षींनी सांगितले आहे, बेडेकरांना पुढच्या रांगेत बसवा म्हणजे मला आठवण येईल!" मला बघितल्याबरोबर महर्षींनी सभेला विचारले, "मिस्टर बेडेकरांना फिल्मसाठी काम करायला माणसं हवी आहेत कोण कोण तयार आहे?" पाच-दहाजण उभे राहिले मी मुलांशी तिथेच महर्षींच्या समोर बोललो व म्हटले, "मुले चांगलीच आहेत पण आज त्यांना अनुभव नाही सध्याचे काम ऐझेन किंवा त्याच्या इतक्या जाणत्या माणसाशिवाय होणार नाही!" लगेच फर्मान सुटले, "ऐझेनला टेलेक्स करा उद्या सकाळी इथे आला पाहिजे"

दुसऱ्या दिवशी सकाळीच ऐझेन आला त्याने जवळ जवळ मिठीच मारली आणि मग एकाला बोलताना ऐकले, "चांगला गेला होता या बेडेकरांनी त्याला परत आणला!"

सध्या ऐझेन आणि मी झपाट्याने काम करतो आहोत मदतीला ती सभेत उभी राहिलेली मुलेही आहेत सुरळीत चालले तर एकदोन आठवड्यात संपेल पण मग इथून बाहेर पडतापडता महिनासुद्धा उलटेल पाण्यात देव टाकून ठेवावे!


मी नंदकिशोरला म्हटले, "मी उगीच आकस्ताळेपणा करायचा म्हणून जातो असं म्हटलं नव्हतं. खरंच जायचं आहे बायको आजारी आहे मुलगा अमेरिकेहून येणार आहे इतर कामं आहेत" मग तावडतोब हुकूम सुटले बेडेकरांना बायकोशी टेलिफोनवर बोलण्याची व्यवस्था करून द्या मुलाची भेट हवी ना? मग मुलाला अमेरिकेत कळवा जाताना इथे ये तुला झूरिककडून इथे आणू आणि पोचवू. इथे हवा तितका रहा वडिलांना मनसोक्त भेटून घे." म्हणून तुझ्याशी टेलिफोनवर बोलता आले आता वाटते आहे या पत्रावर टायटल द्यावी— माझे रडगाणे!

# २७

फेब्रु ७८

परवा सकाळी उठलो स्वतःची बरीच निर्भर्त्सना केली इथल्या कामाच्या, इथून जाण्याच्या सगळ्याच बाबतीतल्या अनिश्चिततपणाबद्दल मनाशी म्हटले, "हे आहे काय? मला महर्षींना भेटायचं आहे असं जॉनला सांगायचं जॉन नीलला सांगणार, नील क्रिप्टनला, क्रिप्टन नंदकिशोरला. मग नंदकिशोर म्हणणार बर, बघतो! आणि महर्षी दुसऱ्याच दिवशी आफ्रिकेला गेले म्हणून कळणार! ते काही नाही आज आत्ता महर्षींना भेटायचं आपल्या जाण्याच्या तारखेचा सोक्षमोक्ष

करायचा!" आणि वर गेलो सुदैवाने महर्षी त्यांच्या निवासाच्या दारातून बाहेर येत होते. मला बघितल्याबरोबर हसून म्हणाले, "हम इंटरलाकन जा रहे हैं,



आप भी हमारे साथ चले!" नंतर मला काही शब्द फुटण्यापूर्वीच नंदकिशोरला म्हणाले, "मिस्टर बेडेकर भी हमारे साथ इंटरलाकन जायेंगे!"

आणि मिस्टर बेडेकर महर्षींच्या मोटारींच्या ताफ्यातल्या एका गाडीत बसून लगेच इंटरलाकनला गेले! दुसऱ्यांना नावे ठेवता ठेवता स्वतःही तसाच घसरलो आहे हे ध्यानात आले!

इंटरलाकन हे गाव हिमक्रीडेसाठी जगभर प्रसिद्ध आहे आल्प्सची सगळ्यात उंच, प्रचंड शिखरे इंटरलाकनला आहेत जगभरचे खुशालचेंडू बर्फावरच्या खेळासाठी तिथे जमतात

सगळ्या स्वित्झर्लंडभर टी एम च्या अभ्यासासाठी केंद्रे आहेत त्यातले एक इंटरलाकनला आहे डॉ गांधी बरोबर होते ते म्हणाले, "पूर्वी महर्षी वारंवार या केंद्रांना भेटी देत असत सगळ्या मुलांचा समाचार घेत हल्ली ते कमी झाल आहे त्याचा परिणाम म्हणून इंटरलाकनच्या मुलांची मन थोडी विचलित झाल्याच कळल म्हणून ही आजची भेट!"

संध्याकाळी इंटरलाकनला पोहोचलो पाहताक्षणी भुरळ पडावी असे सुंदर गाव वाटले केंद्र म्हणजे एक मोठे हॉटेल अडीचशे-तीनशे मुले महर्षी आले म्हणून एकच गर्दी उसळली

आत बाल्कनीच्या खांबाला टेकून कोन्यू उभा होता हा स्वीडिश तरुण सीलिसबर्गला मागे ओळख झाली होती खूप हसतमुख, विनोदी, धट्टाकट्टा कोन्यू सर्कशीत मोठा प्रसिद्ध विदूषक होता असे ऐकले सधनही आहे स्टॉकहोमला त्याचे एक मोठे हॉटेल आहे कोन्यू आला, तो उत्साहाने टी एम च्या अभ्यासासाठी सीलिसबर्गला दोनचार दिवसांच्या भेटीत तो महर्षींबद्दल खूप कौतुकाने बोले. म्हणे, "इतिहासात एकेकट्या माणसानी राज्ये स्थापली या मला दंतकथा वाटत. पण महर्षींकडे बघा अहो, यांनी नेपोलिअनपेक्षा जास्त देश पादाक्रांत केले आहेत! तेही

रक्ताचा थेंबही न सांडता ! ”

पण आज कोन्यू खिन्न, अगदी मलूल दिसला आम्ही चहाचे पेले घेऊन बसलो कोन्यू म्हणाला, “ किती उत्साहाने इथे आलो आज सगळी फसगत झाली ! ” मी आश्चर्याने म्हटले, “ अरे कशाबद्दल म्हणतो आहेस तू ? ” “ या महर्षींच्या शिकवणुकीबद्दल काही अर्थ नाही यात ! ” असे म्हणून तो गप्प बसला नतर म्हणाला, “ आज भर सभेत मी महर्षींच्या तोंडावर सागून मोकळा होणार आहे, इथ येऊन फसलो कशाचा कशाला इथे मेळच नाही मुळी ” मी गप्प बसून बघत राहिलो. “ माझ्यासारखे पुष्कळ आहेत इथे पण तरी सगळे मोडता घालतात मला, तू प्रत्यक्ष महर्षींना अस बोलू नकोस म्हणून पण मी आता ऐकणार नाही ” कोन्यूने समारोप केला

रात्र गेली दुसऱ्या दिवशी सकाळी सभा जमिनीवरच्या बैठकीवर दोनतीनशे मुले काळ्यानिळ्या सुटात उठून दिसणारे त्याचे तरुण तेजस्वी चेहरे महर्षी काही



वेळ बोलले नतर मुलाचे प्रश्न शिकलेली बुद्धिमान मुले काहीतरी शोधण्याच्या हिरिरीने त्याची मने जिवत झालेली त्याचा प्रत्येक प्रश्न मार्मिक होता, मुद्देसूद होता आणि टी.एम चे तत्त्वज्ञान ढवळून काढणारा होता महर्षींनी प्रत्येकाला अत्यंत समर्पक उत्तरे दिली कुठल्याही प्रश्नाला विनोदाची ढाल पुढे करून बगल दिली नाही. प्रश्नोत्तरे संपली, तेव्हा सगळ्यानी टाळ्याचा गजर करून सभा डोक्यावर घेतली

कोन्यू भेटला तो हसतच मी म्हटले, “ झाल तुझ समाधान ? ” तो म्हणाला, “ ते काल रात्रीच्च झाल फार अस्वस्थ झालो होतो म्हणून रात्री दोन वाजताच्च महर्षींच दार ठोठावल त्यानी दीड तास बसवून घेतल सगळ्या तऱ्हेने शातपणे माझ्याशी बोलले माझ्या साऱ्या शका फिटल्या ! तेव्हापासून मी तृप्त मनान फिरतो आहे

मी बघतच्च राहिलो !

कोन्यूची फसगत कालची खरी की आजची खरी ?

मग दुपारच्या जेवणाच्या वेळी एटियनची ओळख झाली एटियन पस्तिशीच्या आगेमागे असेल आपण फ्रान्समधल्या मेटझ गावचे असे त्याने सांगितले. मेटझ

हे आजच्या फ्रान्समधल्या अल्सेस लॉरेन परगण्याचे मुख्य गाव तेव्हा मी सहज म्हटले, " अस्स ? म्हणजे तुम्ही फ्रेंचमन आहात तर ! " त्याने खांदे उडवले आणि हसत म्हटले, " कुणास ठाऊक ! " मी आश्चर्याने विचारले, " असं का म्हणता ? अल्सेस लॉरेन फ्रान्समध्ये आहे हे खरं ना ? " तो म्हणाला, " तुम्हीच ठरवा खरं काय आहे ते माझे पणजोबा फ्रेंच सैन्यात अधिकारी होते १८७२ साली जर्मनीनं आमच्यावर स्वारी केली फ्रान्सचा पराभव झाला अल्सेस लॉरेन जर्मनीत गेलं आणि पणजोबा जर्मन सैन्यात अधिकारी झाले ! आम्ही जर्मन नागरिक झालो !

" मग १९१४ मध्ये जर्मनीने फ्रान्सवर स्वारी केली त्यावेळी पणजोबांचे वडील चिरंजीव–म्हणजे माझे आजोबा – जर्मनीकडून लढले ! १९१८ साली जर्मनीचा पराभव झाला तेव्हा अल्सेस लॉरेन पुन्हा फ्रेंच झाले माझे वडील तेव्हा लहान होते ते शाळेतून घरी आले आणि आजोबाना म्हणाले, " हे काय हो बाबा ? आज आम्हाला एका नवीनच निशाणाला सलाम करायला लावला ! " आजोबांनी समजूत घातली ' बाळ, ते फ्रान्सचे निशाण म्हणजे आपलेच ' आपण आता फ्रेंचमन झालो आहोत ' आणि जर्मनीसाठी लढताना १९१७ सालीच आजोबांचा एक पाय तुटला होता !

" १९३९ च्या युद्धात माझे वडील फ्रेंच सैन्यात दाखल झाले चाळीस साली फ्रान्स जर्मनीला शरण गेले मग आम्ही पुन्हा जर्मन निशाणाला सलाम करू लागलो ! १९४५ साली जर्मनीचा पाडाव झाला आम्ही पुन्हा फ्रेंच झालो कारण आता अल्सेस लॉरेन फ्रान्समध्ये आले !

आता तुम्हीच ठरवा मी कोण आहे ते ! "

मी विचार करीत बसलो मी कोण आहे ? हिंदी ? भारताशी इमान राखणारा ? खोटी गोष्ट आम्ही ब्रिटिशांच्या अंमलाखाली वाढलेली म्हातारी आमच्या रक्तात गुलामीचे विष इतके भिनवले गेले होते की त्याचे डायलिसिस होऊन ते पुन्हा शुद्ध, इमानी भारतीय रक्त कधी झालेच नाही !

ठीक आहे नसेन मी खरा भारतीय पण मी हिंदू तर आहेच ना ?

तुला आठवते, श्रीकांत तेव्हा सात आठ वर्षांचा होता समोरच्या घरात उत्सव होता त्याने विचारले, " त्यांच्याकडे काय चालल आहे ? " तू उत्तर दिलेस, " हनुमान जयंतीचा उत्सव करताहेत " मग त्याने विचारले, " आपल्या इथे का नाही ? आपणसुद्धा हिंदूच आहो ना ? " हे ऐकून आपण दोघांनी एकमेकाकडे थोडे वरमून बघितले !

माणसाचा योगक्षेम संघात राहिल्यामुळेच चालतो आणि त्या संघाचा प्रभाव व्यक्तीवर जबरदस्त असतो म्हणून ' धर्म हा सामुदायिक विचाराच्या तत्त्वावर आधारलेला असतो असे एका फ्रेंच समाजशास्त्रज्ञाचे म्हणणे आहे एकदा मी

माझ्या ओळखीच्या एका प्रतिष्ठित गृहस्थाबरोबर बोलत होतो राजकारणात धर्मनिरपेक्षतेवर त्याची फार श्रद्धा आहे मी म्हटले, " तुमची धर्मनिरपेक्षता तुम्ही जाहीर करता हे ठीक आहे पण केव्हा तरी जाहीरपणे मी हिंदू आहे आणि त्याचा मला अभिमान वाटतो असे सागाल का ? " ते म्हणाले, " जाहीरपणे कशाला सागायला हवे ? खाजगी वैयक्तिक आयुष्यात मी हिंदू आहेच की ! "

हिंदू वकील, हिंदू डॉक्टर यानी आम्ही हिंदू नाही असे जाहीर केले तर त्याची आजची प्रॅक्टीस उद्या तशीच राहील का ? अगदी सिनेमाच्या धद्यातसुद्धा मला आता आठवते, माझे निर्माते बहुतेक हिंदू होते ! जातीयत्वाचा आरोप नको म्हणून तू आणि मी आम्ही हिंदू आहोत असे जाहीरपणे म्हणायला कचरतो मात्र हिंदूच्या वस्तीत राहतो, त्यामुळे मिळणारी थोडीफार सुरक्षितता, योगक्षेमाची साधने, सामाजिक जीवन याचा यथेच्छ उपभोग घेतो पण निकराची वेळ आली की शरमिंदेपणाने ' आम्ही हिंदू नाही असे नाही ' एव्हढेच बिचकत म्हणतो.

पण मग मी हिंदू म्हणवतो ते का ? राजा राममोहन रायापासून स्वामी दयानदापर्यंत हिंदू धर्मतत्त्वाचे सशोधन होत आले आहे—असे मी नुसते ऐकत आलो ! या धर्माच्या कुठल्या तत्त्वावर माझा विश्वास आहे म्हणून मी स्वतःला हिंदू म्हणवतो आहे ? म्हणजे मी चर्चमध्ये जाऊन गुडघे टेकीत नाही.. मशिदीत जाऊन हात पसरत नाही म्हणून मी हिंदू ! म्हणजे हिंदूच्या सघात राहूनही आम्ही हिंदू आहोत ते चोरटेपणाने ! स्वत. काही करतो म्हणून नव्हे ! चर्चमध्ये. मशिदीत गेला तर माणूस कोणत्या धर्माचा आहे, कोणच्या सघाचे त्याला पाठबळ आहे, हे न बोलता जाहीर होते पण मी महालक्ष्मीला एखाद्या वेळी जातो तो तिथे कमळे मिळतात म्हणून ! आणि गाडीतून जाताना सिद्धिविनायकाच्या समोरच्या रागाचे दर्शन घेतो ! इथ येऊन ही फिल्म केली पण टी एम ची साधना केली नाही पण माझे मत मात्र ठाम आहे की मी हिंदू आहे !

सगळ्या विषयातली लोकाची ठाम मते अशीच असतात का ? तू नेहमी मला म्हणतेस, " तुझं काही नक्की नसत केव्हाही पहा, आज एक तर उद्या दुसरच ! आणि मग मला वाटू लागते, " मी अगदीच बिनकण्याचा आहे, " आणि मी ओशाळा होतो

टॉम स्टॉपर्डने एकदा म्हटले होते, " मला नक्की मत नाही. माझं मन गावशिवाराबाहेरच्या मोकळ्या कुरणासारख आहे तिथे खालून जमिनीतून ओल मिळते वरून आकाशातून पाऊस पडतो ऊन येत ते दोन दिशानी पूर्व आणि पश्चिमेकडून आणि वारा ? तो तर दाही दिशानी तिथ येतो, मनमुराद वाहतो आणि खेळतो मग तिथल गवत नेहेमी ताज राहत आणि डुलत असत ! "

हे आठवले म्हणजे माझी खत कमी होते हवय कुणाला ठाम मत ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६०७

REFBK-0024845

HÜI